# ललित सनिविवि

या प्रकल्पास 'राज्य मराठी विकास' संस्थेतर्फे 'बृहन्महाराष्ट्र मंडळांना अर्थ साहाय्य योजना' या अंतर्गत अर्थ साहाय्य प्राप्त झाले आहे.

महाराष्ट्र मंडळ, बेंगळूरु

# ललित सन्निधि

## ललितलेख संग्रह

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

या प्रकल्पास 'राज्य मराठी विकास' संस्थेतर्फे 'बृहन्महाराष्ट्र मंडळांना अर्थसाहाय्य योजना' या अंतर्गत अर्थ साहाय्य प्राप्त झाले आहे.

‘ललित सनविवि’ ललितलेख संग्रह

सर्व हक्क © ‘राज्य मराठी विकास संस्था’

प्रकाशक :
महाराष्ट्र मंडळ
२ रा क्रॉस, गांधीनगर,
बेंगळूरु - ५६० ००९
दूरध्वनी : ०८०-२२२८ ०६०९
इ-मेल : mandalblr@yahoo.com
वेब साइट : www.mmbangalore.org

मुखपृष्ठ : जाई देवळालकर

संपादन : अनुराधा चौगुले, ज्योती साठे

प्रथमावृत्ती : ६ एप्रिल २०१९

किंमत : १३०/-

लेखांतील मतांशी महाराष्ट्र मंडळ, बेंगळूरु व
राज्य मराठी विकास संस्था सहमत असतीलच असे नाही.

आजतागायत
मोठ्या विश्वासाने
जे आपले साहित्य
'सनविवि'ला सुपूर्द करत आले आहेत,
त्या सगळ्यांना...

# सनविवि

सप्रेम नमस्कार विनंती विशेष!!

काहीसा औपचारिक वाटला तरी आर्जवी स्वरातला, अगत्यपूर्ण भावनांचं प्रतीक असणारा, पत्र लेखनाचा हा चिर-परिचित मायना!! आणि बेंगळूरु महाराष्ट्र मंडळाच्या मुखपत्राचे अत्यंत बोलके शीर्षकही!

मंडळाच्या विविध कार्यक्रमांची आणि उपक्रमांची माहिती देण्याच्या मूळ हेतूने जानेवारी १९८७ मध्ये मंडळाचे हितचिंतक सर्वश्री चारुहास कुलकर्णी, सुरेश उदास, अभय दीक्षित, अनील बोकील, शशी दिवाकर, आनंद देशपांडे ह्यांनी 'सनविवि' ह्या मराठी परिपत्रकाची सुरुवात केली. पहिल्यांदा बरीच वर्षे मजकूर हाताने लिहिण्यात येत असे. त्याचे स्टेन्सिल कटिंग करून नंतर छपाई होत असे. हळूहळू डिटिपिचे तंत्र वापरायला सुरुवात झाली. आजही हे पत्रक दरमहा त्याच उत्साहाने प्रकाशित होते. छापील प्रत तर निघतेच, पण त्याचबरोबर आता इ-सनविवि, ब्लॉग अशा नवनवीन स्वरूपातही ते लोकांपर्यंत पोहोचते.

राज्य मराठी विकास संस्थेकडून अनुदान मिळविण्यासाठी जेव्हा प्रस्ताव देण्याचे ठरले, तेव्हा 'सनविवि'मधील वेचक आणि वेधक अशा ललित लेखांचा संग्रह करावा ही कल्पना विनाविलंब पुढे आली. आज त्या कल्पनेला मूर्तरूप मिळत आहे.

हे कार्य अर्थातच अनेकांच्या सहकार्याने साकारत आहे. ह्या प्रकल्पास राज्य मराठी विकास संस्थेतर्फे 'बृहन्महाराष्ट्र मंडळांना अर्थ साहाय्य योजने'च्या अंतर्गत अर्थसाहाय्य प्राप्त झाले आहे. मागील

कित्येक अंकांमधून लेखनिवडीचे जिकिरीचे काम ज्योती साठे आणि अनुराधा चौगुले ह्यांनी केले. पुस्तकाचे आकर्षक मुखपृष्ठ केले आहे सिद्धहस्त चित्रकार जाई देवळालकर ह्यांनी. ह्या सर्वांचे मनःपूर्वक आभार!! डिटिपिची जबाबदारी सांभाळणाऱ्या उदय कल्लिहाळ ह्यांचेही आभार!! महाराष्ट्र मंडळाच्या कार्यकारिणीचा सर्वच उपक्रमांना नेहमी भक्कम पाठिंबा असतो. सर्वांच्या मोलाच्या सहकार्यामुळेच ''ललित सनविवि'' प्रकाशित होत आहे ह्याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे!

कळावे, लोभ असावा ही विनंती.

● **रेखा नाईक**
अध्यक्ष, महाराष्ट्र मंडळ
२०१८-१९

# बाकी सर्व

नोकरीधंद्यानिमित्त परप्रांतात स्थलांतरित होणाऱ्या प्रत्येकावर अनोळखी प्रदेशात राहायला आल्याचा ताण असतो. जेथे मराठीहून अगदी वेगळी असणारी भाषा बोलली जाते, अशा 'अमराठी' प्रांतात आल्यावर तर आपली मराठी संस्कृतीशी जुळलेली नाळ तुटत असल्याची भावना तीव्रतेने जाणवते. जसजसे दिवस जातात, तसतसे तो नवा प्रदेश हळूहळू ओळखीचा होऊ लागतो. नवे स्नेहबंध जुळतात. त्या ठिकाणी माणूस रमू लागतो. तरी अधूनमधून मागे काहीतरी सोडून आल्याची रुखरुख वाटत राहते. आधुनिक इलेक्ट्रॉनिक माध्यमांमुळे आज अवघं विश्व खूप जवळ आलं असलं, तरी आपण खूप दिवसांत चांगलं मराठी नाटक पाहिलं नाही, मराठी सिनेमा बघितला नाही, मराठीतील सध्याची नवी गाणी माहीत नाहीत, बाजारात पुस्तक येऊन गाजलं, तरी आपल्याला अजून पाहायलाही मिळालं नाही अशासारख्या असंख्य गोष्टी खुपत राहतात.

आमच्या बेंगळूरात तरी अशा वेळी आमचा 'सनविवि' आमचा सुहृद बनतो. इतकंच नव्हे, तर आम्हाला समानधर्मी-समानशील सन्मित्र मिळवून देतो. 'सनविवि'तल्या गप्पा-गोष्टी-कथा-कविता-लेख आमच्या माय मराठीची उणीव काही प्रमाणात भरून काढतात.

१९८७ च्या जानेवारीपासून प्रसिद्ध होत असलेला 'सनविवि' म्हणजे आमच्या मंडळाचं मुखपत्र. बेंगळूरूतल्या मराठी लोकांच्या साहित्यगुणांना भरपूर वाव देणारा. आत्तापर्यंत 'सनविवि'त प्रसिद्ध झालेल्या ललितलेखांचं पुस्तक काढायचं ठरलं. मात्र अडचण वेगळीच आली. आजवर अनेक लेखकांचे एकापेक्षा एक उत्तम लेख प्रसिद्ध झालेले, विषय वेगवेगळे, नवीन-वेगळ्या विचारांचे, उत्तम मांडणीचे. काहींचे सदराच्या स्वरूपात वर्षभर लिहिलेले वाचनीय असे. त्यातून

पृष्ठसंख्येची मर्यादा होतीच. मग त्यातल्या त्यात डावे-उजवे करून एकंदर २६ लेख ह्या पुस्तकात छापायचे ठरवलं. जास्तीत जास्त लेखकांचे उत्तम लेख ह्या पुस्तकासाठी निवडण्याचा प्रांजळ प्रयत्न आम्ही केला आहे. केवळ लेखांच्या शीर्षकांवरून त्यातल्या विषयांची विविधता रसिकांना सहज जाणवेल.

पुस्तकाच्या गाभ्याला अनुरूप असं मुखपृष्ठ चितारलं आहे साहित्याची उत्तम जाण असलेल्या, चित्रकलेवर प्रभुत्व असलेल्या जाई देवळालकर ह्यांनी. ह्या चित्रातून आपल्याला भेटतात आठवणीतली पानं. पुस्तकातल्या लेखांतून जाणवणारं - अनुभवांचे विविध पोत, छटा आणि आकार ह्यांचं कोलाज ह्या चित्रात प्रतिबिंबित होताना दिसतं!

मनाला आनंद देणाऱ्या गोष्टी पुन्हा पुन्हा आठवत राहणं हा माणसाचा सहज स्वभाव आहे. म्हणूनच 'ललित-सनविवि' करताना ते 'काम' असल्याची भावना आमच्या मनात डोकावलीसुद्धा नाही. सगळे सनविविचे अंक महाराष्ट्र मंडळात उपलब्ध होतेच. मात्र मंडळाचा ऐतिहासिक दस्तऐवजं वास्तूबाहेर न्यायचा नाही हा दंडक पाळताना साहित्य निवडीसाठी आणि डिटिपिसाठी घालाव्या लागलेल्या खेपांचे श्रम 'श्रम' वाटले नाहीत. दोघी स्मरणरंजनात रमून गेलो.

हा पुनःप्रत्ययाचा आनंद 'ललित सनविवि'च्या वाचकांनाही येऊ दे!

बाकी सर्व क्षेम.

सुवाचन!!

**अनुराधा चौगुले • ज्योती साठे**



# अनुक्रमणिका


- तीळभर वाङ्मय - डॉ. श्री. गं. दीक्षित १
- बंध भाषेचे - सानिया ३
- बंगलोरी रसनारंजन - शर्मिला फाटक ७
- तिसरी घंटा - शरद ब्रह्मे १३
- इश्क! - प्रभाकर टोळ १६
- तिसरा अंक - डॉ. सुलोचना जोशी २२
- निसर्गवेध - उल्हास राणे २६
- संपन्न वसुंधरा - पद्मा साठे ३०
- झुळूक - उदय पळनिटकर ३७
- मी, पु.ल. आणि बजाज स्कूटर - मधुपन ४१
- तवा-तवारी - अलका कुंटे ४६
- ।। कालाय तस्मै नमः ।। - जयंत कोल्हटकर ४९
- भावी ~~नागरिक~~ गिऱ्हाईक - एस.डी. गम्मतगौडा ५२

- हास्य आणि विनोद - प्रा. अरुणा वाटवे ५६
- निरोपाचा क्षण - यतीन सामंत ६०
- महिला दिनानिमित्ताने.... - धनंजय चौगुले ६८
- अनुभूती - शिरीष कुलकर्णी ७१
- आयुष्याची दिशा बदलणारा क्षण - नीलिमा राव ७६
- निसर्ग संशोधन - एक वेगळी वाट - नचिकेत केळकर ८०
- पत्रास कारण की..... - स्मिता तळाशीकर ८५
- पु.ल. आणि थ्री इडियट्स - स्नेहा केतकर ८९
- पंतप्रधानांना खुले पत्र - नेहा भदे ९२
- जीवनसंगीत - हृषिकेश मोघे ९७
- समाधानाई-तृप्ताई - मानसी होळेहोन्नूरु १०४
- आरसे नसते तर - अदिती राव ११२
- चूल, मूल आणि So Cool - स्वाती काळे ११७



# तीळभर वाङ्मय

- डॉ. श्री. गं. दीक्षित

'एक तीळ सात जणांनी वाटून घेतला' ही उक्ती लहानपणी निरनिराळ्या संदर्भात अनेकदा ऐकवली जात असे. यातील चांगली बाजू म्हणजे तीळ तो काय! पण प्रेमापोटी एकट्याने न खाता सात भावंडांनी वाटून घेऊन खाल्ला. दुसरी बाजू अशी असू शकते की वडिलार्जित मालमत्तेतील भाऊबंदकीच्या भांडणात एक तीळसुद्धा न सोडता त्याच्याही सात वाटण्या करून सगळ्यांनाच दरिद्री करून धड कोणालाच पोटभर खाऊ दिले नाही. अलीकडील स्वार्थी, आपमतलबी समाजामध्ये सहिष्णुतेचा अभाव हाच नियम झाल्यामुळे बारीक सारीक गोष्ट सुद्धा उदार मनाने सोडण्याची तयारी नाही. ह्या उक्तीचा हाच अर्थ सद्य स्थितीतील समाजाचे यथार्थ दर्शन घडवितो. नाही तर नळावरच्या भांडणात प्राण गमावला, किंवा जमिनीच्या लहानशा तुकड्यावरूनच्या भांडणात दोन्ही पक्षांतील अनेकांचे मुडदे पडले यासारख्या बातम्या वर्तमानपत्रात आल्या नसत्या.

तसं पाहिलं तर तिळाची वाटणी होत असताना सहा भावंडांनी प्रेमापोटीच असं का सांगितलं नाही की, 'तीळ तो काय - दादांना घेऊ दे, आम्हाला त्यातली वाटणी नको.' पण मनुष्य स्वभाव असा आहे की सहजासहजी हे क्वचितच घडते. आपल्या वाटणीचे सोडायला कोणी तयार होत नाही. राज्याराज्यातील सीमातंटे, पाणीवाटप तंटे ह्या स्वभावाच्याच मोठ्या आवृत्त्या आहेत.

ह्या उक्तीला, अल्पसंतुष्टपणाचा वास आहे. माझ्या पिढीच्या महाराष्ट्रीयांचा सर्वसाधारणपणे हा स्थायी भावच होता. बदलीच्या गावी बढतीवर न जाता आहे त्याच जागेवर काम करणे पसंत.

तिळात स्निग्धता आहे, प्रेम आहे म्हणून 'राई' ऐवजी तिळाची निवड. गुळाची सोबत घेऊन संक्रांतीला गोड बोलण्याचा संदेश आणि हृदयातील प्रेमही 'तीळ तीळ तुटतं' असंच म्हणायला लागतं. अनुरागाला रागाची किनार खुमारी देते म्हणून कदाचित 'तीळ-पापड झाला' हे सांगायलाही तीळच उपयोगी. जिवंतपणी माणसाच्या प्रेमालोभात गुरफटलेल्या तिळाला मरणानंतरही शोकसंदेश द्यायला ख्रिश्चन लोकांप्रमाणे काळे वस्त्र लेऊन 'तिलांजली' द्यायला यावं लागलं.

**- जुलै १९९३**



# बंध भाषेचे

- सानिया

वेगवेगळ्या भाषा म्हणून काही गोष्ट असते याची जाणीव मला वाटते, लहानपणी तरी फारशी नव्हती. कारण घरी आईवडिलांशी बोलता येणारी, बाहेरच्या जगाशी संपर्क साधणारी अशी फक्त मराठीच होती. वयाच्या तिसऱ्याच वर्षी इंग्रजी शाळेत जाण्याचा दुर्धर प्रसंगही ओढवला नाही. त्यामुळे पाचव्या वर्षी शाळा भेटली ती मराठीच आणि तिथून पुढे लिहिणं-वाचणं शिकण्याची सोयही मराठीतच झाली.

अर्थात तोपर्यंत हिंदी-इंग्रजी या भाषा असतात याची जाणीव झाली असणारच. सिनेमातली गाणी कानांवर येत असत व इंग्रजी चित्रपटही वडिलांमुळे पाहायला मिळत असत. नंतर या दोन्ही भाषा शिकायलाही लागल्या. पण अभ्यासाव्यतिरिक्त वाचन मराठीपुरतंच मर्यादित होतं. त्यामुळे मनात विचारही मराठीतच येत असणार. कारण कविता लिहावीशी वाटली त्या काळात किंवा गोष्टी रचून सांगाव्याशा वाटल्या त्या मराठीतच.

पुढे मग इंग्रजी शाळा संपून कॉलेज शिक्षण सुरू झालं ते इंग्रजी माध्यमात. पण त्याची फारशी अडचण वाटल्याचं आठवत नाही. तेव्हा बाहेरची इंग्रजी पुस्तकंही वाचायची आवड लागली होती थोडीफार आणि कॉलेजविश्वात मराठी बोलणाऱ्यांखेरीज इतर मित्रमैत्रिणींची भर पडली होती.

मुंबई हे शहर केवळ मराठीभाषिक नाहीच. ती त्याची रंगतही आहे. त्यामुळे आजूबाजूला विविध भाषिक लोक असणं हे गृहीतच धरलं जातं. कॉलेज आणि नोकरीच्या काळात एकीकडे लेखन चालू होतं ते मराठीत. पण माझ्या आजूबाजूला त्याचे वाचक नव्हते. त्यामुळे आपलं लेखन, ते छापून येणारी मासिकं, वाचनात येणारी थोडीफार पुस्तकं यांचं एक निराळंच माझ्यापुरतं जग बनलं.

पुढे मग महाराष्ट्राबाहेरच पाऊल पडलं. भोवतीची भाषा वेगळी असणं याची सवय होऊ लागली. इतकंच नव्हे तर घरच्या माणसांशी संवादही इंग्रजीतून, ती अमराठी असल्याने, होण्याची सवय लागली. यातून एक गोष्ट स्पष्टपणे उमजून आली की भाषा हे एक साधन आहे. वाचन, लेखन, संवाद, विचार यातून करता येतात. पण भाषेपलीकडे यातल्या अर्थांना जास्त महत्त्व आहे. तेव्हा फक्त भाषेत अडकून राहण्यात काहीच साधत नाही. या जाणिवेमुळे मराठी आपण लेखन करतो व आजूबाजूची मंडळी ते वाचत नाहीत याची कधी खंत वाटली नाही. दुसरंही महत्त्वाचं असं की केवळ भाषा ज्यांना येते ते वाचक असतातच असंही नाही. तेव्हा आपण भाषा ही माध्यम म्हणून वापरायची.

मराठी इतक्या जुन्या ओळखीची, बालपणीची, शिक्षणाची, सुरुवातीची भाषा असल्याने लेखनाचा आविष्कार फक्त मराठीतूनच करावासा वाटत आला आहे. ही मनातल्या विचारांची भाषा नाही तर केवळ तिच्याशी जन्मापासूनचे बंध जडलेले आहेत. याचा अर्थ इतर वा इंग्रजी भाषेशी सावत्रपणा वाटतो असं नव्हे. प्रत्येक भाषेला सौंदर्य आहे, समृद्धता आहे. त्या त्या भाषेत जन्मलेल्या, वाढलेल्या माणसाचे बंध त्या भाषेशी जोडलेले असतातच.

आपल्या भाषे - प्रदेशापासून दूर राहण्याचा एक फायदाही होतो. आपल्या परिघाबाहेरची वस्ती आपल्याला दिसते. वैशिष्ट्य आणि फरक लक्षात येतात, तशीच साम्यंही जाणवतात. अनेक वर्ष हे आपोआप होत आल्याने माझ्या लेखनात याचा परिणाम असा झाला की मला केवळ मराठी पात्रं दिसेनाशी झाली. तसा स्थळा-आडनावांचा उल्लेख म्हणून मी लेखनात क्वचितच करत आले. कारण माझ्या मनातली ती माणसं फक्त मराठी नाहीत. ती इतरही आहेत. किंबहुना आपण आणि इतर म्हणजे आपले शेजारी हे आपल्यासारखेच असतात याचं भान मला सतत आहे. तरीही फरक असतो तो माणसामाणसांत. भाषेला ओलांडून जाणारा. व्यक्ती-व्यक्तीच्या घडण्यातला, विचारातला, जीवनपद्धतीतला.

यामुळे आपल्या भाषेच्या प्रदेशापासून दूर राहण्याचे मला नेहमी अनुभवातले फायदेच दिसत आले. भाषा हे माध्यम आहे याचा विसर पडला नाही. त्यापलीकडच्या संवादाचे महत्त्व कायम वाटत आले, पण मराठीशी बांधले गेलेले बंध किती अतूट आहेत याचाही सतत प्रत्यय येत गेला. कारण शेवटी आविष्कार करताना हाताशी असते ती हीच मातृभाषा. आयुष्यात भेटलेल्या अनुभवांचा, नात्यांचा, गुंतागुंतीचा शोध घेताना शब्द धावून येतात ते याच भाषेचे. पण मग आपण जन्मलो त्या भाषेचं ऋण तरी कोणत्या शब्दात मांडणार? भाषेशी असं आपलं नातं जुळलं याचा आनंद आणि अभिमान वाटतो. असे बंध कुणाचेही स्वतःच्या भाषेशी जडू शकतात. फक्त कधीतरी मनात येतं सध्याच्या जमान्यातल्या, धड कुठलीच भाषा पूर्णपणे आपलीशी न करता येऊ शकणाऱ्यांना, या नात्यातली आत्मीयता

जाणवत असेल का? त्यामुळे कुठेतरी संवादालाच बाधा येण्याची शक्यता नसेल का? विचार करायला हवा.

**४९ वे बृहन्महाराष्ट्र अधिवेशन विशेषांक १९९५**



# बंगलोरी रसनारंजन

**- शर्मिला फाटक**

लग्न झाल्या झाल्या नव्यानेच बंगलोरात आले होते. शेजारणींशी नुकती कुठे ओळख होऊ लागली होती. पण कधीही त्यातली कुणीही आणि मी समोरासमोर आलो की स्मितहास्याबरोबर ठरलेला प्रश्न कन्नड-इंग्रजीच्या मिक्स माध्यमातून विचारला जायचा, 'आय्ता कॉफी? आय्ता टिफिन? एनु तिंडी इवत्तु?'

मला गंमत वाटायची. दिवसभर फक्त खाण्याचंच विचारचक्र डोक्यात असतं का? माझ्या एका मराठी मैत्रिणीला मी हे बोलून दाखवलं आणि एक दिवस तिने विचारलं, 'वाचलंस का? सबंध भारतात दरडोई, दरदिवशीचं व्यक्तिगत अन्नग्रहण कर्नाटकात सर्वात जास्त आहे.' वाचलं आणि कोडं उलगडलं. शेजारणींच्या प्रश्नांचा मुळीच अचंबा वाटेनासा झाला.

सुरुवातीच्या दिवसांत मला प्रश्न पडायचा, नुसत्या सांबार किंवा सारभाताने यांचं पोषण तरी कसं होतं? अपूर्ण प्रोटीन्स, पूर्ण जैविकमूल्यं देणाऱ्या आहाराचा अभाव, जीवनसत्त्वांची कमतरता वगैरे आहारशास्त्रातील संज्ञा मनात डोकावून जायच्या. पण दोन-तीन दाक्षिणात्य मैत्रिणी मिळाल्या आणि त्यांचे पदार्थ करायची पद्धत, खाण्यामधली कॉम्बिनेशन्स हे पाहिलं आणि लक्षात आलं, इथल्याही

पारंपरिक पद्धती आहारशास्त्राच्या दृष्टिकोनातूनही वाखाणण्याजोग्या आहेत.

साधा भात म्हटला तरी त्याचेसुद्धा किती प्रकार! भरपूर भाज्या, तूरडाळ, तांदूळ बरोबरीने घेऊन हरभराडाळ, उडीद डाळ, सुकं खोबरं वगैरे वाटून केलेले मसाला आणि चिंचेचा कोळ आणि कढीलिंब घालून केलेला बिसिबेळे अन्ना, नारळाचं वाटण लावलेला आणि इतर भाज्यांबरोबर डबल बीन्सचे दाणे, भोपळी मिरची, फ्लॉवर वगैरे घातलेला खास इकडचा पुलाव; दाणे, चिंचेचा गोज्जू आणि मसाला लावलेला पुळिओगरे. हरभराडाळ, मोहरी वाटून मसाला लावलेला अगदी सौम्य असा दाणे, कढीलिंब घातेलेला चित्रान्ना.

पांढऱ्या भाताबरोबर केले जाणारे प्रकार म्हणजे सार, सांबार आणि हुळी, तिळिसारू, मेणसिन सारू. सांबारसुद्धा अनेक प्रकारे करतात. इथलं अगदी खास म्हणजे मोसप्पु सांबार. तूरडाळीबरोबर आठ प्रकारच्या हिरव्या पालेभाज्या घालून केलेलं. यात पुदिनासुद्धा वापरतात. हुळीमध्ये कडधान्याचा समावेश जास्त असतो. एरवी ज्या भाज्या सुक्या केल्या की खास नाक मुरडून त्यांचं स्वागत होतं त्या भाज्याही या हुळीत सहज खपून जातात. हुळी म्हणजे आमटीसाठी कितीतरी कॉम्बिनेशन्स इथे ठरलेली आहेत. बरेचदा ती डाळ आणि पालेभाज्यांची असतात. मुगडाळीबरोबर पालक किंवा शेवग्याचा पाला, लाल टपोऱ्या चवळीबरोबर पालक किंवा मेथी, फळभाज्यांपैकी श्रावणघेवडा आणि बटाटा अशी ही यादी वाढवावी तितकी मोठी होईल.

अवरेकायी(ओले पावटे)च्या सीझनला बंगलोरात फार महत्त्व. साधारण डिसेंबर ते फेब्रुवारी भाजीवाल्यांकडेही जास्त अवरेकायीच

दिसते. ती उप्पिट्टामध्ये, अक्किरोट्टीमध्ये, मेलोग्रामध्ये(मोड काढून केलेल्या पातळ उसळीत) वापरतातच. इथल्या थालिपिठातही भाज्यांचा मुक्त वापर पाहिला. थालिपिठाला रोट्टी म्हणतात आणि कोणतं तरी एकच पीठ वापरतात. अक्किरोट्टीमध्ये एखादी पालेभाजी हमखास मिसळतात, पण त्यातही मेथी फार खमंग लागते. अशीच नाचणीच्या पिठाची रागिरोट्टीही करतात. त्यातही कांद्याच्याबरोबरीने गाजर भरपूर किसून घालतात. कधीकधी पालेभाज्याही मिसळतात.

रोट्टीप्रमाणेच इथला आणखी एक महत्त्वाचा रोजच्या खाण्यातला पदार्थ म्हणजे रागीमुद्दे. इथले लोक सहजगत्या हा पदार्थ खात असले तरी कुणीही सहज उठावं आणि मुद्दे हातात घेऊन खायला सुरुवात करावी अशी परिस्थिती नसते. सराव नसलेल्यांच्या गळी उतरायला भारी पडणारा हा पदार्थ. रागी म्हणजे नाचणीचा वापर इथे भरपूर करतात. नाचणीची आंबील, इडली, डोसे सर्रास करतात. अगदी सात-आठ महिन्यांच्या बाळालादेखील रागी हुरिहिट्टु किंवा माल्ट करून देतात.

पोह्यांचा वापर अनेक गोष्टींसाठी करतात. आपल्यासारखे फोडणीचे पोहे. त्यालाही अवलक्की उप्पिट्टु असंच म्हणतात. फोडणी अर्थात इथल्या पद्धतीप्रमाणे म्हणजे उडीदडाळ, चणाडाळ, सुकी मिरची, कढीलिंब हवाच हवा. मग टोमॅटो, गाजर किसून ह्या पोह्यांत घालतात. दुसरा पोह्यांचा प्रकार म्हणजे गोडाचा. भिजवलेल्या जाड पोह्यांत बारीक चिरलेला भरपूर गूळ, ओला नारळ आणि वेलदोड्यांची पूड घालतात.

इथल्या उप्पिट्टातही भरपूर भाज्या घालतात. श्रावणघेवडा, कोबी, कांदा, बटाटा, टोमॅटो, वाटाणे, ओले पावटे, कॉलिफ्लॉवर, थोडा चिंचेचा कोळ असंच बरंच काही काही घालतात.

साध्या इडलीप्रमाणेच इथे पुन्हा भाज्या घातलेली रवे इडली करतात. शिवाय कप इडली, तट्टे इडली हे प्रकार आहेतच.

लग्नकार्यातल्या जेवणाची पद्धत इथे काहीशी निराळी आहे. लग्नाच्या आदल्या दिवशी लग्नाला म्हणून वर मुलीकडे आल्यावर त्याचं पहिलं जेवण होळिगे म्हणजेच बेळेओब्बट्टु म्हणजेच पुरणाच्या पोळीचं असतं. ही पुरणपोळी तुरीची डाळ वापरून बनवलेली असते. ब्राह्मणेतर लोकांमध्ये बीगरऊटा म्हणजे व्याहीभोजनाला मांसाहारी खाना असतो. मटणाचा रस्सा आणि भात हा मुख्य मेनू या जेवणासाठी असतो. पक्वान्न म्हणून जहांगीर, जिलेबी, नारळाच्या पोळ्या, लाडू, गोड भात, चिरोटी आणि बदामहालू यातलंच काहीतरी असतं. सारे जिन्नस पंगत असल्यास केळीच्या पानावरच सुरुवातीलाच वाढलेले असतात. जेवण संपत आलं तरी नवनवीन पदार्थ समोर येतच असतात. मीठ-लोणचं, नारळ-डाळ्याची चटणी, दोन कोशिंबिरींपैकी एक मुगडाळ घालून आणि दुसरी हरभराडाळ घालून हवी. भरपूर नारळ घातलेल्या दोन भाज्या, एक गोज्जू. गोज्जू साधारणपणे अननसाचा, काकडीचा, भोपळीमिरचीचा किंवा कैरीचा असतो. पारंपरिक जेवणात पुरी किंवा पोळी नसते. मग पहिल्यांदा बिसिबेळेभात त्यावर तूप आणि वेफर्स/बुंदी घालून. त्या नंतर पुलाव, मग गोड भात असेल तर, नाही तर सार भात आणि शेवटी दही भात असा भातांचा क्रम ठरलेला असतो. लग्नाच्या जेवणात पायसा म्हणजे कसली ना कसली खीर असतेच. खसखस, शेवया किंवा साबुदाणा. कधी कधी वडे, ज्याला इथले लोक आंबोडे म्हणतात. जेवणाचा शेवट दही भाता(बुत्ती अन्ना)ने होतो. त्यात कधी कच्चा कांदा, कधी तळलेली सांडगी मिरची, कधी डाळिंबाचे दाणे, अर्धी कापलेली द्राक्षं तर कधी कधी टुटीफ्रुटीसुद्धा यात घालतात.

धार्मिक गोष्टींच्या आचरणाकडे येथील लोकांचा कल जास्त आहे. काही चालीरीती आपल्यापेक्षा निराळ्या आहेत. इथे नैवेद्याच्या पानातसुद्धा मीठ वाढतात. उपास म्हणजे फक्त भात वर्ज्य, बाकी सगळं चालतं. देवळात गेल्यावर प्रसाद म्हणून भाताचे, उसळीचे प्रकार असे तिखट पदार्थ वाटतात. संक्रांतीला दाणे, डाळं, गूळ, खोबऱ्याचा सुटा तीळगूळ करतात.


हे झालं घरगुती खानपानाबद्दल. दर्शिनी, उडुपा, सागर अशा प्रकारची नावं असलेली उभ्याने खायची सेल्फसर्व्हिस असलेली हॉटेल्स बंगलोरमध्ये सर्वत्र आढळतात. ह्या हॉटेलातील अननसाच्या स्वादाचा गोड शिरा(केसरी भात) हमखास सर्वांना आवडतो. मैद्याचा बनलेला मंगलूरी बोंडा, रवा-मैदा-कांदा घालून बनवलेला मद्दूरवडा फक्त इकडेच मिळतो. आपल्याकडे बटाटेवडा मिळतो तसा इथे उद्दिनवडा सार्वत्रिक आहे.

एकंदर बंगलोरच्या खाद्यजीवनात दूध-दुभत्याचं माहात्म्य कमी. दाट दूध, घट्ट कवडीचं दही, घणसर ताक वगैरे गोष्टी इथे फारशा प्रचलित नाहीत.

'आवागावागा एनेनो तोगोळ्ता इर्बेकु' असं साधं सोप्पं इथल्या खाद्यजीवनाचं सूत्र. उगीचच नाना प्रकारचे पदार्थ करत बसण्यापेक्षा काळु, सोप्पु, तरकारी सगळं एकाच हुळीत घालून ती भाताबरोबर खायची आणि वरून मोसरन्ना ही जेवणाची पद्धत. मधून मधून दाट डिकॉक्शनची कॉफी प्यायची. वाटण्याचं, रुबवण्याचं महत्त्व येथील पाकक्रियांमध्ये फार आहे. जवळजवळ प्रत्येक पदार्थाला वाटून काहीतरी लावावंच लागतं.

एक मात्र नक्की. येथील लोकांत मिसळून खास त्यांच्या शाकाहारी पदार्थांचा आस्वाद घेतला तरी उदरभरणाच्या यज्ञकर्मातील त्यांची आहुती चांगली सकस, वैविध्यपूर्ण आणि रुचिसंपन्न आहे याची खात्री पटते.

**- आशय, अमृत महोत्सव १९९५**



# तिसरी घंटा

- शरद ब्रह्मे

तिसरी घंटा होण्याअगोदर रंगमंचावर नेहमीच गडबड सुरू असते. हौशी नाट्यसंस्थांमधून तर ती जास्तच असते. 'स्पॉट्स बरोबर लागलेत की नाही? नेपथ्य लागलं का? माइक व्यवस्थित आहेत का? त्यांच्या जागा कोठे आहेत? आवाज सर्वांना पोचेल ना? प्रकाश योजना झाली का? निळे तांबडे जिलेटिन बरोबर लागलेत का? वेषभूषा, केशभूषा झाली का?' असे अनेक प्रश्न रंगमंचावरून इकडेतिकडे विचारले जात असतात. या प्रश्नांची उत्तरेही येत असतात, पण कोणाची उत्तरे कोणत्या प्रश्नाला हे ज्याचे त्यानेच जाणून घ्यायचे असते. ह्या सर्व धावपळीत अभिनय मात्र स्वस्थपणे चिंतन-मनन करीत बसून असतो. तो शांत असतो, कारण त्याची तयारी ह्या सर्वांअगोदरच झालेली असते.

नाट्यशास्त्राचा गाभा म्हणजे अभिनय. ती एक कलाच आहे. जशी संगीत, चित्रकला, नृत्य या कला. पण इतर कला आणि अभिनय कलेत तसा मोठा फरक आहे. राग सादर करण्यासाठी हार्मोनिमय, तबला इत्यादी साधने लागतात. चित्रकारालासुद्धा रंग, कुंचले, कॅनव्हास या सारख्या साधनांचा वापर करावा लागतो. नृत्यातदेखील इतर साथींचा उपयोग करावा लागतो. पण अभिनयात कलाकार स्वतःच स्वतःचे साधन असतो. तो स्वतः म्हणजे त्याचे शरीर आणि त्याचा आवाज.

नट हा अभिनय करतो म्हणजे तो रंगमंचावर सत्याचा आभास निर्माण करीत असतो, ज्यावर समोरचा प्रेक्षक विश्वास ठेवीत असतो. आणि हा आभास निर्माण करण्यासाठी नटाची कल्पनाशक्ती उत्तम असावी लागते. एखादे पात्र उभे करताना त्या व्यक्तिरेखेचा सर्वांगांनी विचार करून नटाने आपल्या शरीराचा व आवाजाचा वापर कसा करायचा हे ठरवायचे असते. आणि म्हणूनच अभिनय कलेत अभिनेत्याचे शरीर व आवाज ही महत्त्वाची साधने आहेत. शरीराद्वारे विचार व्यक्त करणे ही अभिनय कलेतील एक महत्त्वाची पायरी आहे. भयंकर थंडी, उकाडा, अंधार, उजेड, पाऊस, वारा ह्या सर्व गोष्टी तो केवळ आपल्या शरीराद्वारे प्रेक्षकांना दाखवू शकतो. शरीरामध्येही डोळे हे ह्या कलेत महत्त्वाचे माध्यम मानले जाते. कारण डोळ्यांइतके प्रभावी साधन दुसरे नाही. कोणतीही भूमिका साकार करताना नट डोळ्यांचा जास्तीत जास्त उपयोग करू शकतो. विचारवंत, अनपढ, दुःखी, आनंदी, प्रेमी, त्यागी, घाबरलेला, रागावलेला माणूस नट केवळ आपल्या डोळ्यांद्वारे उभा करू शकतो. हावभाव, हालचाली ही शरीराद्वारे दाखवणारी अभिनयाची आणखीही अंगे आहेत.

नटाचा आवाज हे अभिनयाचे शरीराप्रमाणेच दुसरे महत्त्वाचे साधन आहे. आवाजात विविधता-म्हणजे एक प्रकारचे वजन आणि लवचीकपणा-असणे आवश्यक असते. आवाजाच्या बाबतीत दोन महत्त्वाच्या गोष्टी लक्षात ठेवाव्या लागतात.. एक म्हणजे जे काही बोलतो आहोत ते प्रेक्षकांना ऐकू आले पाहिजे आणि दुसरे म्हणजे, ते समजले पाहिजे. आवाजामध्ये स्पष्ट उच्चार, शब्दांवरचे आघात, विशिष्ट ठिकाणी विराम(pause) घेणे हे महत्त्वाचे असते.

भरताने आपल्या 'नाट्यशास्त्रा'त नट व त्याच्या अभिनय कलेला महत्त्वाचे स्थान दिले असून अभिनयाचे चार प्रकार त्याने सांगितले आहेत. 'आंगिक', 'वाचिक', 'सात्त्विक' आणि 'आहार्य' हे ते चार प्रकार. शरीर, चेहरा आणि इतर हावभावांतून जो अभिनय केला जातो त्यास 'आंगिक' अभिनय म्हणतात. रंगमंचावर नट आपल्या मुखाद्वारे जे काही बोलतो तो 'वाचिक' अभिनय. 'सात्त्विक' अभिनय हा भावांवर अवलंबून असतो आणि तो रोमांच, अश्रू, प्रलय, कंप, हास्य, दुःख ह्या गुणांनी युक्त असतो. तर 'आहार्य' अभिनय हा नेपथ्याचा भाग समजला जातो; की ज्या द्वारे नट प्रेक्षकांना स्थळ, काळ, वेळ यांची सूचना देत असतो.

भरत म्हणतो, 'ज्यामध्ये सात्त्विक अभिनयाची अधिकता असते तो अभिनय श्रेष्ठ.'

अशा या जिवंत अभिनय कलेला प्रकाश, संगीत, नेपथ्य, वेषभूषा, केशभूषा हे अलंकार शोभून दिसत असतात. ते बोजड दिसणार नाहीत ह्याची काळजी अभिनयाने घ्यायची असते. ते तो जाणून असतो; म्हणूनच अभिनय शांत बसून तिसऱ्या घंटेपूर्वीची ही धावपळ बघत असतो.

म्हणूनच कोणीतरी प्रसिद्ध नटाने म्हटले आहे : 'Art arrives only by design: not by an accident.'.

**- जुलै १९९६**



# इश्क!

- प्रभाकर टोळ

इश्क या शब्दातच जादू आहे, एक नशा आहे. जिथे हुस्न आहे, तिथे इश्क आहे. इश्क म्हणजे प्रेम! पण ते साधंसुधं नव्हे, तर आसुसून केलेलं उत्कट प्रेम! स्वतःला झोकून देऊन केलेलं, सर्वस्व पणाला लावून केलेलं प्रेम म्हणजे इश्क!

बहुधा हे इश्क एकतर्फीच राहतं. कारण आपलं कुणी आशिक आहे हे हुस्नला बऱ्याच वेळा समजतच नाही किंवा हुस्न या इश्कला प्रतिसाद देत नाही. तेव्हा हुस्न नुसतं हुस्न राहत नाही, तर ते हुस्न की दीवार बनतं. इश्कमध्ये कामयाब होणं-न होणं हे महत्त्वाचं नाही, तर इश्क करणं हेच महत्त्वाचं. म्हणून इश्क फक्त दिलेर आणि उमद्या मनाच्या माणसानं करावं. सामान्य माणसाचं ते काम नाही. इश्क उच्च-नीच, गरीब-श्रीमंत, जातपात जाणत नाही.

हुस्न म्हणजे सौंदर्य! ते ही साधंसुधं नव्हे, तर दिव्य आणि अलौकिक! प्रत्येक शायरला आपली सखी अशीच अनुपम लावण्यवती वाटते. त्याला तिचं सौंदर्य खुर्शीद किंवा आफताब म्हणजे सूर्यासारखं तेजस्वी वाटतं. चौदहवी का चांदसारखं सुखद वाटतं, तर कधी त्याला ते नसीमसारखं म्हणजे सुगंधी पहाटवाऱ्यासारखं शीतल वाटतं.

हुस्न आणि इश्क या दोन शब्दांभोवती समस्त उर्दू शायरांनी शेरो-शायरीचे फार सुंदर आणि मनोहर गोफ विणले आहेत.

**इश्क नसेल तर हुस्नला कोण विचारतो?**
**हुस्न के हाथ में गर इश्क की तलवार न हो**
**कोई यूं झूम के सर देने को तैयार न हो।**

शायरांचा जमाना तसा कर्मठच. सारं हुस्न चिलमनच्या (पडदा) आड किंवा नकाबने (बुरखा) झाकलेलं आणि यदाकदाचित असं हुस्न कुठं दृष्टीस पडलं, तर तिकडे पाहून शेर म्हणणं म्हणजे लाहौल बिलाकुवत! प्रत्यक्ष प्राणाशी गाठ!

यालाही शायरकडे उत्तर आहेच. तो ते हुस्न स्वप्नात पाहतो. त्या स्वप्नात तो आपल्या कल्पनेप्रमाणे आपल्या सखीचं चित्र उभं करतो.

विंदा करंदीकरांनी म्हटल्याप्रमाणे

**प्रत्यक्ष भेटली का? नव्हती तशी जरूरी**
**स्वप्नात होत होत्या तसल्या अनेक भेटी!**

उर्दू शायर आणि मराठी शाहीर (शायर आणि शाहीर या शब्दांतलं साधर्म्य तसं लक्षणीयच) तसे दिलेर!

हुस्न दिसताच 'सुंदरा मनामध्ये भरली' म्हणून यांच्या शायरीला सुरुवात! शायरी संपेपर्यंत यांच्या लक्षात येतं की 'अरे ही तर कुणा भाग्यवंताची अमानत!' तर हे परत 'कोण सरदार हिचा भरतार?' असं कौतुकानं विचारायला तयार!

**भ्रमरापरी सौंदर्यवेडे आहो जरी ऐसे अम्ही**
**इश्कातही नाही कुठे भिक्षुकी केली अम्ही।**

हे भाऊसाहेब पाटणकरांचं म्हणणं उर्दू शायरला बिल्कुल नामंजूर. भर मैफिलीतून हाकलला गेलेला शायर सारा अपमान विसरून परत हुस्नच्या दरबारात हजर होतो.

**शायद मुझे निकाल के पछता रहे हैं आप**
**महफिलमे इस खयाल से फिर आ गया हूँ मैं।**

असं म्हणत परत इश्काचे गोडवे गायला तयार!

इश्कमध्ये दर्द आहे हे शायरला माहीत नाही की काय? पण त्याच्या मते या दर्दमध्येपण एक अमाप सुख आहे. फक्त त्यासाठी अंगी रसिकता (शौक) असावी लागते.

**नही इश्क का लज्ज़त दर्द से खाली**
**जिसे शौक है वो मजा जानता है।**

गालिबसारखा प्रतिभावान कविसम्राट तर मिश्किलपणे म्हणतो की या इश्कच्या भानगडीत पडलो नसतो, तर आमच्या हातूनसुद्धा काहीतरी मोठं कार्य झालं असतं.

**इश्क ने गालिब निकम्मा कर दिया**
**वर्ना हम भी आदमी थे काम के।**

इश्कचा मुआमला (मामला) खुषीचा आहे त्यात कदाचित जबरदस्त नुकसान होईल (जियाँ), घाटा होईल याची शायरला जाणीव आहे. पण इश्क करण्याच्या आनंदासाठी हा घाटा जाणून-बुजून ओढवून घेतलेला आहे.

**जियाँ है इश्क में, हम खुद भी जानते है मगर**
**मुआमला ही किया तो अगर जियाँ के लिए।**

मरीजे इश्क ने (प्रेमरोगाने) पछाडलेल्या शायरवर कधी कधी त्याच्या सुदैवाने योग्य उपचार होत राहतात. त्याच्या इश्कला हुस्नचा प्रतिसाद मिळत राहतो, पण काय परमेश्वरी लीला (रहमत खुदा) आहे पाहा, त्यामुळे व्याधी अधिकच गंभीर होत जाते.

**मरीजे इश्क पे रहमत खुदा की**
**मरज बढता गया जूं जूं दवा की।**

अशा कधी बऱ्या न होणाऱ्या आजाराची (आरिजा) बाधा आपल्या हृदयाला होऊ नये म्हणून कच्च्या दिलाचा शायर परमेश्वराला साकडं घालतो,

**अल्लाह बजाये मरजे इश्क से दिल को**
**सुनते है कि ये आरिजा अच्छा नहीं होता।**

इश्कच्या या आजारामुळे शायरच्या 'दिल'ची वाट तर लागलीच. शिवाय या इश्कची आणखी इनायत (कृपा) झाली, ती अशी की शायरची शुद्ध हरपली (होश जाईल) आणि अक्कल गहाण पडली (अक्ल रुख्सत)

**इश्क की जिसपर इनायत हो गई**
**होश जाईल अक्ल रुख्सत हो गई।**

कधी कधी शायर पुरताच दुर्दैवी ठरतो. तकदीरमध्ये इश्क आलं आणि वाट्याला आले ते दुखभरे आह (नि:श्वास) आणि वैराण वाळवंटासारखं जीवन (सहरा)!

**इश्क का मंसब लिखा जिस दिन मेरी तकदीर में**
**आह नक्दी मिली सहरा मिला जागीर में।**

इश्कच्या दरबारचा न्याय पण अजब आहे. जुर्मे महब्बतसाठी (प्रेम करण्याचा गुन्हा) अपराध्याला ना सजा ना क्षमा! गुन्हा करायला मोकळीकच!

**अजब था जुर्मे-महब्बत, कि जिस पे दिलने मेरी**
**सजा भी नही पाई और मुआफ भी न हुआ।**

इश्क सोपं नाही. फार फार कठीण आहे हे शायर मान्य करतो. पण त्याचबरोबर त्याची खात्री आहे की या मामल्यात हळुवारपणा दाखवला, तर कामयाबी दूर नाही.

**ये इश्क नही आसाँ हम ने तो ये जाना है**
**काजल की लकीरो को आँखों से चुराना है।**

अशा या खुशमिजाज शायरला इश्क म्हणजे सुंदर स्वप्नांचा अद्भुत प्रदेश (अकलीम) वाटतो. इथे निराशेचा अंधार नसून आनंदाचे प्रकाशकिरण पसरलेले आहेत.

**महब्बत खूबसूरत ख्वाहिशों की दीपमाला है**
**ये तो अकलीम है जहाँ उजाला ही उजाला है।**

आयुष्यभर इश्कच्या दरबारी चाकरी करणारा शायर उतारवयात गलितगात्र (खोखला) झाला, तरी त्याच्या चेहऱ्यावरचं तेज (अफ्जाईश) जराही कमी होत नाही. जमानाही त्याचं कौतुक करतो, वा! भल्या गृहस्था, (मियाँ) काय देखणे दिसून राहिलात, अहो ही इश्कची इनायत,

**खोखले जिस्म की ये अफ्जाईश**
**कितने मेहबूब हो गये हो मियाँ।**

आणि असे हे साठी ओलांडलेले आजोबा शायर आपल्या रुपेरी केशकलाप असलेल्या, सुरकुतलेल्या चेहऱ्याच्या पत्नीकडे पाहून म्हणतात,

**ए मेरे जुहराजबीं तुझे मालूम नही**
**तू अभीतक है हसीन और मैं जवाँ।**

प्रिये, अगं! तू मला ऐन विशीत असताना दिसत होतीस, तशीच शुक्रताऱ्याप्रमाणे (जुहराजबीं) आजही सुंदर दिसतेस हे तुला कधी जाणवलंय का? अगं, मी तरी मनाने अजून पंचविशी कुठे ओलांडलीये?

**- गणेशोत्सव १९९७**



# तिसरा अंक

- डॉ. सुलोचना जोशी

सकाळचे सव्वा नऊ वाजलेले. वसंतरावांनी नेहमीप्रमाणे ऑफिसला जाण्यासाठी तयार होऊन शेवटचेच एकदा आरशात पाहिले. टायची गाठ नीट केली. सुशीलाबाईंनी लंचचा डबा त्यांच्या बॅगेत ठेवला व ते नेहमीप्रमाणे ऑफिसला रवाना झाले. गाडीत त्यांच्या मनात संमिश्र विचार व भावना दाटून आल्या होत्या.

आज त्यांच्या ऑफिसला जाण्याचा शेवटचा दिवस होता. उद्यापासून ते सेवानिवृत्त होणार! आज संध्याकाळी ऑफिस सुटण्याच्या थोडे आधी सर्व सहकारी जमतील, सगळ्यात मोठे वरिष्ठ अधिकारी निरोपाचे भाषण करतील, त्यांना टायटनचे एक घड्याळ देण्यात येईल आणि मग त्यांच्या सदतीस वर्षांच्या प्रदीर्घ व्यावसायिक जीवनाला पूर्णविराम मिळेल.

आयुष्याच्या उताराला लागल्यावर जीवनात इतका मोठा फरक जेव्हा येऊन ठेपतो आणि दिनचर्येला जेव्हा इतकी संपूर्ण कलाटणी मिळते, तेव्हा कितीतरी माणसे गडबडून जातात.

सुरुवातीला तसे थोडे बरे वाटते. ऑफिसच्या व्यापातून सुटका झाल्याचा आनंद, कसले बंधन नाही, केव्हाही उठावे, केव्हाही खावे, प्यावे, झोपावे ही कल्पना जरी सुखद असली, तरी ती थोडा काळच टिकते. मग कंटाळा येऊ लागतो. इतर माणसे आपापल्या कामात असतात, त्यामुळे हळूहळू एकटे वाटू लागते.

सेवानिवृत्त झालेल्या माणसाच्या कंटाळवाण्या दिनक्रमाची सगळ्यात जास्ती झळ लागते त्याच्या पत्नीला. रोज कामाला जाणारा, दिवसभर घराच्या बाहेर राहणारा नवरा आता चोवीस तास तिच्या आजूबाजूला असतो. आणि मग तो तिच्या दैनंदिन व्यवहारात लक्ष घालू लागतो. आपले ते वसंतराव सुशीलाबाईंना म्हणतात, 'काय गं, हा आरसा तू इथे कशाला ठेवला आहेस? आणि टेलिफोनच्या टेबलावर विणलेला टेबलक्लॉथ कशाला?' आता पहा, कमालच आहे- सुशीलाबाईंना वाटते - हा आरसा आणि हा टेबलक्लॉथ गेली पस्तीस वर्षे आहे तिथेच आहे. गोष्ट नोकरांविषयी असो, काही खरेदीविषयी असो की घरकामाविषयी असो, नवरा सतत सल्ला देतच असतो! मग बायको त्रासल्यासारखी वाटू लागते कारण हा सगळा घरसंसार तिने त्याच्या 'बहुमूल्य' सल्ल्याशिवाय कित्येक वर्षे सुरळीतपणे चालवलेला असतो!

संस्कृतमध्ये म्हातारपणाला नुसते वृद्धावस्था न म्हणता कित्येकवेळा वृद्धापकाळ असे म्हटले जाते. तो 'अपकाळ', वाईटकाळ, प्रतिकूल काळ समजला जातो. जगद्‌गुरु श्री आद्य शंकराचार्य त्यांच्या चर्पटपञ्जरिका स्तोत्रात म्हणतात

यावद्वित्तोपार्जनसक्तस्तावन्निजपरिवारोरक्तः।
पश्चाद्धावति जर्जरेदेहे वार्तां पृच्छति कोपि न गेहे।।

(मनुष्य जोपर्यंत द्रव्यार्जन करीत असतो, तोपर्यंत त्याच्या कुटुंबाला तो प्रिय असतो. त्याचे शरीर कालमानाप्रमाणे जर्जर झाले की त्याला कोणीही विचारीत नाही.)

व्यवसायातून निवृत्त झालेल्या अनेक लोकांना आता आपला काही उपयोग नाही, मी पैसे मिळवीत नाही ना आता मला कोणी

किंमत देत नाही आणि कोणी माझा आदर करीत नाहीत अशा विचाराने खूप मनस्ताप होतो.

गेल्या काही वर्षात ज्येष्ठ नागरिकांकडे समाजाचे लक्ष वळले आहे. ह्या बाबतीत खूप विचार, संशोधनकार्य चालू आहे. पण गंभीर विचारक्षेत्रात अधिक खोल न शिरता मी आता एक गोष्ट सांगू इच्छिते.

परमेश्वराने जेव्हा हे जग निर्माण केले, तेव्हा त्याने प्रत्येक प्राणिमात्राला रंग, रूप, आकार दिला. तसेच त्याचे आयुष्यही निश्चित केले. मनुष्याला त्याने तीस वर्षांचे आयुष्य दिले. मनुष्याला काही हे आवडले नाही. ते देवाकडे गेला आणि त्याने त्याच्याकडे आणखी आयुष्याची याचना केली. देवाने तर सगळी वर्षे वाटून टाकली होती. तेव्हा त्याने गाढवाच्या आयुष्यातून काही वर्षे, कुत्र्याच्या आयुष्यातून काही वर्षे व माकडाच्या आयुष्यातून काही वर्षे काढून ती मनुष्याला दिली.

तेव्हा आता मनुष्यजीवनाची तीस वर्षे जी देवाने खरोखर त्यालाच दिलेली होती ती व्यवस्थित, आनंदात जगतो. त्याच्यापुढील अठरा वर्षे तो आपला कामाचा बोजा वाहत असतो. त्याच्यापुढील वर्षे तो कोपऱ्यात गुरगुरत बसतो व राखण करतो व त्यापुढे जगला, तर मग काही विचित्रच गोष्टी करत बसतो. कधी अगदी स्वस्थ बसून राहतो तर कधी एकदम उत्साह आल्यासारखे काहीबाही करीत राहतो. कधी लोकांना हसवतो, तर कधी त्यांना त्रासदायक होतो. कोणी त्याच्यावर रागावतात, कोणी त्याला हसतात, तर कोणी त्याची कीव करतात. ह्या गोष्टीतला विनोदाचा, तसेच उपहासाचा भाग लक्षात घेण्यासारखे आहे. ही झाली एक गोष्ट. पण अलीकडे जगात अत्यंत मान्यत पावलेले लेखक व तत्त्वज्ञानी डॉ. दीपक चोप्रा त्यांच्या Age

less Body and Timeless Mind मध्ये लिहितात... People don't grow old, when they stop growing, they become old.

काही तरी करत राहणे, काही तरी शिकणे, जगाकडे व आयुष्याकडे नवीन दृष्टीने पाहणे हा वृद्धावस्थेतही शरीर निरोगी ठेवण्याचा एकमेव मार्ग आहे. एक जुनी मराठी कविता आहे - 'रिकामे मधुघट' नावाची


मधु मागशि माझ्या सख्यापरि
मधुघटचि रिकामे पडती घरि।।
आजवरी कमळाच्या द्रोणि
मधु पाजिला तुला भरोनि
सेवा ही पूर्वीची स्मरोनि
करि न रोष, सख्या दया करि।।

ह्या नितांतसुंदर कवितेत प्रगट झालेली भावना अत्यंत खरी आहे. पण आजच्या जगात तितकेच खरे व आवश्यक तत्त्व आहे...

While adding years to your life
We must also add life to years!

मनुष्याच्या आयुष्यात सगळ्यात दुःखद भावना आहे एकाकीपणाची. आयुष्य उताराला लागायला सुरुवात झाल्यापासूनच जर पुढे येणाऱ्या वृद्धत्वाला सामोरे जाण्याची तयारी जागरूकपणे केली व स्वतःकडे - जगाकडे पाहण्याचा दृष्टिकोन थोडा बदलला, तर जीवनाच्या तिसऱ्या अंकाचीही सुखांतिका होईल.

**- नोव्हेंबर २०००**



# निसर्गवेध

- उल्हास राणे

'संगीत भावबंधन(?)'

वसंत ऋतूच्या रंगीबेरंगी नेपथ्याच्या पार्श्वभूमीवर ह्या संगीत नाट्याचा पहिला अंक सुरू होतो - 'प्रियाराधन!'

नांदी असते नरकोकिळाच्या पंचमाची. काही वेळा कोकीळ प्रजातींनुसार नांदीची सुरावट बदललेली. पावशाच्या दोन जाती 'धृपद-धमार' आळवतात, छोट्या आकाराच्या दोन जाती आर्त 'भैरवी'चा आधार घेतात, चातक हसत-खेळत 'ठुमरी'ची साथ धरतो, तर कोतवालच्यासारखी एक प्रजात संपूर्ण 'सरगम'च आळवते. हा पहिला अंक संगीतमय असतो. सकाळ, संध्याकाळ, ढगाळलेलं आकाश असल्यास दिवसा आणि चांदण्यारात्रीही ही गंधर्वगीतं चालू राहतात. हा अंक दोन-तीन आठवडे ते एक-दोन महिने एवढ्या कालखंडाचा होतो. नरकोकिळांची ही प्रियाराधनेची खडतर तपश्चर्याच असते.

या निसर्गनाट्यातला दुसरा अंक तिसऱ्या घंटेलाच सुरू होईल अशी खात्री नसते. कधी कधी आठ-दहा घंटांची वाट पाहावी लागते!

दुसरा अंक - 'स्वयंवर!' अनेक नरांच्या सुरावटीची, आळवणीची कसून कसोटी घेत मादी नराच्या संयमाची, एकनिष्ठतेची खात्री करून घेत असते. अनेक नर नाकारले जातात. त्यांची आळवणी चालू राहते - दुसऱ्या प्रेमिकेच्या आराधनेत. आणि ज्यांना होकार

मिळून ‘साखरपुड्याची अंगठी’ मिळते, त्यांनाही आपलं शृंगार नैपुण्य सिद्ध करावे लागते. सांगता येत नाही, कधी कधी राणीसाहेब शेवटच्या क्षणीही मांडवातून निघून जातात - दुसऱ्या सक्षम जोडीदाराच्या शोधात! पण स्वीकार झाला की मात्र शृंगार बहर येतो. झाडांभोवती फेऱ्या, एकमेकांना खाऊ भरवणं, आलिंगनं, चुंबनं, अगदी ‘झटके’सुद्धा! मग मिलनाची आतुरता दोघांनाही लागते. नाट्याला वेग येतो. ग्रीष्म ऋतूच्या मध्यावर बहुधा हा अंक संपतो.

तिसरा अंक - ‘संसार!’ दीर्घ अंक. पण इथे या नाट्याला कलाटणी मिळते. नायक-नायिकाच एकत्र येऊन ‘खलनायक’ बनतात. एक उत्कंठावर्धक गुप्त हेरकथा चालू होते. मिलनाचं सुख दोघांच्याही नसानसातून ओसंडत असते. मादीला पुढच्या जबाबदारीची (संकटाची?) जाणीव व्हायला लागते. शृंगारलीलांना ओहोटी लागते. माता-पिता स्वतःच, पिल्लांच्या जन्मआधीच त्यांच्यासाठी दत्तकघराच्या शोधाला लागतात. अर्थात अनेक गोष्टींची खात्री करून घेतात या शोधात. सुंदर, सुरक्षित घर, सक्षम पालक, बरेचसे स्वतःसारखे दिसणारे, कमीतकमी अंडीतरी साम्य असलेली. नर-मादी यांचं हेरखातं वेगाने कार्यान्वित होतं. वेळ कमी असतो. मादीला प्रसववेदना सुरू झालेल्या असतात. याच टप्प्यावर असलेलं दत्तकघर मिळायला हवं. शोध लागतो- आपापल्या प्रजातीप्रमाणे-कोकिळेला कावळ्याचं किंवा सातभाईचं घरटं सापडतं. इतर प्रजातीही आपापल्या आकारमानाप्रमाणे सातभाई, कस्तुर, हळद्या, खाटीक, नाचण, शिंपी, बुलबुल, सूर्यपक्षी अशा विविध पक्ष्यांची घरटी शोधतात. त्यांवर सतत लक्ष ठेवतात. आणि मग एका काहीशा बेसावध क्षणी, राखण नसलेल्या घरट्यांतील अंड्यात मादी आपलं अंडं घालते, कधी कधी मूळ अंड्यातील एक हळूच

बाहेर टाकून देऊनसुद्धा. परंतु नेहमीच अशी संधी मिळत नाही. पक्षी घरट्यांची राखण जागरुकतेने करत असतात. यावेळी नर कल्पनाशक्ती लढवतो. मादी जवळच लपून राहाते. नर विरुद्धबाजूने घरट्याकडे जातो. त्या आगंतुकाला आपल्या घरट्याच्या परिसरातून हाकलून देण्यासाठी मालक नर-मादी आवेगाने नर-कोकिळाचा दूरवर पाठलाग करतात. कोकीळ मादी या संधीचा फायदा घेऊन त्या असंरक्षित घरट्यामधील अंड्यांमध्ये आपलंही अंडं घालते व निघून जाते. कधी एखादं घरटं फार लहान असतं किंवा शिंपी, सूर्यपक्षी यासारख्यांचं छोट्या प्रवेशद्वाराचं असतं. कोकीळ मादी या अडचणीतून सहज मार्ग काढते. ती बाजूला कुठेतरी अंडं घालते आणि संधी मिळताच चोचीतून नेऊन - छोट्या घरट्यात ठेवून देते. मूळ मालक थकून-भागून, पण आपलं घरटं सुरक्षित असल्याच्या समाधानात परत येतात. घरट्यात घडलेल्या घुसखोरीची त्यांना जाणीवही होत नाही. अंडी उबवण्याचं काम जबाबदारीने सुरू राहतं. पण नेहमीच हे इतकं सहजसाध्य नसतं. अनेक वेळा मालक नर-मादीच्या पाठलागात कोकीळ नर जखमी होतो, घायाळही होतो. कोकीळयुगुल किंवा मादी आपल्या कार्यक्षमतेच्या खात्रीने आणि 'सुटलो एकदा' या भावनेने पुन्हा त्या घरट्याकडे फिरकतसुद्धा नाही. नाळ तुटली - संबंध तुटले. आपण आपल्या मार्गाला! इथे भावनाप्रधानांना थारा नाही. कोकीळ नर-मादी स्वतंत्रतेच्या आनंदात रममाण होतात. वर्षाऋतुला सुरुवात झालेली असते. पाऊसधारा या नाट्यावर शेवटचा पडदा टाकतात.

पण पडद्यामागे उपनाट्य सुरू झालेलं असतं. मूळ नायक-नायिका-खलनायक यांशिवाय. हे उपनाट्य जीवनातील सौंदर्याचं असतं, प्रेमाचं असतं, समर्पणाचं असतं. दत्तकघरातलं मातृ-पितृप्रेम

ओसंडून जात असतं. अंडी उबवणं, पिल्लं बाहेर येताच त्यांचं संगोपन करणं, घरट्याची राखण करणं या सर्व जबाबदाऱ्या काळजीपूर्वक पार पाडल्या जातात. पिल्लं मोठी होतांना कोकीळ पिल्लू थोराड-दांडगट दिसायला लागतं. पण मातृ-पितृप्रेम आंधळं असतं. कधी कधी त्याच्यावरच जास्त प्रेम केलं जातं. सातभाईसारख्यांच्या दत्तकघरात तर आई-वडलांबरोबर काका, मामा, मावश्यासुद्धा या संगोपनात भाग घेतात. आगंतुक-विचित्र दिसणाऱ्या, थोराड रूपाच्या पिल्लासाठीसुद्धा त्याच मायेने! सर्वच पिल्लं मोठी होतात, धडपडत घरट्याबाहेर येतात, उडण्याचा प्रयत्न करतात. एक त्रयस्थ पिल्लू मात्र रूपाबरोबरच त्याच्या आवाजानेही आपल्या वेगळेपणाची जाणीव करून देतं. तरीही दत्तक पालकांची माया आटत नाही.

आणि मग एके दिवशी ह्या पिल्लाच्या पंखात बळ येतं, आत्मविश्वास बळावतो आणि ते आकाशात भरारी घेतं, आपला 'अकेला' जीवनक्रम सुरू करायला! नाटकाच्या दुसऱ्या प्रयोगाच्या तयारीला!!

**- जून २००१**



# संपन्न वसुंधरा

- पद्मा साठे

'कित्ती सुंदर आहेत हे डोंगर! हळूच टिचकी मारली की कोसळेल वरची शिळा.' कसं आहे नं तुझं? कधी हा डोंगर आवडतो, तर कधी तो! अगदी प्रथम वणीचा-सप्तशृंगीचा डोंगर पाहिला, तेव्हा सुरेख सरळसोट कडा आवडला होता. अगदी कातीव, तेलमालीश करून गुळगुळीत केलेला, कोणीही सुळकन घसरेल असा! तेवढ्यात पाऊस आला आणि कडा धारांमागे लपला आणि स्वच्छ न्हाऊन निघाला. 'हा कडा वाघरू पौर्णिमेच्या रात्री १२ वाजता चढून जाते, चैत्रपौर्णिमेला पुजारी चढून जातो-वर झेंडा लावतो' वगैरे दंतकथा सुरू झाल्या. पण भिजलेले कपडे वाळवेपर्यंत सुस्नात कडा पाहणे हा हेलावणारा अनुभव होता. पायऱ्या उतरता उतरता बऱ्याच दूरवर असलेला तरीही समोरच पसरलेला, मध्यभागी दार असलेला अंगठ्यासारखा डोंगर आणि महादेवाच्या पिंडीसारखा त्याच्या शेजारचा डोंगर पाहता पाहता पठारावर केव्हा पोचलो ते समजलेच नाही.

तसेच तपोवनातला कातळ कित्ती आवडून गेला होता. पांडवलेण्यातील कातळाखालच्या पुष्करणीत थंडगार पाणी असायचे, पण आतल्या काळ्या गुहेत कसं वाटत असेल ह्या कल्पनेनेच छाती धडधडायची. सावनदुर्गचा कातळ असो अथवा श्रवणबेळगोळचा गुळगुळीत कातळ असो. अतिशय टणक, घट्टमुट्टपणा असावा तर असा. अर्थात ग्रॅनाईटचे दगड म्हणजे दक्षिणेचे वैभवच आहे! परंतु ह्या

अशा कठीण दगडांना पाझर फुटतो आणि अक्षरशः नद्यांचा जन्म होतो. आणि मनुष्याला आत कुठेतरी थक्क व्हायला होतं.

आमच्या गोदावरीचा उगम त्र्यंबकेश्वराच्या ब्रह्मगिरी डोंगरावर. पूर्णपणे डोंगर माथ्यावर जायचे, मग दुसऱ्या बाजूला थोडे खाली उतरायचे की नदीच्या उगमापाशी पोचतो. एवढ्या उंचावर पाणी तरी कुठून येते? अर्थात पावसाचेच. पण साठते कोठे? आणि दगडांच्या भेगाभेगांतून असे कसे पाझरत येते? अफाट अचंबा वाटत राहतो. पण पुढे हे पाणी गुप्त होते आणि डोंगराच्या पायथ्याशी असलेल्या कुशावर्त कुंडात येते. पण तिथून पुढेही ही बया गुप्तच. मग सरळ-निरळ वाहते तरी कुठून? म्हणून चक्रतीर्थाला गेलो, तिथून आमची ही गोदामाई झेप घेत घेत जाते समुद्रापर्यंत. चक्रतीर्थाला आहे काय? पत्थर, पत्थर आणि पत्थर-पांढरट-काळसर दगड, अग्निजन्य खडक आणि त्यातून खळखळ वाहणारे झरे.

अग्निजन्य खडक म्हणजे ज्वालामुखीतून आलेला पण आता थंड गोळा झालेला लाव्हारस. हा रस थंड होता होता डोंगर तर तयार होतोच, पण मधल्या भागात म्हणजे ज्वालामुखीच्या केंद्राभोवती तसराळ्यासारखा किंवा खोलगट बशीसारखा आकार तयार होतो. तिथे पाणी साठते. अशीच तळी सह्याद्रीच्या अनेक डोंगरांवर तयार झाली आहेत. ह्या खडकांमध्ये अर्थातच पृथ्वीच्या गाभ्यातून आलेली द्रव्ये, खनिजे भरपूर. लोखंड, मँगनीज, ॲल्युमिनियम वगैरे ह्यातील भेगाभेगांमधून वेगळेच आश्चर्य दिसते. ह्या 'डाईक'मध्ये एकदम वेगळ्या प्रकारचे धातू, खनिजे अथवा किंमती खडे आढळतात. क्वचित ह्या भेगा उन्हात चमकतातही. अर्थातच आतील घटकांमुळे.

सह्याद्रीला आडवा असलेला म्हणजे सातपुडा. सातपुड्यातल्या खडकात गंधकासारखी खनिजे आहेत, म्हणून झऱ्याचे पाणी गंधकयुक्त होते आणि त्यामुळे ठिकठिकाणी निर्माण झाले आहेत उनकदेव-गरम पाण्याचे झरे. एका पुरचुंडीत तांदूळ बांधून आम्ही एका उनकदेवात भात तयार केला होता आणि मिटक्या मारत खाल्ला होता.

गंधकावरून आठवण झाली, अभ्रक ह्या सुंदर खनिजाची. काचेसारखा दिसणारा पातळ-पातळ थरांचा, सहजच अलग होणारा, चुरल्यास चमचमणारा असा अभ्रक म्हणजे सृष्टीची लहान मुलांना भेटच.

माणसाला फार आवडणारा दगड म्हणजे संगमरवर. संगमरवरासाठी आपल्याला गाठावा लागतो राजस्थान. म्हणजे सातपुड्याचा सख्खा भाऊ विंध्याद्री ओलांडून अरवली पर्वताच्या पायथ्याशी पोचायचं, इथल्या खडकांची मजाच आहे. प्रथम थरांचे खडक तयार झाले म्हणजे समुद्राखालील साका-गाळ ह्या चिखलात भूकंपामुळे खनिजे अक्षरश: गाडली गेली. प्रचंड दाबामुळे चुनखडी तयार झाली. पुढे पृथ्वीतील लाटांमुळे डोंगरांची माळ एकमेकांवर कलंडली. झालरीसारखे अथवा घडीचे डोंगर तयार झाले. तेव्हा चुनखडीचा झाला संगमरवर. ह्या डोंगरभागांमध्ये एकतर प्रेम उद्‌भवून ते एकमेकांत गुंतून पडतात किंवा भांडून अलग होतात, तेव्हा परत स्फटिक तयार होतात आणि अगदी नवीन खनिजे निर्माण होतात. बहुतेक ह्या प्रकारच्या (metamorphic rocks) दगडांमध्ये वेगवेगळे धातू मिळतात आणि अतिशय मौल्यवान खडे मिळतात.

थरांचे खडक आणि अग्निजन्य खडक साधारण वयोमानाला सारखेच. त्याच्या आगेमागे तयार झालेल्या टेकड्या म्हणजे आपल्या

पूर्वोत्तर प्रदेशात असलेल्या गारो, खांसी, जैंतिया ह्या टेकड्या. ह्या टेकड्या सहा बहिणींत विखुरल्या आहेत. त्यातल्या मेघालयात नैसर्गिक गुहा तयार झाल्या आहेत. अनेक शतकानुशतके चुनखडीचे थर साठले. काही काही थर तर ३५० फूट खोल आहेत. गरम आणि दमट हवा आणि सर्वात जास्त साका साठण्याचा गुण त्यामुळे गुहा तयार होतात. काही फुटकळ गुहा आहेत मेघालयातल्या मध्यवर्ती दगडांमध्ये, त्यातली एक फुटकळ गुंफा आम्ही पाहिली. ह्या गुंफेतून आरपार जाता येत होते, वरून खालून पांढरे सुळके, वाहणारं पाणी, काळाकुट्ट अंधार, मध्येच जेमतेम वाकून जाता येईल अशी जागा; तर काही ठिकाणी आरामात बैठक मारून दोघाचौघांना गप्पा मारता येईल अशी औरसचौरस जागा. मोठा मजेदार आणि चित्तथरारक अनुभव असतो हं हा!

मेघालयाच्या पठाराच्या दक्षिणेच्याकडेला २०० कि.मी. हा गुहांचा पट्टा तयार झाला आहे. जैंतिया, खांसी, गारो ह्या टेकड्यांमध्ये साधारणपणे ३-४-५ कि.मी. लांबीच्या, ३० मी. उंचीपर्यंतच्या मोठ्या गुहा आहेत. एक सर्वात प्रसिद्ध आहे, आडवी-उभी चोवीस दारं असलेली, २१.५ कि.मी. लांबीची. पण सर्वात मजा आहे ती इथल्या नदीची, अतिशय प्राचीन नदी. ५ कि.मी. लांबीची आहे. एका दारातून येते आणि दुसऱ्या दारातून जाते. ह्या गुहेत खूप सुंदर तलाव आहेत. जैंतिया टेकडीतील ह्या गुहेचे नाव आहे लुम्शनान्ग्. इथे वाळूचे दगड विपुल प्रमाणात मिळतात. आसामच्या टेकड्यांच्या पठारातून आपल्याला पेट्रोलही मिळतं.

सगळ्यात तरुण आहे हिमालय आणि अतिशय सुंदरही. इथे मौल्यवान दगड मिळतात. तसेच जास्ती करून अश्मिभूत अवशेष मिळतात. हिमालयातून निघून नेपाळात आलेल्या गंडकी नदीत

मिळणाऱ्या काळ्या कुळकुळीत गोट्यांना आपण शाळिग्राम म्हणतो. हा हातात मिळाल्यावर गंडकी नदी वेगळीच भासू लागते. भूकंप होऊन सागराचा तळ वर-वर-वर उचलला गेला, प्रचंड उत्पातात समुद्रातील छोटे-मोठे प्राणी गाडले गेले. वाळूत, माती चिखलाचे प्रचंड दाबाने दगड झाले. त्यावर अनेक वर्षं बर्फाचे थर साचत गेले. पुढे बर्फ वितळला, हिमनदी तयार झाली. तिने खाली येता येता आपल्याबरोबर दगड आणले. त्यांचे कानेकोपरे घासले गेले आणि झाले गोलसर गोटे. ते नदीच्या पात्रात आले. त्यातलाच एक गोटा मी हातात घेतला. त्याला चीर होती म्हणून फोडून घेतला आणि आतमध्ये समुद्रकिड्याचा ठसा उमटलेला. अतिशय पुरातन काळाशी माझ्या हातातल्या दगडातून, गोट्यातून भेटलेलं नातं! लखलखतंय विलक्षण!

हिमालयाला एकदा भेट दिली की वारंवार भेट द्यावीशी वाटते. कुलू-मनालीतील डोंगरांमागचे डोंगर अथवा नैनीहून दिसणाऱ्या पर्वतरांगा, अथवा गंगोत्री-जम्नोत्रीकडे जाताना भेटणारे धबधबे, कांचनगंगेची सकाळच्या वेळी चमचमणारी बर्फाची सोनेरी शिखरे, संध्याकाळी गर्द जांभळ्या रंगात डुबणारी शिखरे, प्रत्येक भाग आपल्याला 'ये बाई, परत ये' म्हणून बोलवत असतो.

हिमालयातून खूप नद्या येत असतात, पण सर्वात थक्क करते ब्रह्मपुत्रा म्हणजे लुईट अथवा लोहित म्हणजे लाडकी. अती विशालपात्र, पाण्यावर एक प्रकारचे अखंड धुके आणि भोवताली वाळू. मनात येते, एवढं कुंवार गोड पाणी आहे आपल्याजवळ, आपल्याला कधीही-काहीही कमी पडणार नाही. तशाच नद्या आहेत गंगा, यमुना वगैरे. त्या खाली येताना भोवतालचा खडक कापत येतात, खळाळत येतात, मध्येच छोटे-मोठे धबधबे तयार होतात.

पण खडक कापून वाहणारी वैभवशाली नदी म्हणजे नर्मदा. भेडाघाट म्हणजे संगमरवरी दगडाची कपार. विशाल डोहातून वाहत येणारी नर्मदा तुम्ही चांदण्यात पाहा, अवसेला पाहा, पुनवेला पाहा अथवा टळटळीत दुपारी पाहा. दरवेळेस वेगळेच सौंदर्य घेऊन तुमच्यासमोर हजर नर्मदा आणि संगमरवर.


ह्या नद्यांनी केलेली सरोवरे तर असंख्य आहेत. शिवाय झऱ्यांमुळे झालेली तळी, सरोवरेपण अमाप आहेत. आणि अगदी वेगळ्याप्रकारे एखादे सरोवर तयार होते. उल्कापात झाला आणि लोणार सरोवर महाराष्ट्रात तयार झाले. लोणारच्या विवराचा व्यास आहे १८३० मी. इथे बेसॉल्ट खडक आहेत. इथे १० ते १५ से.मी. लांबीचे काचेचे तुकडे आढळून आले आहेत. अशा प्रकारचे तुकडे अशनींच्या पतनामुळेच तयार होऊ शकतात. इथे एक मॅस्केलानाइट खनिज मिळते. हेही बेसॉल्ट खडकात उल्कापातामुळे तयार होते.

तलावांपाठोपाठ आठवण येते धबधब्यांची आणि पाण्याच्या धारांमागे असणाऱ्या गुहांची. काका कालेलकरांचा जोगच्या धबधबा म्हणून एक अप्रतिम लेख होता. त्यात अशा गुहांमध्ये आदिवासी राहतात असा उल्लेख होता. त्यामुळे प्रत्येक धबधब्याच्या मागे असणाऱ्या ह्या खोल्या पाहायचा छंद लागला.

आपल्या भोवतालच्या परिसरात नद्या, डोंगर एवढंच येतं असं नाही, तर लांबच लांब पसरलेली वाळवंटे येतात. वाळूच्या लाटाच्या लाटा तयार होत असतात. आजचा वाळूचा डोंगर उद्या पसार होतो. वाळूचे रंग तरी किती? कन्याकुमारीला गेल्यावर तीन प्रकारची वाळू हातात येणारच. तशीच माती तरी कित्ती प्रकारची काळी, लाल, चिकण, भरड वगैरे वगैरे.

केवढी संपत्ती दान करते पृथ्वी! परत कुठे तरी ज्वालामुखी भडकतो, समुद्रात अथवा जमिनीत भूकंप होतात, उलथापालथ होते आणि ह्या प्रत्येक प्रक्रियेतून वसुंधरा देत असते आपल्याला अनवट रत्ने, उपयुक्त धातू आणि आगळी वेगळी आश्चर्येसुद्धा!

**- गणेशोत्सव २००१**



# झुळूक

- उदय पळनिटकर

पायाला झोंबरं वारं लागलं म्हणून पांघरूण नीट केलं. झोप चाळवली गेली होती. सहज खिडकीबाहेर पाहिलं. टिपूर चांदणं पडलं होतं. तसाच पडून राहिलो. थंडी तर अफाट होती. तरी म्हटलं पाहूया तरी. निर्धाराने उठलो. हळूच दरवाजा उघडला आणि बाहेर ओसरीवर आलो.

गार हवा सर्वांगाला झोंबली. शाल लपेटून घेतली आणि बसलो. समोर बघितलं. झाडंही जणू झोपी गेली होती. एक पानसुद्धा हलत नव्हतं. एक वाळकं काटेरी झाड अस्ताव्यस्त पसरलं होतं. वाळकं कसलं, चांदण्यांनी भरून गेलं होतं. मला हेवा वाटला. चांदणंही त्यानं असं पांघरून घेतलं होतं का चांदण्यालाच त्याची कीव आली होती? मधूनच एखादा रातकिडा रात्र असल्याची जाणीव करून देत होता. सारं कसं शांत, स्तब्ध. तरीही किती बोलकं.

भाताच्या शेताकडे पाहिलं. पेंगुळलं होतं. मधेच एखादं इवलंसं पाखरू जणू अजून निवारा शोधत इकडून तिकडे फिरत होतं. रात्री रडणाऱ्या बाळासारखं. पानापानावर चकाकणारे दवबिंदू दिसू लागले. येणाऱ्या सूर्याचं ऊन प्यायला तयार होत होते.

टप्प करून डोक्यावर काहीतरी पडलं. नाकतोडा होता. छोटासा. त्यालाही झोप येत नसावी. मी जागा दिसलो. आला गप्पा मारायला.

मीही त्याला हाकललं नाही. बसू दिलं. मलाही सोबत आहे असं वाटलं. परत सगळीकडे पाहू लागलो. मलाही जाणवलं. सगळे माझ्याकडेच पहात होते. नारळाची झाड, वाळक्या फांद्या, चांदण्या, भाताची पाती, दवबिंदू आणि ... चंद्रकोरसुद्धा! एवढीशी झाली होती. तरी किती रुबाबदार! पृथ्वीच्या सावलीनं लपेटून टाकलेली. छे! सावलीलाच तिने कवेत घेतलं होतं. त्या चंद्रकोरीला हेही माहीत नव्हतं की हीच सावली तिला लवकरच पूर्ण बुडवून टाकणार आहे.

मध्येच वाऱ्याची झुळूक आली. थोडीशी पानं हलली. एक वाळकं पान अगदी आवाज न करता गळून पडलं. तरी पडल्यावर आवाज आलाच! हो, अगदी हुश्श केल्यासारखा. बास झालं बाबा आता! असं म्हणणारा.

भाताच्या पात्यावरसुद्धा एक हलकीशी लाट सळसळली. काही दवबिंदू घसरून पडले. फारच पेंगुळले होते. सूर्याची वाट बघता बघता डोळे मिटून गेले होते. पुन्हा शांतता. काही आवाज नाही, हालचाल नाही. किती वेळ गेला कोण जाणे.

परत आकाशाकडे नजर टाकली. चंद्रकोरीशी गप्पा मारायला काही ढग जमले होते. एखाद्या सुंदर तरुणी भोवती पोरांनी कोंडाळं करावं तसे. तीही अलगद सुटून गेली. स्मितहास्य करत. ढग मात्र तसेच राहिले. हिरमुसलेले.

मलाही हसू आलं. कोणाशी तुलना ही. फारच कवी मन झालंय आपलं. पण खरंच, ते वातावरणच तसं होतं. स्वप्नमय होतं.

प्रत्येक झाडावर, प्रत्येक पानावर, भाताच्या शेतातल्या प्रत्येक पात्यावर, वाळक्या फांदीवर, सुस्त पडलेल्या दगडांवर काहीतरी विषय

होता. मूक असला तरी बोलका होता. शांतता स्तब्ध करणारी, एखाद्याला किंचित भयावह वाटावी अशी होती. होय, शांततेची देखील सवय असावी लागते. नाहीतर ती सुद्धा असह्य होते.

मला हे चित्र तसं परिचयाचं होतं. त्यामुळे मी पटकन समरस होऊ शकलो. प्रत्येकाला ते जमेलच असं नाही. तसाच मी शांतपणे बसून राहिलो. शिंक येईल असं वाटलं. प्रयत्नपूर्वक दाबून टाकली. म्हटलं शिंकेच्या आवाजाने हे चित्र दचकायला नको. तरी जरा हालचाल झाली. नाकतोडा बावरला. उडी मारून कुठेतरी गेला. पण क्षणातच परत आला.

मी परत परत ते चित्र मनात साठवून ठेवायचा प्रयत्न करत होतो. दर दोन मिनिटाला ते बदलत होतं. सगळे तेच, तसेच होते. माझं विचारचक्र बदलत होतं. अगण्य उपमा सुचत होत्या. माझ्या उजव्या बाजूला किंचित हालचाल जाणवली. काहीच दिसत नव्हतं. काही वेळ तसाच गेला. पुन्हा तोच भास. पुन्हा नीट निरखून पाहिलं. अस्पष्ट हालचाल दिसली. ओहो, एक कोळी दोन फांद्यांच्या बेचक्यात जाळं विणण्यात गुंग झाला होता त्याला वेळ समजत नव्हती का? का सकाळच्या भोजनाची तयारी करू लागला होता बेटा. त्याचं काम शांतपणे चालू होतं. केवढी एकाग्रता, सुबकता, कष्ट. पण हे सगळं मलाच जाणवत होतं. त्याला काहीच नाही.

पुन्हा माझ्या दोस्तानं डोक्यावरून खांद्यावर उडी घेतली. स्वारी निघाली होती. निरोप घ्यायला आली होती. पूर्वेकडे किंचित रंग बदलू लागले होते. अचानक जाणवलं. सगळे जणू डोळे किलकिले करू लागले होते. मला फार वाईट वाटलं. हे सगळं आता पुसलं

जाणार. कितीतरी गोष्टी आठवायचा प्रयत्न करू लागलो. आठवेचना. पण मन मात्र तृप्त होतं. जणू काही खास माझ्यासाठीच एक कार्यक्रम रंगमंचावर सादर झाला होता.

मी पण अंगावरची शाल काढू लागलो. येणाऱ्या सूर्याचं ऊन प्यायला.

**- एप्रिल २००२**



# मी, पु.ल. आणि बजाज स्कूटर

- मधुपन

'टिं-ग टिं-ग...' दूरध्वनीचा आवाज आला. रात्रीचे ९.३० झाले असतील. आम्ही सगळे जेवायला बसलो होतो. फोनचा आवाज आला की आमच्या घरी फोन उचलणारी आमची सौभाग्यवती. तिने धावत जाऊन फोन उचलला.

'हॅलो, हॅलोऽऽ,' 'घ्या. तुमचाच की. फूलंदा, मनचंदा असं काहीसं म्हणाले ते.' असं बोलता बोलता तिने मला फोन दिला.

'हॅलोऽ, मी अप्पण्णा सरदेशपांडे.' तिकडून आवाज आला, 'मी पु.ल.दे, पु.ल.देशपांडे. तुम्ही अप्पण्णा देशपांडे ना?' मी म्हणालो, 'नाही, मी अप्पण्णा सरदेशपांडे.'

'सॉरी. तेच ते. सरदेशपांडेच. मला वास्तुबद्दल तुमचा सल्ला हवा होता. इतक्यात तुमचा दौरा पुण्याला आहे का? मी असं ऐकलंय की तुम्ही कामानिमित्त पुण्याला येत असता. असं समजू नका की मी तुम्हाला फुकटात बोलावतोय. माझी तशी इच्छा नाही. मी कट्टर देशस्थ. तुमचे जे चार्जेस असतील ते द्यायला मी तयार आहे. पण मला तुमची मदत हवी आहे.'

मला सुचेना. कळेना, मी कुणाशी बोलतो आहे, काय बोलतो आहे. फोनवरती नुसतं 'हो, हो' करत होतो. आमची सौ माझा चेहरा पाहून म्हणाली,

'काय हो, कुणाचा फोन? नीट बोला की. असं चाचरत का बोलताय? काय, काय झालंय काय?'

तिला हातांनी 'थांब थांब' करत 'पु.ल. देशपांड्यां'चे आमंत्रण मी स्वीकारले. शेवटी 'तुम्ही पु.ल. देशपांडे, मी तर आज पुलकित सरदेशपांडे' असं म्हणत फोन ठेवला.

एक दहा सेकंद गप्प बसलो. आनंदाच्या फैरी अंगावर झडल्यासारखं वाटलं. रोमांच उभे राहिले. डोळ्यांपुढे पुलंचं चित्र जिवंत उभं होतं. त्या धक्क्यातून सावरून सावकाश तोंड उघडलं आणि सौला सांगितलं, 'तो फोन कॉल होता पु.ल.देशपांड्यांचा. कित्ती सुदैवी मी, ते बोलावतात म्हणजे! तुझ्याकडे पहिल्यांदा आलेलं लक तू मला देऊन टाकलंस.' ती म्हणाली, 'अंऽऽ कोण? पु.ल. देशपांडे? खरं की काय?' आमच्या सौभाग्यवतीला खरं वाटेना. तिने आनंदाने विचारले, 'पुण्याला जाणार काय? मी पण येणार. मलाही त्यांना भेटायचं आहे.' एखाद्या उत्सुक, लहान मुलासारखी ती बोलत होती.

ठरवल्याप्रमाणे पुण्याला जायची वेळ आली आणि त्याप्रमाणे पुलंना कळवून मी सौभाग्यवतीला घेऊन पुण्याला निघालो. त्यांनी सांगितल्याप्रमाणे दुपारी चार वाजता रिक्षा करून त्यांच्या घराकडे निघालो. 'पु.ल.देशपांड्यांचे घर' म्हणताच ऑटोवाल्याने मीटर फिरवलं आणि न विचारता-न बोलता १५ मिनिटात सरळ त्याने त्यांच्या घरासमोर रिक्षा उभी केली. गेटचा आवाज येताच 'पुलं' त्यांच्या मुख्य दरवाजात उभे असलेले दिसले. 'या, या. You are welcome to Pune.' आम्हाला त्यांनी आत बोलावलं. 'पुणेरी' चहापाण्याचं

'देशस्थी' आदरातिथ्य झाले. आमची सौ आणि पुलंच्या सौभाग्यवती बोलत बसताच आमची दोघांची वास्तुबद्दल चर्चा सुरू झाली. माझा वास्तुवरचा अभ्यास आणि त्याचं प्रायोगिक Implementation, त्यातून साधलेले त्याचे परिणाम हे सगळं ऐकून त्यांना पटलं असावं की हे शास्त्र नक्कीच वैज्ञानिक आहे. विज्ञान याला पूरक आहे. माणसाचे त्रिदोष का येतात, रजस-तमस आणि सत्त्व हे प्रकृतीशी कसे संबंधित आहेत, हे ऐकून त्यांना समाधान वाटलं. त्यांनी मला घर पाहायला सांगितलं. प्रवेशद्वारापासून परसापर्यंत, देवघरापासून विचारकक्षापर्यंत (toilet पर्यंत) मी सूक्ष्मपणे निरीक्षण केलं. माझ्याकडे असलेल्या होकायंत्राप्रमाणे stethascope of an architect - माझ्या notes काढल्या. वास्तुच्या सल्ल्याबद्दल टिपणं केली.

सुंदर सजवलेल्या डायनिंग टेबलाशी बसून आमची चर्चा सुरू झाली. व्याकरणासहित सुश्राव्य, अस्खलित, शुद्ध मराठी भाषा पुलंच्या तोंडून ऐकताना मला माझ्या मराठीबद्दल कसंतरीच होत होतं. मात्र माझी लिंगभेद नसलेली व्याकरणशुद्ध(?) कानडीची बहीण असलेली मराठी त्यांनी समजून घेतली. वास्तुशास्त्राप्रमाणे योग्य तो सल्ला मी त्यांना दिला.

आता मोघम गप्पा सुरू झाल्या. तुम्ही मूळचे कुठले? सरदेशपांडे आडनाव कुठून आलं? सर ही पदवी कुणी दिली? बऱ्याच विषयांवर इकडच्या तिकडच्या गप्पा झाल्या. त्यांनी आमच्या कुटुंबाबद्दल विचारलं. 'घरी कसं काय? सगळं ठीक?'

'सगळे आनंदात आहोत' मी उत्तर दिलं.

'म्हणजे सुखरूप चाललेली बजाज स्कूटरच म्हणा ना!' ते म्हणाले.

मी पटकन म्हणालो, ‘नाही, नाही. आमचा संसार म्हणजे एका चड्डीचे दोन पाय.’

माझ्या उत्तराने ते चकित झाले. १-२ सेकंद त्यांनी माझ्याकडे पाहिलं. चड्डी आणि संसार याबद्दल त्यांच्या गोंधळ उडाला असावा. म्हणाले, ‘आम्ही सुखरूप चाललेल्या संसाराची तुलना गाडीच्या दोन चाकांशी करतो. पण तुम्ही मात्र...?’

‘पुल साहेब, तुम्ही म्हणता ते ९९ टक्के खरं आहे. पण १ टक्का बजाज स्कूटरच्या तुलनेत गोंधळ आहे.’

‘गोंधळ? अहो, त्यात कसला गोंधळ? सरळ जाणाऱ्या दुचाकी गाडीचा गोंधळ कसला?’

‘हो, गोंधळ आहे,’ मी म्हणालो.

थोडा वेळ गप्प बसून माझ्याकडे ते बघत राहिले. ‘अप्पण्णा, तुमच्या म्हणण्यात काहीतरी गडबड आहे. वास्तुसंबंधी काही आहे काय?’

‘वास्तुशास्त्राचा नाही, पण एका वस्तूचा संबंध आहे,’ मी सांगितले.

‘कुटुंब म्हणजे २ चाकांची स्कूटर म्हणता येत नाही का?’

‘अहो पुलं साहेब, स्कूटरशी तुलना कशी होईल?’

‘म्हणजे तुम्हाला म्हणायचंय तरी काय?’

‘अहो, स्कूटरशी तुलना कशी होईल? स्कूटरला दोन चाकांबरोबर एक स्टेपनीपण असते की.’

एवढं म्हटल्याबरोबर पुलं आणि त्यांच्या सौ जोरजोरात हसायला लागले. हसता हसता माझा हात चहाच्या कपाला लागून कप खाली पडला.

‘कप, कप काय म्हणता आहात? उठा, सकाळचे ७ वाजलेत. आज मोलकरीण येणार नाहीये. उठा!’ आमची सौभाग्यवती एका हातात चहाचा कप आणि दुसऱ्या हातात केरसुणी घेऊन उभी होती!

**- गणेशोत्सव २००६**



# तवा-तवारी

- अलका कुंटे

कोणतीही सुट्टी-मग ती उन्हाळ्याची असो का ख्रिसमसची-मला प्रवासाची आठवण होते. लहानपणी सुट्टी लागली की गावाला जायचं. उन्हाळ्यात आजोळी आणि थंडीत निरनिराळी ठिकाणं-गावं पाहायला. तेव्हा फिरकीचे तांबे आणि होल्डॉल्स इतिहासजमा झाले होते-पण प्रवासात तेवढीच मजा असायची!

पुढे मुलं शाळेत जायला लागल्यावरही सुट्ट्यांनुसार प्रवास असायचा आणि असं जाणवलं की दरवर्षी प्रवास जास्तच 'चित्तथरारक' होत गेला! चोवीस तासांचा प्रवास, पाण्याच्या बाटल्या-सुरया, २-३ वेळचं खाणं-जेवण, च्याऊम्याऊ, कंटाळा आला, तर खेळायला पत्ते, चित्र काढायला वह्या, खडू, फारच कंटाळा आला की पानं फाडून बोटी-विमानं आणि जेवणं झाली की सांड-लवंड अन् ड्रायक्लीनिंगला तेच! थंडीत स्वेटर्सचा ढीग.

मी गावाला निघाले की आई म्हणायची, 'तवा-तवारी, दो मन जवारी। उसपे बैठी बिवी की सवारी। आगे हसन, पीछे हुसेन। अन् जागा असेल तर मीबी बसेन।' तसं आमचं असायचं. परिस्थिती इतकी 'बिकट' असायची की गावाला जायचा मुलांचा उत्साह नकोसा वाटायचा. ''आई, क्रोसिन आणलं का? मागच्या वेळी तुझं डोकं दुखलं आणि ताप आला...'' ''आई गं, या वेळी गाडी लेट झाली नं

आपली की फळ-फूल-नाव-गाव खेळायचं, स्क्रॅबल नको प्लीज,...''
शुभ बोल रे नाऱ्या... मला रडूच यायचं.

पण जमाना बदलला! आता पाण्यासाठी धावाधाव होत नाही प्रवासात. सगळीकडे 'बिसलेरी' मिळतं. लेबल असलं की झालं, मग भरेनात का ते तिथल्याच नळावर! 'स्टेशनवरचं सगळंच घाण' हा विचार बदलतोय(?) आजकाल एसीमुळे धूळ-धूर काहीच नसतं आणि 'रोज-रोज काही आपण जात नाही' असं म्हणत लोकं विमानाने जातात. मग travel light ओघानंच आलं. शिवाय सगळीकडे सगळं मिळतं. त्यामुळे आता गावाला जायचं म्हटलं की एक-दोनच डाग होतात आणि पूर्ण प्रवासात मी 'काहीतरी विसरलं असलंच पाहिजे' अशी चिंता करत असते!

पण तसंही नाही. जमाना पुन्हा बदलतोय. नुकताच मुलाचा एक मित्र अमेरिकेला शिकायला गेला. त्याचं कौतुक करायला - टाटा म्हणायला मीही गेले एअरपोर्टवर आणि त्याचं सामान पाहून..... मला पुन्हा रडू यायला लागलं. इतकं सामान? एक बॅग वह्या-पुस्तकांची (तिथे महाग म्हणून) एका बॅगेत कपड्यांचे २० सेट्स् (हे त्याच्या आईने सांगितलं) एका बॅगेत कुकर, भांडी, मसाले, डाळ-तांदूळ (तिथे अभ्यास करणार का स्वैपाक?) दोघा-दोघांनी हात लावल्याशिवाय इंचभरही सरकणार नाहीत-असं वजन! शिवाय एक जरा मोठीच हँडबॅग होती... कागदपत्र, तिकीट, पैसे, गाण्यांच्या सीड्या, थोडा खाऊ, लाडू वगैरे आणि थोडे कपडे.... म्हटलं हे कशाला? तर म्हणे, समजा, कुठे फ्लाइट लेट झाली, बॉंब-स्केअर

वगैरे काही झालं आणि कुठल्या एअरपोर्टवरच १-२ दिवस अडकून पडावं लागलं, तर असावेत.... तहान लाडू-भूक लाडू....

मनात म्हटलं, एकूण काय पुन्हा तेच.... तवा-तवारी....

**- फेब्रुवारी २००७**



# ।। कालाय तस्मै नमः ।।

- जयंत कोल्हटकर

मल्लेश्वरम स्टेशन परिसरात पारस देवस्थळी राहतात. नुकत्याच पार पडलेल्या गुढीपाडव्याच्या दिवशी नववर्ष शुभेच्छा देण्यासाठी सकाळीच त्यांच्याकडे गेलो होतो. चहापाणी, हास्यविनोद अशा वातावरणात अचानक त्यांच्या फोन खणाणला. वहिनींनी फोन घेतला. म्हणाल्या, "मी कांदे बोलतेय! हो हो, तुम्हाला पण! हो आहे ना!" मागे वळून म्हणाल्या, "अहो, शांपुचा फोन आहे! घ्या." पारस लगबगीने गेला अन् खुशीत गप्पा मारू लागला.

मी मात्र गोंधळलेल्या अवस्थेत गेलो. काय एकेकाची भाषा, लकब असते! खूप खूप विचार केला, पण गोंधळ काही संपेना. बंड्या, ताई, दादा, नानू, पप्पू, छोटू अशी अनेक उपनावे असतात. पण कांदे आणि शांपु ही नावे प्रथमच गोंधळात टाकून राहिली होती.

फोन ठेवून हात चोळत चोळत पारस परतला आणि त्याने खुलासा केला. कांदे म्हणजे कांचन देवस्थळी आणि शांपु म्हणजे शांता पुरोहित. आणि मी विचारचक्रातून मोकळा झालो. मला आठवले, कॉलेजमध्ये आमच्या कंपूत गजानन मोडक नावाचा मित्र होता. त्याला आम्ही 'मोडक्या' अशा नावाने हाकारत असू आणि तोंड भरून हसत असू. याला जोडूनच प्रसंग आठवतो तो इथलाच बंगलोरचा. फाटक नावाचा मित्र होता. थोडासा धिप्पाड, गोरा, घारा. स्कूटरवर बसला की स्कूटर दिसत नसे. पण मोडक प्रमाणेच अपभ्रंश करून

त्याला हाक मारण्याचे धैर्य नाही झाले. कारणे दोन, एक म्हणजे एटिकेट्स आणि धैर्य दाखवलेच तर तो नुसता आमच्यावर चवताळून धावून आला असता.

पण या वर्षीच्या पाडव्यानंतर मनाशी खेळच सुरू झाला. नावात लपलेल्या 'छुप्या रुस्तुम'चा शोध घेण्याचा. ह्या चाळ्यांतून काही नाद उमटले. सत्तर पंचाहत्तर वर्षांपूर्वीची समाजव्यवस्था पाहिली, तर सर्वत्र असे आढळते की स्वतःचे पूर्ण नाव सांगायची प्रथा ग्राह्य असायची! नाव काय बाळ तुझं? विचारायचा अवकाश, उत्तर फटकन यायचं, "बळवंत दत्तात्रय कर्वे" किंवा "सुशीला सदाशिव रणदिवे" पण पुढे त्यांना 'बदक' किंवा 'सुसर' असं हाका मारलेलं आढळत नाही.

कमलाकर रंगनाथ टाकळकर हे गृहस्थ खूप श्रीमंत आणि दानशूर. घरदार मुला-नातवांनी भरलेलं. वर्षभर घरी पाहुण्यांची वर्दळ. त्यांना जर लोकांनी लघुनावाने हाक मारली असती तर, तिरिमिरीत त्यांनी नक्कीच आडात उडी मारली असती.

नागपूरला श्री. दत्तात्रय नलावडे हे आपल्या वडिलोपार्जित घरात राहतात. महादेव, नरहर, विश्वासराव, माधवराव हे त्यांचे पूर्वज अत्यंत विचार करून पुढच्या पिढीतील मुलांची नावे ठेवायचे असे वाटते. दत्तात्रय यांनीही ही परंपरा सुरू ठेवली आणि मुलाचे नाव मधुकर ठेवले. नावाचे रूपांतर छोट्यारूपात म्हणून मधुर केले. नंतर त्यांना मुलगी झाली. घराण्यातील सुमारे एकशेवीस वर्षांनी आलेले कन्यारत्न. अगदी बाळसेदार, गोरीपान, घारे डोळे आणि प्रसन्न चेहरा

अशा मुलीला बघून सर्वांनाच खूप आनंद झाला. घराला वेगळीच झळाळी आली. मुलीचं नाव यथार्थपणे रुपाली ठेवले अन् या नावाने अश्रूंचं अपूर्व स्थान दाखवून दिले.

आमच्या वाड्यात वाईला वसंतराव तळवलकर आणि सखाराम रुईकर राहायचे. माझ्याबरोबरच त्यांच्या घरातही पाळणा हलला. आम्ही तिन्ही मुलं बरोबरच वाढलो. वसंतकाकांचा गजानन, सखारामकाकांची वासंती आणि कोल्हटकरांचा वामन ही मुलं 'वासरु वाको गवत' खाओ, अशा शब्दांत वंशावळीचा उल्लेख करीत मोठे झालो असे माझे वडील सांगत.

आता नावांमध्ये मधले नाव म्हणायचे नसते, म्हणून साठे कुटुंबातील सतीश आणि माधव आपली ओळख 'मी ससा' आणि हा माझा भाऊ 'मासा' अशी करून देईल. समजा आपणच काय ते!

।। कालाय तस्मै नमः ।।

- नोव्हेंबर २००८



# भावी ब्रम्मरिक गिऱ्हाईक

**- एस.डी. गम्मतगौडा**

‘अरे बाबा, तुला माहीत आहे का?’

सकाळी शाळेच्या वाटेवर असताना आपल्या गाडीहाक्या बापाच्या ज्ञानात थोडी भर घालण्याच्या उद्देशाने चिंगी (वय वर्षे पाच) विचारती झाली.

‘काय गं गुंडम?’ समोरून रस्त्याच्या मधोमध प्रातर्विधी उरकून वळणाऱ्या गाईला वळसा घालत, दुसऱ्या गिअरला तिसऱ्यात ढकलत, बाबाने आपले चार ज्ञानचक्षू उघडून ठेवले.

‘अरे, आपण जे टीव्हीवर बघतो, ते सगळं खरं होतं!’

‘काय सांगतेस? कसं काय गं?’ बाबाचे ज्ञानचक्षू विस्फारले.

‘काल मी झोरेमॉन पाहात होते, तेव्हा ती ॲड लागली होती ना?’

‘कुठली?’

‘ती रे, कॅडबरीच्या कॅरियो बिस्किटांची?’

‘हो का, मग?’

‘अरे, तीच बिस्किटं मला काल गडुरा मॉलच्या त्या शॉपमध्ये दिसली.’

‘गडुरा नाही...गरुडा’

‘हां...गरुडा...अरे, पण ती टीव्हीमधलीच बिस्किटं तिथे कशी आली?’

‘हःः हःः, गुंडमेश्वरी, अगं ती दुकानात विकायला ठेवली आहेत हे तुला कळावं म्हणून त्यांनी टीव्हीवर दाखवली.’

‘पण ती बार्बीडॉलपण आधी मला ‘आर्ट अटॅक’च्या वेळी दिसली होती!’

‘हार्ट अटॅक?’ बाबाचा ठोका चुकला.

‘हार्ट नाही आर्ट...आऽऽर्ट...ते अंकल चित्रं काढून दाखवतात आणि काय काय क्राफ्ट शिकवतात ना टीव्हीवर? तो प्रोग्रॅम.’

‘ते होय. बरं बरं.’ तेवढ्यात बाबाचं लक्ष चौकात रातोरात बदललेल्या होर्डिंगवरच्या आकर्षक सुंदरीकडे गेलं. चिंगीने संधी दवडली नाही.

‘बाबा, मला तसा ड्रेस हवा.’

‘कसा?’

‘तो, ती आंटी घालून उभी आहे ना, तसा.’

‘शीः, कित्ती घाण दिसतोय तो...अख्खे खांदे उघडे दिसताहेत!’ मनोमन आवडलेल्या गोष्टीला खोटं खोटं नाक मुरडणे ही बाबापणाची एक जबाबदारी असते.

‘ए छान दिसतोय...आपण माझ्या बर्थडेला घेऊया, ओके?’

‘नॉट ओके. आईला हे अजिबात आवडणार नाही.’

‘अरे, मग आपण तिलापण घेऊया ना तसाच...’

‘काय!’ बाबा भयचकित! शेवटी आपल्या संस्कृतीचे रक्षण ही प्रत्येक पुरुषाची जबाबदारी असते आणि ती ते आपल्या बायकोच्या बाबतीततरी नेहमी सीरियसली घेतात.

‘बरं मग आपण माझ्या फ्रेंड्स्ना ‘पिझ्झा हट’मधे पार्टी देऊ, ओके?’

‘गेल्यावर्षी दिली होती ना? प्रत्येक बर्थडेला नसते काही बाहेर पार्टी द्यायची. त्यापेक्षा आपण घरीच सर्वांना बोलावून केक कापूया आणि काही स्नॅक्स देऊ.’

‘मॅक्केन पोटॅटो स्नॅक्स?’

‘ते कशाला? आई घरीच काहीतरी बनवेल ना!’
‘पण ते खूप यम्म असतात...टीव्हीवर दाखवतात ना...आणि आईने काही बनवलं, तर ती खूप दमेल...तिची पाठ दुखेल...मग काय तू तिला मूव्ह लावून देणारेस का? आपल्याकडे ते नाहीच आहे!’
‘काही दमत नाही आई. ती पोळीभाजी, वरणभात असं हेल्दी फूड खाते. त्यामुळे ती खूप स्ट्रॉन्ग आहे. तुझ्यासारखी फक्त नूडल्स आणि पास्ता नाही खात ती!’ डोस पाजायची अशी संधी बाबा कसली सोडतोय.
‘नूडल्सपण खूप हेल्दी असतात. त्यात रिअल आटा असतो. बाबा, आटा म्हणजे काय?’
‘आटा म्हणजे कणीक - गव्हाचं पीठ. तुला आटा म्हणजे काय तेपण माहीत नाही आणि म्हणे नूडल्स हेल्दी!’
‘असं ते डॉक्टरअंकल सांगत होते.’
‘कोण डॉक्टरअंकल?’
‘त्या ॲड्मधले.’
‘पुन्हा ॲड्... अगं चिंगू, त्या ॲड्स्वर जाऊ नकोस तू. त्यात काहीही दाखवतात. आता बघ...आपण तुझ्यासाठी ती डोराची पेन्सिल आणली होती ॲड् बघून. तिच्यामुळे मॅम खूष होतील असं ॲड्मधे दाखवलं होतं. झाल्या का त्या खूष? उलट टोक सारखं मोडतं म्हणून ओरडल्या ना तुला?’
‘हो रे. पण मग ते असं का दाखवतात टीव्हीवर?’
‘खूप लोकांनी त्यांच्या गोष्टी विकत घ्याव्यात आणि त्यांना खूप पैसे मिळावेत म्हणून.’
‘मग खूप पैसे मिळवून काय होतं?’
आता क्लायमॅक्सचा साक्षात्कारी डायलॉग म्हणायची वेळ आल्याचं

बाबाला जाणवलं. शाळेच्या गेटापाशी नो पार्किंगच्या बोर्डाखाली गाडी उभी करत एकविसाव्या शतकाचे ते अंतिम सर्वव्यापी सत्य त्याने उद्याच्या त्या सिटीझनला, नव्हे, कंझ्युमरला सांगितले -

'खूप पैसे मिळवले की खूप गोष्टी विकत घेता येतात... तुम्हाला लागणाऱ्या आणि अजिबात न लागणाऱ्यासुद्धा!'

आपलं 'छोटा भीम आणि चुटकी' दप्तर पाठीला लावून चिंगी शाळेत शिरली. लवकरच घंटा होऊन, शाळेची मौज पहात थबकलेल्या बाबाच्या कानी कुठूनतरी प्रतिज्ञेचे शब्द पडले.....

'भारत माझा बाजार आहे. सारे भारतीय कस्टमर आहेत. माझ्या बाजारावर माझे प्रेम आहे. माझ्या बाजारातल्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या मॉल्सचा मला अभिमान आहे. त्या मॉल्सचा रिपीट कस्टमर होण्याची हौस माझ्या अंगी रहावी म्हणून मी सदैव प्रयत्न करेन. मी माझ्या पॉकेटमनी देणाऱ्यांचा, दुकानदारांचा, जाहिरातदार कंपन्यांचा मान ठेवीन आणि प्रत्येकाचा माल विकत घेईन. माझा बाजार आणि माझे बाजारबुणगे यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करीत आहे. त्यांचे कल्याण आणि त्यांची समृद्धी ह्यातच माझे सौख्य सामावले आहे.

जय हिंद'

**- सप्टेंबर २०१२**



# हास्य आणि विनोद

- प्रा. अरुणा वाटवे

माणूस हा प्राणी व इतर प्राणी, यांच्यामधील मूलभूत प्रेरणा सारख्याच आहेत. फक्त त्यांच्या अभिव्यक्तीमध्ये फरक आहे. उदा. तहान, भूक, वात्सल्य व लैंगिक प्रेरणा दोन्हीमधे सारख्याच आहेत. फक्त त्या प्रेरणांची पूर्ती करताना फरक आहे. हास्य ही एकच विशेष देणगी निसर्गाने फक्त माणसालाच दिली आहे. कावळा हसला किंवा गाय हसली असे काही दिसत नाही. निरनिराळ्या भावना व्यक्त करण्यासाठी फक्त माणूसच हसू शकतो.

५०-६० वर्षांपूर्वी साहित्यसम्राट न.चिं. केळकर यांनी 'हास्यमीमांसा' हा ग्रंथ लिहिला होता, असे ऐकीवात आहे. पण एक मत असेही आहे की काही गोष्टी अनुभवायच्या असतात. त्याचे विश्लेषण करण्यात काय मजा? हास्य ही अनुभवायचीच गोष्ट आहे हेच खरे.

तरीही हास्य केव्हा निर्माण होते? हास्य किती प्रकारचे असते? त्याचा परिणाम काय होतो? इत्यादिचा विचार करायला काय हरकत आहे? अशा प्रकारचे विश्लेषण काही वेगळा आनंद देते का? हे बघणेही मनोरंजक ठरते. हास्याचा पाया विनोद याचा विचारही या अनुषंगाने येतोच.

अनेक विनोदी लेखकांनी हास्य व विनोद यावर आपला ठसा उमटविला आहे. प्र.के. अत्रे यांनी तर लोकांना विनोदाच्या सहस्रधारांनी

न्हाऊ घातले. पु.ल.देशपांडे, चिं.वि.जोशी, वि.आ.बुवा, मंगला गोडबोले, अशा अनेक लेखकांनी, आपले सामान्यांचे जीवन अतिशय सुंदर करून टाकले.

हास्याचे अनेक प्रकार आहेत. १) स्मित हास्य - अगदी किंचित ओठ उलगडले, न उलगडले इतपतच हसणे. २) अय्या, इश्श असे म्हणत, लाजत लाजत हसणे. ३) ओठ दुमडून हसे आवरत आवरत हसणे. ४) लहान मुलांचे निरागस हसणे. ५) प्रियकर प्रेयसीचे लपतछपत हसणे. ६) खुदूखुदू हसणे, अगदी मनातून हसू बाहेर, पडणे. ७) विनोद पूर्ण संपायच्या आतच, हसायला सुरुवात करणे. ८) छद्मी हास्य - दुसऱ्याचे म्हणणे खोटे पाडण्यासाठी किंवा कुचकट हसणे. ९) गडगडाटी हसणे - ढगाच्या गडगडाटाप्रमाणे मोठ्याने, पण थांबून थांबून हसणे. १०) सातमजली हसणे - आवाज चढवत चढवत हसणे. ११) लोटपोट हसणे - इतके हसणे की पोट दुखू लागते व त्यामुळे गडाबडा लोळत हसणे. १२) राजकीय हसू - तोंडाने सदिच्छा भेट म्हणायचे, पण मनात काळेबेरे असायचे, असे राजकीय नेत्यांचे नाटकी हसणे. १३) जी. ए. कुलकर्णी यांनी उल्लेख केलेले 'छडीचोप' हसू! एक आजी व एक नातू, पाहुणे म्हणून दुसऱ्या घरी गेले. मालकिणीने आंब्याच्या फोडी पाहुण्यांना दिल्या. सहा वर्षाच्या नातवाने एक फोड खाल्ली. पण त्याने दोन-तीन फोडी चोरून खिशात टाकल्या. ते आजीने पाहिले व ती हसली. तो मुलगा मनात म्हणाला हे साधे हसू नाहीये. घरी गेल्यावर छडीने चोपते की नाही ते बघ ! असे हे हसू सांगते आहे.

या शिवाय हास्यात विविधता आहेच. ॲटम बॉम्बचा स्फोट केला तेव्हा पंतप्रधान वाजपेयी म्हणाले की, "बुद्ध हसला!" तेव्हा

अनेकांना प्रश्न पडला की बुद्ध आनंदाने हसला, खेदाने हसला, छद्मीपणाने हसला की राजकीय हसला? पण सत्य वेगळेच होते. त्या मिशनचा 'बुद्ध हसला' हा कोडवर्ड होता. शिवाय मोनालिसा या लियोनार्दो द विंची याच्या पेंटिंगमधील मोनालिसाचे हसू गूढ आहे.

काही वेळा विनोद घडला नाही असे वाटते, पण त्यात लपलेला विनोद काही लोकांनाच समजतो आणि मग त्यांना हसू येते.

हास्याचा जनक असणारा विनोदही वेगवेगळ्या प्रकारचा असतो. विनोद समजण्यासाठी ठरावीक पार्श्वभूमी किंवा त्या क्षेत्रातील अनुभव असावा लागतो.

काही गृहीत तत्त्वे किंवा प्रवाद समाजात रूढ असतात ते माहीत असावे लागतात. एकमेकांचे उणेदुणे काढण्यासाठी कधी कधी विनोदाचा वापर होतो. प्र.के. अत्रे हे प्रकृतीने धिप्पाड होते. ते एका मित्राला म्हणाले की, 'मी त्या बागेत गेलो आणि प्रेमिकांचे हितगूज ऐकण्यासाठी हळूच पानाआड लपलो. त्यावर तो मित्र म्हणाला, तुला लपण्यासाठी केळीचेच पान हवे.

बरेचदा प्रत्युत्पन्नमतीने विनोद होतो. एका गणित शिकवणाऱ्या प्रोफेसर बाईंना एक विद्यार्थी म्हणाला, 'Madam, you are teaching so fast, like a deccan queen. I can't understand' त्यावर त्या म्हणाल्या, 'Then, please getout. Third class passangers are not allowed in deccan queen.' या त्वरित सुचलेल्या वाक्यातूनही उत्तम विनोद प्रतीत होतो. पु.ल.देशपांडे यांचे विनोद हे असेच सुसंस्कृत असत. दुसऱ्याच्या त्रुटी दाखवल्या, तरी ते उच्च अभिरुचीची पातळी

सोडत नसत. आजकाल सर्व क्षेत्रात पाहिले, तर विनोदाची पातळी फार खालावत चालली आहे हे पाहून फार खंत वाटते.

या खेरीज अतिशयोक्तीचे विनोद, विरोधाभासातून होणारे विनोद, उपहासातून होणारे विनोद, अपेक्षाभंगातून, निरागसतेतून, शत्रुत्वातून किंवा दुसऱ्याची फजिती बघूनही विनोद निर्माण होतो. शाब्दिक विनोद हाही एक आनंददायक प्रकार आहे. उलट अर्थी शब्दांचे विनोद, मूर्खपणावर आधारित विनोद किंवा कारुण्याची झालर असलेला विनोद हृदयाला स्पर्श करून जातो.

विनोदातून हास्यनिर्मिती झाली की होणारे शारीरिक, मानसिक फायदेही विचारात घेण्यासारखे आहेत. म्हणूनच हास्यक्लबांची संख्या वाढते आहे. हसताना तोंडाच्या स्नायुंना लाभदायक व्यायाम होतो. तसेच हृदय व फुप्फुसे यावरही सकारात्मक ताण पडतो. घरात अनेक वेळा मोठ्याने हसण्याचा मोकळेपणा नसतो. अजूनही स्त्रियांनी मोठमोठ्याने हसणे शिष्टसम्मत मानले जात नाही. ते सर्व स्वातंत्र्य हास्यक्लबात मिळते. हसण्यामुळे मानसिकदृष्ट्याही हलके हलके वाटते.

पु.लं.च्या भाषेत जन्म आणि मरण ह्या दोन गोष्टींच्यामध्ये नियतीने आपली फसवणूक चालवली आहे. या दोहोंच्या मधे एकमेकांची हसवणूक करण्याशिवाय आपल्या हातात काय आहे?

**- गणेशोत्सव २०१२**



# निरोपाचा क्षण

- यतीन सामंत

निरोपाचा क्षण हा मानवी आयुष्याचा एक अविभाज्य भाग आहे. जिथे योग आहे, तिथे वियोगही आहे. एका अर्थाने योग, वियोग मानवी प्रक्रियेची दोन टोकं आहेत. आपल्यासाठी निरोपाचा क्षण ही केवळ भौतिक ताटातूट नव्हे, तर त्यात ताटातुटीमुळे उठणाऱ्या भावनिक कल्लोळाचाही भाग आहे. त्यात कातर ओढ आहे, भावनांचे कढ आहेत. वळून पाठी पाठी पाहणारं मन आहे, पाझरणारे नयन आहेत नि वेड्या आशेची घुसमट आहे.

आपल्या मनामध्ये एक हळवेपणाने भरलेला हंडा असतो. निरोपाची वेळ जवळ आणणारा प्रत्येक क्षण या हंड्यात एका दगडाप्रमाणे पडत, हंड्यातील पाणी डुचमळवत असतो. नंतरचा प्रत्येक दगड आधीच्या दगडापेक्षा मोठा होत जातो. निरोपाच्या क्षणापर्यंत हा हंडा ओसंडून वाहू लागतो. सरतेशेवटी निरोपाच्या शेवटच्या क्षणाचा सर्वात मोठा दगड आपल्या मनावर ठेवून पाठी फिरावं लागतं.

काही निरोप हे तात्कालिक-आपल्या दिनचर्येचा भाग असतात. उदा. दर दिवशी शाळेत जाताना आईवडिलांना टाटा करणारे चिमुकले हात. मला अजूनही माझा शाळेतला पहिला दिवस आठवतो. It was a turmoil ! आई सोडून जाताना जणू काही आमची आता कधीच भेट होणार नाही अशा तीव्रतेने मला रडू फुटलं होतं, किंवा शहरातल्या लोकसंख्येच्या महासागरात मानसिक एकांत शोधणाऱ्या प्रेमी युगुलांचा

पुन्हा एकदा भेटण्याच्या आणाभाका घेतल्यानंतरचा हुरहूर लावणारा निरोप!

जेव्हा नोकरी शिक्षणानिमित्त, जिथे पूर्वायुष्याची काही वर्षे घालवली ते सध्याचं घर सोडून जातानाचा प्रसंग बहुधा अस्थायी पण कठीण निरोपाचा आहे. ते घर निर्जीव; पण त्या घराने आपले हासू - आसू पाहिलेले असतात. ज्याने आपल्याबरोबर चार पावसाळे काढलेले असतात - ज्याच्या सांगाड्यात आपल्या भावनांचे श्वास सळसळत असतात, ते घर आपल्या जिवंतपणाचा एक भाग असतो. मग त्याचा निरोप घेतल्याशिवाय आपलं पाऊल पुढे कसं बरं पडेल? मला पक्कं आठवतंय - आयुष्यात पहिल्यांदा नोकरीनिमित्त मुंबईबाहेर पडण्याचा प्रसंग आला तेव्हा सगळं सामान पुढे पाठवून देऊन, रिकामं झालेलं घर सोडून जातानाचा क्षण!

माझं पाऊल उंबरठ्यावर थबकलं, क्षणभर भास झाला की घर हाक मारतंय, विचारतंय 'का रे तुझ्या आजवरच्या सुखदु:खात मी बरोबर होतो. आज तू दुसरीकडे स्थायिक होताना केवळ मला तुझ्यासारखं हलता येत नाही म्हणून पाठी सोडून चालला आहेस' - घशातल्या आवंढ्यासकट मी पाठी वळून पाहिलं. आमच्या हाडामासाचं नसलं तरी हासाभासांनी भरलेलं, श्वास - नि:श्वासांनी भरलेलं ते रिकामं घर मला फार पोरकं वाटलं - माझ्या, त्याला पाठी सोडून जाण्याच्या निर्धाराइतकंच!

काही वियोग स्थायी स्वरूपाचे असतात. जसं की नोकरीतून निवृत्ती. इतकी वर्षे नोकरी हेच जग असण्याचं आयुष्य जगून अचानक आयुष्य नोकरीचा निरोप घेतं. तो क्षण एवढा जड होतो की जणू काही तो निरोपच त्याक्षणी आपलं जग होतं - जे दुसऱ्याच क्षणाला

काहीसं महत्त्वाचं निखळून पडल्यागत एका शून्य पोकळीत विरून जातं. निरोपाचं भाषण करणारे इतर लोक आपापल्या मनाचा औपचारिक निचरा करत असताना, निवृत्त झालेल्या व्यक्तीला मणामणाचे ओझे आल्यागत, त्याच्या बधिर मनाला त्यात काहीच गम्य नसते.

दहावीनंतर शाळेचा निरोप घेणारा क्षण काहीसा असाच असतो. जे शाळेत शिकण्याच्या उद्देशाने आलेले असतात, त्यांची मनं जड झालेली असतात. याउलट जी (डांबीस) मुलं शाळेत 'डांबलेली' असतात, त्यांच्यासाठी हा सुटकेचा क्षण असतो.

पूर्वीच्या काळात सर्वसंगपरित्याग करून संन्यास घेणं हा, आयुष्यातला एक अध्याय पूर्णपणे बंद करून पुन्हा कधीही वळून न पाहण्याच्या निर्धाराने पाऊल पुढे टाकण्याचा निर्णायक क्षण. आयुष्यभर केलेली कळकळ, पाऊल पाऊल पुढे टाकण्याआधी काळजात कळ आणल्याशिवाय राहात नाही. आपल्या आयुष्यातील, माणसांनी गजबजलेलं एक दालन, दार पूर्ण बंद करून सील करण्यासारखंच आहे हे. त्यात बंद झालेल्या दाराच्या दुसऱ्या बाजूने कितीही हाका आल्या, दारावर कितीही थापा पडल्या तरी, ना पाऊल थबकणार, ना चित्त विचलित होणार, इतका निर्धार असतो. कारण त्या संन्यस्त माणसांनी आपल्या साऱ्या आठवणी, भावना, इच्छा-आकांक्षा दृढनिश्चयाच्या भिंतीत कायमस्वरूपी चिणून, मनोव्यापाराच्या दरीत उतरणारे सारे दोर कापून टाकलेले असतात.

आपल्याच माणसांत, परिसरात राहूनही, संन्यस्तवृत्तीने आयुष्यातल्या साऱ्या सक्ती, आसक्तींचा कायमस्वरूपी निरोप घेणं हा संन्यास घेण्याचाच-तितका शारीरिक खडतरतेचा नसला तरी, एक प्रकार आहे.

छातीचा कोट करून देशासाठी रण गाजवणाऱ्यांच्या जातकुळीत जन्म घेऊन त्यात वृद्धी करण्याचा कुटुंबातील साऱ्यांना केवढा सार्थ अभिमान असतो. पण रणभूमीवर जाणाऱ्या आपल्या पुत्ररत्नाला मनाचा निर्धार करून निरोप देतानाचा धीर केवढा नाजूक असतो. निरोपाची वेळ जसजशी जवळ येते, तसतसा निर्धाराचा ओढून घेतलेला अपारदर्शी पडदा वात्सल्यरसात विरघळत जाऊन आपलं गलबलणारं हृदय आपल्या नि मुलाच्या आड येऊ नये म्हणून केवढं धैर्य लागत असेल? मुलाला निरोप देताना हा निरोपाचा क्षण स्थायी म्हणावा की अस्थायी हेही घरच्यांना ठाऊक नसतं. पण प्रत्येक निरोपाच्या वेळी हा, अखेरचा ठरू नये अशीच घरच्यांची आसुसून प्रार्थना असणार.

काही निरोप असे असतात जे स्थायीही नाहीत (कायमचे) वा अस्थायीही नाहीत (तात्पुरते) किंवा जे वरवर पाहता स्थायी नसतात, पण मूलभूत रीत्या स्थायी बनून रहातात. उदा. शिक्षण वा नोकरीनिमित्त परदेशगमन... तसं पहायला गेलं तर शिक्षणाचा उपक्रम काही ठरावीक वर्षांचाच असतो. पण शिक्षण पूर्ण करून (especially from USA) घरी परतलेला कोई 'माई का लाल' मी क्वचितच पाहिला आहे. किंबहुना अमेरिकेत शिक्षण घेण्यामागचा उद्देश ज्ञानसंपादनाचा जवळजवळ नसतोच. आपल्या देशात मिळू शकत नाही असा खास उच्च तांत्रिक दर्जाचा उपक्रम करायला जाणारा एकलव्य मला अजून भेटायचा आहे. तिथे नोकरी गाठून पैसा साठून मुक्काम पोस्ट USA करण्याचा हा राजरोस पार्श्वमार्ग(Backdoor) आमच्या अर्वाचीन पूर्वजांनी शोधून काढला आहे. ही मंडळी परदेशमगन करण्याऐवजी परदेशग्रस्तच जास्त असतात.

एक जमाना होता जेव्हा 'शिक्षणासाठी' जाणाऱ्या आपल्या मुलाला निरोप देताना हा लवकरच परत येईल असा आईवडिलांना आभास असे, जरी मुलाचा ध्यास काही वेगळाच असायचा. आता वेळ अशी आहे की आईबापच आपल्या मुलाला हरितक्रांतीच्या (Green Card) आशेने या पार्श्वमार्गावर जाणीवपूर्वक ढकलत असतात.

नोकरीनिमित्तही परदेशमगन होतं. सुरुवातीला एका ठरावीक कालासाठी म्हणून जाणं होतं. पण काळानुसार संधी वाढत जातात, हौस असतेच; मग पगाराने जसजसे खिसे फुगत जातात, तसतसे मायदेशाचे भावबंध सैल सुटत जातात.

जिच्या आसपास असण्याची आपल्याला सवय असते, तो आपल्या कुटुंबाचा एक अविभाज्य भाग, एक दिवस संपूर्णपणे दुसऱ्या कुटुंबाचा भाग होतो; हे आपल्या समाजातील स्त्रीच्या कुंडलीचा एक अटळ हिस्सा असतो, तरी त्याचा हिसका मुलीच्या बापाला बसतो!

पूर्वीच्या काळात मुली लग्न होऊन 'दूरदेशी' पडत असत. संचार साधनांच्या अभावी लग्नानंतर त्यांची खुशाली कळणं दुरापास्त. एका अर्थाने लग्नानंतर त्यांचा आपला संबंध संपायचा. त्यामुळे 'जा मुली जा, दिल्या घरी तू सुखी रहा' असा माहेरचा निरोप मुलीसाठी अखेरचा असायचा. 'परक्याचं धन' असलेल्या मुली 'उजवल्या' की आपली मुलीसाठीची असलेली जबाबदारी संपली असं बापाला भलं वाटू दे, पण आपल्या पोटचा गोळा संसारसागरात डुबकी मारण्यान्वये आपल्या दृष्टीसमोरून कायमचा नाहीसा होणे हे दु:ख एकलेपणाने, तोंड दाबून सहन करण्याच्या यातना आईच्याच हृदयाला कळतात.

हल्लीच्या जमान्यात(technically) सासर माहेरचा घरोबा राहू शकत असला व मुलीचा लग्न मंडपात घेतलेला निरोप कायम नसला,

तरी लग्नानंतर मुलीचे माहेरबरोबर किती भावबंध चालू राहतील हे तिच्या सासरवर अवलंबून असतं-त्या अर्थाने लढाईवर जातानाच्या निरोपाप्रमाणेच लग्नमंडपातला निरोप हा अखेरचा ठरेल का याची माहेरच्या मंडळींना खात्री नसते.

आयुष्यातल्याा आनंदाला भौतिकतेच्या तराजूत ऐहिक सुखाची मापं टाकून तोलणाऱ्या आजच्या काही महाभागांना आपल्या वयस्कर आईबापांच्या पारड्याचं (दुसऱ्या पारड्यात त्यांनी काहीही न दिल्याने) ओझं होतं नि मग तराजूचा काटा वृद्धाश्रमाच्या दिशेने झुकतो. आईबापांचं गाठोडं वृद्धाश्रमाच्या अडगळीत भिरकावून देण्याला काय म्हणावं? निरोप की सुटका?

या सर्व निरोप प्रकारांचा कळस म्हणजे स्थायी, अटळ व cyclic असा मृत्यू! जीवनाच्या फलकावर रंगाचा मोजकाच साठा घेऊन मानवी आयुष्याचा आलेख काढणाऱ्या चित्रकाराने, रंग पूर्ण संपायच्या आधी दिलेला अखेरचा पूर्णविराम! हा निरोप अखेरचा हे माहीत असूनही त्याची वेळ ठरवणं आपल्या हाती नाही.

जीवन ही अशी परीक्षा आहे, त्यात मृत्यूचा प्रश्न 'option' लाही टाकता येत नाही की परीक्षेला पुन्हा बसता येत नाही. हा अटळ क्षण म्हणून माहीत असूनही त्याची तयारी करता येत नाही. यातील विरोधाभास असा की आयुष्यातील प्रत्येक नवीन दिवसाबरोबर मृत्यूची अटळता गडद होत असूनही तो प्रत्येक दिवस आपण जणूकाही कधीच मृत्यू येणार नाही असा जगत असतो.

इथेही गंमत अशी की आयुष्याच्या अलीकडून पाहिल्यावर तो वियोग - निरोप वाटतो. पण पलीकडून पाहिल्यास ही वेळ योगाची असते. मग आपल्याला दुरावलेला आत्मा, परमात्म्यात विलीन होण्याच्या

या क्षणाला निरोप का बरं म्हणावं? अनादिअनंत चालू राहण्याच्या या प्रक्रियेला आवर्तन म्हणावं का? किंवा, आयुष्यातला प्रत्येक वर्तमान क्षण भविष्यातल्या आपल्या मृत्यूच्या दिशेने क्षणोक्षणी नेत असल्याने या प्रक्रियेला सततचा (continuous) निरोप म्हणावं का?


अखेर (म्हणजे पुन्हा निरोप) निरोपाचे प्रकार (स्थायी, अस्थायी, semi permanent) वेगवेगळे असले तरी त्याची जातकुळी एक असते. वस्त्रप्रकार वेगळे वाटले, तरी त्यात व्याकुळतेचा पोत, कातरतेचा पीळ एकच असतो - हा क्षण खरा आहे हे माहीत असूनही, पुढे ढकलता आला तर, अशी हळवी भाषा वेगवेगळी वाटली तरी एकच असते.

एक आशेचा किरण असतो-कमीतकमी जे कायमस्वरूपी वियोग नसतात त्या निरोपांच्या हुरहुरीमध्ये पुन्हा (भेटो वा ना भेटो) भेटण्याच्या आशेची झालर असते. याउलट अंतिम निरोपाला निर्णायकपणा असला, तरी तो 'point of no return' असल्याने कसलीच आशा नसते. खरं म्हणजे निरोप-वियोग म्हणजे काय नि दुःख तरी कशाला म्हणावं? जर साऱ्या घटनांची पटकथा आधीच लिहिली गेली असेल, तर आपली भूमिका या साऱ्या घटना पार पाडण्याइतपतच असते. भावनिक भावबंधसुद्धा आपण भूतलावर आल्यावरच जोडलेले असतात म्हणून त्या अर्थाने स्थायीस्वरूप नसतात. मग त्यांच्या असण्यास व नसण्यास, पर्यायाने निरोपाला आपण स्थायीस्वरूप का देतो?

दुःख हे अखेर 'वाटण्यावर' आहे, मूलभूत नाही. तार्किक (rational) दृष्टिकोनातून पाहिलं तर प्रत्येक प्रसंगाचं अस्तित्व व अटळता आपल्याला समजून येईल नि मग अनाहूत हळवेपणाची जागा एक विचारी अलिप्तता घेईल. कारण योग-वियोग, निरोप, दुःख हे

सारं आपल्या दृष्टिकोनावर अवलंबून असतं, आणि मृत्यूनंतर परमात्म्यात विलीन होणारा आत्मा हा साऱ्यांचा एकच असेल, तर सोडून तरी कोण कुणाला जातो नि निरोप तरी आपण कुणाचा घेतो?

**- गणेशोत्सव २०१२**



# महिला दिनानिमित्ताने....

- धनंजय चौगुले

मार्च महिन्याचा दुसरा आठवडा. जागतिक महिला दिन उजाडला. चिंगीची आई चिंगीला म्हणाली, 'चिंगे, अगं किती आळसटायचं? झोपायचे दिवस संपले. सदासर्वदा जागरूक राहायला हवे. अजून बराच पल्ला गाठायचा आहे आपल्याला. स्त्री-पुरुष समानतेचे नुसते नारे - 'तत्त्व मान्य, पण तपशील अमान्य' अशीच परिस्थिती आहे अजून. कायद्याने सर्व मिळाल्यासारखं वाटतं, पण वास्तव वेगळंच काही असतं. कळलं का काही? सध्याच्या रिमोट कंट्रोलच्या राजकारणात कुण्णा कुण्णावर म्हणून विश्वास ठेवता येत नाही. म्हणून म्हणते झोपून चालणार नाही. गार्गी, मैत्रेयीचा काळ जाऊन शतके लोटली. आत्ता कुठे आपल्याला जाग आली आहे, तेव्हा आळस झटकायला हवा. अन् हो, तुला माहीत आहे का, आपल्या या लढ्याला यंदा शतक पूर्ण होईल. म्हणजे बघ, शंभर वर्षे झगडूनसुद्धा समानतेच्या हक्कासाठी नारे अजून द्यावे लागत आहेत. कारण सगळी अडचण तपशिलाबाबत चर्चा सुरू झाली की होते. अगं, 'युनो'लासुद्धा १९७५पर्यंत महिला दिनाची आठवण नव्हती. नंतर मात्र त्यांनी जगभरच्या महिलांच्या प्रश्नांकडे लक्ष द्यायला सुरुवात केली. यंदा कोणता कार्यक्रम ठरवला आहे माहीत आहे का? दि जेंडर अजेंडा: गेनिंग मोमेंटम. म्हणजे लैंगिक समानतेच्या ध्येयाकडे वाटचाल, थोडी हालचाल सुरू. वेग केव्हा येणार कोणास ठाऊक? फक्त आणा शपथा, सगळे शब्दांचे बुडबुडे.

चिंगे, निसर्गात कोणीच परिपूर्ण नाही-निसर्गत: स्त्री-पुरुष एकएकटे पूर्ण नाहीत. पूर्ण जिवाला जन्म देण्यास दोघांची पातळी एकच. व्यवहारात

मात्र असमानता का? चिंगे, गंमत तर पुढेच आहे. हे महिला दिनाचे कार्यक्रम, जागृती पाहून काही पुरुषांच्या पोटात दुखायला लागले. (हसतेस काय, वात्रट कुठली?) त्यांनाही त्यांच्या प्रश्नाकडे लक्ष वेधायचे होते. शेवटी १९ नोव्हेंबर १९९९ पासून जागतिक पुरुष दिन साजरा होऊ लागला. भारतात त्याची मुहूर्तमेढ २००७ ला झाली. आता आपल्या तुतारीपुढे त्यांच्या पिपाणीचा आवाज ऐकू येत नाही हे खरे.

चिंगे, तुला रडायला काय झाले? पुरुष दिनाचा निषेध करतेस की काय?

चिऊ, चिऊ, येऊन जा. चिंगीचे रडे घेऊन जा. बरी आठवण झाली. चिऊला मी बोलावते आहे खरी, पण तुला ती गाण्यातच ऐकायला मिळेल, बघायला मिळाली तर नशीबच समज. गेल्या शतकभरात औद्योगिकीकरणाने एवढी जंगलतोड झाली की पक्ष्यांना, चिमण्यांना घरटी बांधायला झाडंच उरली नाहीत. म्हणून की नाही, चिमण्याच नाहीशा झाल्यात. पण माणसांत अजून थोडी माणुसकी (की पक्षीसकी? माणसाचं मन पाखरू असतं ना?) शिल्लक आहे म्हणायची. निसर्गचक्र पुन्हा मूळ पदावर आणण्याचा एक भाग म्हणून गेल्या चार वर्षांपासून २० मार्च रोजी जागतिक चिमणी दिन साजरा केला जातोय. झाडे काही एकदम उपलब्ध होऊ शकत नाहीत. म्हणून मग बांबूंची नळकांडी जागोजाग टांगून घरट्यांची सोय करण्यात आली. त्याला चिमण्यांनी उत्तम चिवचिवाटी प्रतिसाद दिला. बेंगळूरूमध्ये सुमारे ४०० बांबूघरे टांगण्यात आली होती. त्यातील १०० घरे चिमण जोडप्यांनी वापरलीसुद्धा. म्हणजेच चिमणसंख्या वाढली ना! आपण टांगूया हं, एक बांबूचे घरटे आपल्या घरात. कशी हसतेस लब्बाड!


चिंगे, चिऊला मी चिऊ, चिऊ, येऊन जा म्हणून हाकारते आहे अन् चिऊ येईलसुद्धा; पण चिऊच्या नातवंडा-पतवंडांना चर्पी चर्पी,

कम कम अशी हाक मारली तरच आपण त्यांना हाक मारतो आहे हे समजेल. तुमच्या या पिढीतच तुम्हाला मराठी लिहायला येणार नाही अन् बोलणेसुद्धा इ-मराठी होत जाईल. जगभरातील शिक्षणतज्ज्ञ कंठशोष करून सांगत आहेत की मातृभाषेतून शिक्षण योग्य आहे. तरी एकूणच समाज तात्कालिक फायद्याकडे दृष्टी लावून असल्याने यथा प्रजा, तथा राजा या लोकशाहीतील सवंग घोषणांनी सत्ताकारण करणाऱ्यांपुढे समाजकारण करणाऱ्यांचे कोण ऐकणार? युनेस्कोच्या विचारवंतांना मात्र संस्कृतीसंवर्धनासाठी मातृभाषेची, निदान सुरुवातीचे शिक्षण तरी मातृभाषेतूनच देण्याची आवश्यकता पटलेली दिसते. म्हणूनच त्यांनी २१ फेब्रुवारी हा जागतिक मातृभाषा दिन जाहीर केला. मग मराठी भाषाप्रेमींनी महाराष्ट्रात कुसुमाग्रजांच्या जन्मदिनी, २७ फेब्रुवारीला जागतिक मराठी दिन साजरा करायला सुरुवात केली. संस्कृतीचा विकास होत असताना ती बहुरंगी, बहुढंगी, बहुआयामी, बहुकेंद्रित होत जाते आणि भाषाही त्याला अपवाद नाही. तरी संस्कृतीचे सर्व रंगढंग, प्रतीकं, वैविध्यं भाषेमुळेच गुंफली गेलेली असतात. तंत्रज्ञान आत्मसात करण्यासाठी जरी सध्या परभाषा आवश्यक असली, तरी दैनंदिन व्यवहारात, नात्यागोत्यात, भावनिक विश्वात तसेच संस्कृती टिकण्यासाठी मातृभाषेचे मातीशी नाते जुळलेले असते; मातीचे कुल्ले नाही चिकटत फार काळ.

२५ वर्षांनंतर...

चिंगिटलीची आई चिंगी, चिंगिटलीला स्पीकली, 'चिंगिटले, गेल्या ट्वेंटी फाईव वर्षांत नॉट मच चेंज झाला गं! पेपरवर सर्व इंक केले आहे, पण पुरुषांच्या माइंडमधे अजून इन्स्क्राईब होईल तर ना! आय स्वेअर!....

**- मार्च २०१३**



# अनुभूती

- शिरीष कुलकर्णी

१५ ऑगस्ट हा उस्ताद अमीर खाँ साहेबांचा वाढदिवस आणि त्यांनीच दिलेल्या असंख्य अनुभूतींपैकी एका अनुभूतीचा हा लेख.

मालकौंस (मालकंस) खरे तर फक्त पाच सुरांचा पंचम विरहित करुणा-प्रधान राग (मारव्या सारखा). कानडा राजा पंढरीचा, मन तडपत हरी दर्शन को आज किंवा दिव्य स्वातंत्र्य रवी, ही आणि अशी कितीतरी गाणी मालकौंस मधली. मालकौंस लिंक(surgyan.com)वर अमीर खाँ साहेबांचे नाव दिसले आणि लिंक नकळत क्लिक झाली सुद्धा. तानपुरे सुरू झाले आणि नकळत 'क्या बात है' असे शब्द बाहेर पडले. राग मालकौंस आणि उस्ताद अमीर खाँ साहेब, अजून काय हवे रसिकाला?

पुन:प्रत्ययाचा परमानंद देते, तीच खरी कला आणि तोच खरा कलाकार. कुठलीही कलाकृती श्रेष्ठ आहे की नाही हे ठरविण्याचे हे एक सोप्पे उत्तर म्हणजे पुन:प्रत्यय.

लेख मालकौंसचा नाही तो अमीर खाँ साहेब (उस्ताद अमीर खाँ साहेब) ह्यांनी गायलेल्या मालकौंसचा आहे आणि केवळ मालकौंसचा नाही, त्यांनी प्रत्येक मैफिलीमधून दिलेल्या अनुभूतीचा आहे. खरे तर कुठलाही अनुभव शब्दांमध्ये उतरवणे ही एक अत्यंत अशक्य गोष्ट आहे. शब्द एकदा उत्पन्न झाला की अनुभव संपला. शब्दाचे अर्थ

समान घेतले जाऊ शकतात, अनुभवाचे नाही. शब्द सामाजिक आहे, अनुभव नाही. सुरांची उत्पत्ती ही पहिली आहे, शब्दांची नाही म्हणूनच शब्द सुरू झाले की अनुभव संपला (तो खोटाच ठरणार).

राग मालकौंस, तानपुरे छान लागलेले, सुरामध्ये मिसळण्याकरता कुठलाही आटा-पिटा नाही. तानपुऱ्याचा वापर हा सुरवातीला षड्ज मिळण्याकरता, नंतर सूर पडताळणी करण्याचे यंत्र म्हणून नाही. गाणे सुरू होतानाच सूर येतो, तानपुऱ्यामधील सुरुवातीला षड्ज खाँ साहेबांच्या 'दिलो दिमाग'मध्ये केव्हाच भिनलेला असतो आणि तानपुऱ्याचे अस्तित्व कधीच वेगळे जाणवत नाही. सूर स्वार होतात, भाव प्रभावी होतात आणि एका वेगळ्या मैफिलीला प्रारंभ होतो. लय मिळाली नाही, तंबोरे वाजत नाही म्हणून कुठलाच अशांतपणा नाही. एकदाच सुरू झालेला सूर पूर्ण मैफिलीमध्ये सगळ्या सृष्टीला कवेत घेत शेवटपर्यंत झंकारत राहतो. हावी(आरूढ) व्हायला आक्रमकता पाहिजे की नको हा प्रश्न उद्‌भवत नाही आणि असतो तो केवळ साक्षात्कार. ज्याच्या पुढे किंवा मागे प्रश्न नसतात तो अनुभव आणि तोच साक्षात्कार, म्हणूनच अमीर खाँ साहेबांच्या गाण्याला तानपुऱ्याच्या किंवा स्वरमंडळाचा आधार नव्हता. ते गाणेच स्वयंपूर्ण किंवा स्वयंभू होते आणि नुसतेच स्वयंभू नव्हते, तर सुरेल स्वयंभू होते. परवा कुठल्यातरी मैफिली (डी.डी. भारती) मध्ये डॉ. प्रभा अत्रे म्हणाल्या की अमीर खाँ साहेबांना श्रोते किती आहेत ह्याचा परिणाम कधीच होत नव्हता. श्रोता एक असो वा हजार, गाणे तेच - साक्षात्कारी गाणे-स्वयंभू गाणे.

तानपुऱ्याचे स्वर कानाद्वारे प्रवेश करून गळ्याद्वारे प्रकट होतात, असा बाहेरील ऑक्सिजन त्या गाण्यामध्ये नव्हता. दिल और दिमाग

ज्या सुरेल गळ्यामधून प्रकट होतात, तसा सुरेल आत्मा असलेले व्यक्तिमत्त्व म्हणजेच अमीर खाँ साहेब. मालकौंस सुरू झाला आणि अस्वस्थ झालो. बायको नेहमीप्रमाणे बोलली (बोलणे हा शब्द जास्त बरा वाटतो, म्हणण्यापेक्षा) की गाण्याने शांतपणा यायला पाहिजे. तू तर अस्वस्थ झालास. पण खरेतर ते माझ्या हातातच नाही. मला वाटत नाही सूर स्वस्थता देऊ शकतात. ते जे काही देतात त्याला काय म्हणावे, ते मला सापडत नाही. ही अस्वस्थता फक्त गाण्यामधील नाही ह्याचा प्रत्यय आपल्याला तेंडुलकरची बॅटिंग चालू असताना किंवा झाकीर भाईंचा तबला चालू असताना सुद्धा येईल. एकदा पु.ल. म्हणाले होते की कुमारांनी(कुमार गंधर्व) आम्हाला (पु.ल. आणि वसंतराव देशपांडे यांना) फक्त अस्वस्थता दिली. त्यांच्या मैफिली झाल्यानंतर कितीतरी रात्री त्यांनी अशा अस्वस्थतेतच जागून काढल्या. खरे तर ही आपली अस्वस्थता हे त्या कलाकाराचे सर्वात मोठे योगदान आहे.

आपण कुठे अडकणार, रागाच्या निर्मित झालेल्या भावामध्ये, का अमीर खाँ साहेबांच्या कलाकृतीमध्ये? राग संगीत हे भाव संगीत असावे की नसावे हा वादाचा मुद्दा आहे. काहींच्या मते (गाण्यापेक्षा गाण्यामधल्या विचारांना महत्व) दिमाग दिल पे हावी होना चाहिए म्हणजे भाव येण्यापेक्षा विचार येणे महत्त्वाचे. आणि काहींच्या मते भाव निर्मिती होणे महत्त्वाचे. म्हणजे सूर काय निर्माण करू शकतात ते (किंवा तो भाव). ह्या प्रश्नाचे उत्तर संस्कृत मध्ये आहे. (दधी मधुरं, मधु मधुरं असे म्हणतात.) ज्याला जे आवडेल, त्याला ते मधुर लागेल किंवा भाव तसा देव वगैरे वगैरे. पण अमीर खाँ साहेबांचे गाणे सुरू झाले की हे प्रश्नच मुळी बाजूला पडतात. आपण घेत असतो तो

अनुभव. त्या गाण्याचे अनॅलिसिस करावे असे भान उरत नाही. आहा! क्या बात है, अशा कितीतरी प्रतिक्रिया न ठरवता नकळत व्यक्त होतात. एकदा रवींद्रनाथ टागोर हे फक्त सौंदर्य ह्या विषयावर विचार करत होते. अचानक उठून उभे राहिले आणि म्हणाले, 'अरे, अरे, एवढा वेळ आपण फुकट घालवला सौंदर्य ह्या विषयावर फक्त विचार करण्यामध्ये? पूर्णचंद्राची सौंदर्यपूर्ण रात्र होती ती. चांदणे सर्वत्र व्यापून राहिले होते. ही गोष्ट अनुभवायची सोडून आपण सौंदर्य ह्या विषयावर फुकट केवळ विचार करत होतो?' अमीर खाँ साहेबांचे गाणे हे त्या रवींद्रनाथांनी अनुभवलेल्या चांदण्याच्या सौंदर्यासारखे असते. तिथे आपण काही विचार करावा असे भानच नसते.

गाणे उत्कट होते, चमत्कारिक होते. लौकिक आणि अलौकिक, ऐहिक किंवा पारलौकिक असे दोन्ही पैलू त्या गाण्यामध्ये होते. (उदा. जो सूर समेला डायरेक्ट हृदयी घुसतो तो पारलौकिक आणि जी सरगम मेहनतीमुळे येते ते ऐहिक किंवा चमत्कारिक) अमीर खाँ साहेबांचे गाणे विकाऊ (व्यावहारिकपेक्षा हा शब्द जास्त चांगला आहे) नव्हते. विकाऊ गाण्यामध्ये आर्थिक गणिताबरोबर विविधता येते. पैसे चांगले म्हणून गाणे चांगले असा भावच नव्हता तेथे. अमीर खाँ साहेबांच्या एका डॉक्युमेंटरी फिल्ममध्ये (esnips.com) हा माणूस कमालीचा विरक्त दिसतो आणि पत्नी ही पत्नीधर्मानुसार व्यावहारिक विचार करणारी दिसते. ही विरक्ती, ही फकिरी त्यांनी प्रत्येक मैफिलीमध्ये रसिकांना दिली असावी आणि दिलीच. जी गोष्ट सुरांची तीच तालाची. अमीर खाँ साहेब त्यांचे गाणे चालू असताना म्हणाले होते की हमारे कुछ बांधव खाली(किंवा काल) आने तक राह देखते है और बंदिश का मुखडा पकड लेते है (तीन तालामध्ये धा तीन तीन ता हा काल

किंवा खाली आहे. काही बंदिशी ह्या त्या अक्षरापासून सुरू होतात) वरच्या वाक्याचा अर्थ असा की ताल न भिनलेला गायक कायम सावध असतो आणि वाट बघत असतो की ‘खाली’ कधी येणार आणि तो बंदिशीचा मुखडा कधी पकडणार. अमीर खाँ साहेबांचे गाणे असे बाहेरून येणाऱ्या श्वासावर चालले नाही. नैसर्गिक नियमानुसार श्वास सुरू रहावा असे ते गाणे. हे असे गाणे प्रकट होत असते. जिथे गायकाचा सावधपणा नाही, लक्ष गाण्यावर आणि तालाच्या खालीकडे नाही! ही कृती ताल किती भिनलेला आहे हेच दाखवते. कितीतरी चमत्कारिक सरगम आपण अनुभवत असताना अचानक उल्का पडावी तशी सम त्यांच्या गाण्यामध्ये व्यक्त होत असते. आहा! क्या बात है, हे सुद्धा नकळत चालूच असते.

असे कितीतरी पैलू आपण त्यांच्या प्रत्येक मैफिलीमध्ये आणि प्रत्येक रागाच्या मैफिलीमध्ये अनुभवत असतो. अमीर खाँ साहेबांबद्दल कितीही लिहिले तरी ते कमीच. अमीर खाँ साहेबांनी दिलेल्या प्रत्येक अनुभूतीचा, साक्षात्काराचा, अस्वस्थतेचा आणि मैफिली नंतर दिलेल्या ‘सन्नाट्याचा’ कृतज्ञ रसिक.

**- गणेशोत्सव २०१३**



# आयुष्याची दिशा बदलणारा क्षण

**- नीलिमा राव**

क्लब मधे 'पतंग उत्सव' (kite festival) साजरा झाला, मनोहर दृश्य होते. इतरत्र संक्रांतीला व कर्नाटकात आषाढात, 'पतंग बाजी' चालते, वारे जोरदार असतात, भरारी मारणाऱ्या पतंगाची दिशा, वाऱ्यावर अवलंबून असते.

माणसाचे पण पतंगासारखेच नाही का? वारा म्हणजे प्रत्येकाला, नशिबाने किंवा त्याच्या कर्तृत्वाने मिळालेली संधी. साहित्य - फिरकी, मांजा - म्हणजे शिक्षण, अनुभव ह्यांच्या साहाय्याने आपल्या कर्तृत्वाचा पतंग, आकाशात सोडायचा. तो गटांगळ्या, गोते खातो, पुन्हा स्थिर होतो - थोडा खेचायचा, थोडी ढील द्यायची - नक्कीच एक वेळ अशी येते की जेव्हा तो अस्मानात उंच भरारी घेतो व अस्मान काबीज करतो.

लग्न झाले, सासर-माहेर कर्तृत्ववान महिलांनी परिपूर्ण असल्याची जाणीव झाली. शिक्षणाची जोड होतीच. घरकुलाची जबरदस्त आवड. हस्तकला, पाककला, घर-सजावट ह्याचे सर्रास क्लासेस सुरू केले. लोकांच्यात मिसळण्याची, ओळखी करून घेण्याची आवड पुरी होऊ लागली. विद्यार्थ्यांकडून नवे शिकण्यास मिळावयाचे. एकच अपत्य असल्याकारणाने, तिची जोपासना उत्तम पार पडत होती. स्वतःच्या स्त्री शक्तीची वेगळीच ओळख घडली. आयुष्य संथ सुंदर पाण्यासारखे होते. यजमानांचे consultant चे ऑफिस. माझा दिवाळी-दसरा ह्या निमित्ताने

सहभाग असे. घर, ऑफिस - हे वेगळेच कप्पे. कसे काय चालले आहे? ह्या पलीकडे विशेष उत्साह दाखविण्याची गरज वाटत नव्हती.

एके दिवशी दुपारी, अचानक, ऑफिसात जाण्याचा प्रसंग आला. Reception रिकामे होते. एरवी ऑफिसमधले परिचित वातावरण अपरिचित वाटले. महाभारतातले द्यूत खेळण्याचे दृश्य, साकार झाले होते. कोणीच कुठली चाहूल घेण्याच्या मनःस्थितीत नव्हते. बाकी-बुट्टीवर होते. एकच क्षण, मन बधिर झाले. घरी आले, मन थाऱ्यावर नव्हते. रात्री झोपले, सतत कसली तरी बोचणी. बॉस कामासाठी रशियाला गेले होते.

दुसरा दिवस उजाडताच, सूर्यनारायणाच्या साक्षीने, एक निश्चय मनाशी पक्का झाला. डबा, पर्स घेऊन तडक ऑफिस गाठले. ऑफिसची चावी होती - Reception मधे विराजमान झाले. एकच विचार होता, बॉसच्या अनुपस्थितीत गड सांभाळण्याची जबाबदारी आपली. शरीरात, तानाजी मालुसरे संचारले होते. परवानगी मिळविली नव्हती - म्हटले, आले अंगावर तर घेऊ शिंगावर.

एक-एक स्टाफ येऊ लागला, मला तिथे बघून, त्यांची तंतरली. नक्की अंदाज येईना, ही बया अचानक इथे? इरादा काय? तेरड्याचा रंग तीन दिवस.

तत्परतेने स्वतःची डिग्री-नाव अशी पाटी टेबलावर स्थापन केली. स्वतःला वेळेचे बंधन घातले. स्वभावात, जबरदस्त चिकाटी असल्याकारणाने न कंटाळता बसण्याची तयारी होती. आजीची शिकवण - 'पुरुष बसून माजला व बाई उंडरून बिघडली.' ती व आई आम्हाला काही ना काही कामात व्यस्त ठेवीत. M.A. (Industrial

Sociology) व Trade Union मध्ये specialisation असल्याने, लेबरचा चांगलाच अभ्यास होता. जवळ शस्त्रे होती, ती कधी व कशी पाजळायची? काळच ठरवेल.

घर, ऑफिस - दुहेरी जोखीम सांभाळायची मनाची तयारी केली. आयुष्याची दिशा, हळू बदलत होती. Diploma in Child Welfare ह्याची मदत झाली. माणसात एक मूल दडलेले असते. कसे हाताळायचे, ही कला अवगत असल्या कारणाने स्टाफ बरोबर पटकन जुळले. ऑफिसमधल्या व्यवहारांची वर्गवारी केली. एक एक गड काबीज करण्याचा चंग बांधला. आमची लायब्ररी, दुर्मिळ इंजिनीअरिंग पुस्तके व साहित्यासाठी प्रसिद्ध. पुस्तके विषयावारी जोडणे, याद्या करणे, हे कार्य प्रथम तडीस नेले. प्रत्येकी वेगळ्या चोपड्या - त्या मुळे 'कोणी, कुठचे-केव्हा' ही पुस्तकांची जंत्री, नोंदीनिशी तयार झाली - पुस्तके लोकांना परत करणे क्रमप्राप्त झाले. (यादीत - गोची झालेले खूपच मित्रगण). बायकांना ego प्रॉब्लेम नसतो व भीड-भाड थोडी कमी असते. येणारी बिलाची बाकी, स्टाफ अॅडव्हान्स, सुट्ट्या-बुट्ट्या ह्यांवर पाबंदी आली. बायकांना 6th sense असल्या करणाने जे सर विचारू शकत नव्हते, त्या गोष्टींवर प्रकाश टाकणे सोपे झाले. ऑफिस सुशोभित केले. Visitors, Interview Candidates, Suppliers - एकच झुंबड. त्यात फोन कॉल्स. बायका जन्मतःच मल्टी टास्किंग. चेहरा हसरा ठेवून सर्व करणे सोपे गेले. आईचे ज्ञानामृत कामी आले. स्वतःत नवी ऊर्जा उत्पन्न झाल्याची अनुभूती येऊ लागली. एकाच ठिकाणी बसून, अंगच डोळे कसे बनवायचे - ही कला अवगत झाली. मुलींचे पर्सनल प्रॉब्लेम - योग्य सल्ला देऊन मने जिंकली. पैशाची आवक-जावक, हिशोब लिहिण्याची वडिलांची तालीम कामी आली. 'बुद्धी तेज असली तरी

चोपडी खरी सखी करा' ह्याची प्रचिती आली. पहिल्या दिवसापासून ह्यांना 'सर', हे नाव पक्के केले - त्यामुळे ऑफिसमधे आमचे नाते, ऑफिशियल झाले. गोष्टी डिमांड करण्यापेक्षा कमांड कराव्यात - उपयुक्त कानमंत्र. लहानपणापासून नटण्या मुरडण्याची आवड - त्याला ऑफिस हा सुंदर पर्याय. कळकट-मळकट - कामाला बळकट - ह्या अवताराने, नवी उभारी घेतली. मॅचिंग साड्या, पर्सेस, ड्रेसेसना वाव मिळाला, आयुष्याचे वळणच बदलत होते. Busy man has time for every-thing - आचरणात उतरू लागले. "Time is money" हे पटू लागले. स्वत:शी स्वत:ची नवी ओळख. Director Administration ह्या हुद्द्यामुळे सेमिनार, प्रेझेंटेशन्स attend केल्यामुळे, जगाशी नवी ओळख झाली.

दुपारी ऑफिसमधे गेल्याचा तो क्षण - एक ठिणगी होती. त्याचा एक यज्ञ - आज त्या सर्वांनी पावन झालेले माझे समृद्ध जीवन - वेगळा आत्मविश्वास. एका क्षणाने, जीवनाची दिशाच बदलली. मी कर्तृत्वरूपी पतंगाची कणी मोजून - मापून घट्ट बांधली. चांगल्या मांजाच्या फिरकीने दिशा साधली व.... आभाळ काबीज केले.

जो जीता वही सिकंदर.

**- गणेशोत्सव २०१४**



# निसर्ग संशोधन - एक वेगळी वाट

**- नचिकेत केळकर**

मी लहान असताना आमचे वास्तव्य कोडगु जिल्ह्यात मडिकेरी गावात होते. त्यानंतर आम्ही नागपूरला गेलो. कोडगुची हिरवीगार वनश्री तसेच विदर्भाचे हरित आणि तळ्यांनी संपन्न प्रदेश, यामुळे कदाचित निसर्गप्रेम आणि निरीक्षण यांकडे मी अत्यंत तीव्र अशा ओढीने खेचलो गेलो. दहाव्या वर्षी लागलेलं हे वेड अजूनही तसेच टिकून आहे. २००८ साली बेंगळूरला National Centre For Biological Sciences या TIFR संचालित संशोधनसंस्थेतून 'वन्यजीवशास्त्र आणि संवर्धन (Wild Life Biology & Conservation) या विषयात मला M.Sc. ची डिग्री मिळाली.

तेव्हापासून आतापर्यंत अनेक गुरुजनांच्या मार्गदर्शनामुळे आणि पालक तसेच आप्तमित्रांच्या सहकार्यामुळे गंगेतले डॉल्फिन्स, समुद्री कासवे, नदीतले व सागरी मत्स्यजीवन, कोरल रीफ्स (प्रवालभित्ती), समुद्रीगावात वटवाघळे, पतंग कीटक, पाणपक्षी आणि जल परिसंस्था अशा विविध विषयांवर माझे अध्ययन सुरू आहे. असा अभ्यास म्हणजे नेमके काय? तर प्राण्यांच्या राहाण्याच्या आणि विधी करण्याच्या जागा, संख्या, सवयी इ. गोष्टींचा मागोवा घेत रानावनात भटकणे इतकेच नाही तर उपग्रहांनी काढलेली भू-चित्रे यावरून नैसर्गिक परिसंस्थेत निसर्गत: आणि मानवप्रेरित होणारे बदल आणि ऱ्हास यांचे अवलोकन करणे. गणित आणि संख्याशास्त्राचा वापर करून प्राण्यांच्या संख्येचा

अंदाज बांधणे. समुद्रातल्या माशांवर आणि गवतांवर स्वतः पाण्याखाली जाऊन छोटे-छोटे प्रयोग करून पाहणे. नदीत राहणाऱ्या डॉल्फिन्सच्या अतिउच्च ध्वनिलहरींना यंत्राद्वारे ऐकून ते कुठले भक्ष्य शोधताहेत हे पाहणे.

सध्या मी बेंगळूरलाच ATREE (Ashoka Trust for Reasearch in Ecology and Environment) या संशोधन केंद्रात माझा Ph.D.चा अभ्यास करत आहे. बिहारमधल्या गंगा आणि कोसी नद्यांमधल्या मत्स्यजीवी कोळयांचे समाजजीवन आणि त्यांचे नदीतले मासे व आंधळे डॉल्फिन्स यांच्याशी असलेले संघर्षाचे तरीदेखील एकात्मीक असे नाते कशा प्रकारचे आहे, हे संशोधन; असा माझ्या अभ्यासाचा सारांश सांगता येईल. मानव-प्राणी-निसर्ग यांच्यातला अविरत संघर्ष आणि त्यातून उत्पन्न होणारी संयुक्तता, हे एक अनंत सत्य आहे. त्यामुळे पर्यावरणाच्या नवीन संकल्पनेत प्राणीमात्रांइतकेच निसर्गसृष्टीवर अवलंबून असलेल्या मनुष्यप्राण्यांकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. असा अभ्यास करण्यासाठी मी जीवशास्त्राबरोबर समाजशास्त्र, मानवशास्त्र, तसेच अर्थव्यवस्था आणी राजकारण यांचाही अभ्यास करतो आहे.

पर्यावरण वाचावे, किंवा माणसांचे कल्याण व्हावे, यासाठी समाजाचे नेते, प्रवर्तक, अधिकारी वगरे लोक जे निर्णय घेतात - ते क्वचितच संशोधनावर बेतलेले अथवा तार्किकदृष्ट्या वाजवी असतात. याला कारण असे असू शकते की समाजाचे संचालन करणे आणि शास्त्रीय संशोधन करणे, या अनेक प्रकारे अतिशय भिन्न गोष्टी आहेत. अनेकदा संशोधकाला विचारण्यात येते - "या सगळ्या अभ्यासाचा उपयोग काय?" याचे उत्तर देणे अनेकदा कठीणही असते. मात्र, ज्या माणसांना नवीन ज्ञान-विज्ञान-मार्गाने प्रतीत होण्याच्या जाणीवा केवळ

उपयुक्ततेच्या तराजूत तोलता येतात तेच असे प्रश्न विचारू शकतात. विज्ञानाची किंमत आणि मूल्य लावणारे लोक त्याची अमूल्य महत्ता समजू शकतील असे सहसा दिसत नाही.

तरीदेखील, आपले विज्ञान मानवोपयोगी आहे का, हा प्रश्न अनेकदा सगळ्या संशोधकांना पडला आहे, पडणारच. या द्वंद्वाला कंटाळून त्याचे उत्तर मिळवणे, हा काही या प्रश्नावर तोडगा नाही. त्याउलट हा प्रश्नच कधी, कसा आणि कोणासाठी आवश्यक ठरू शकतो हा विचार करणे महत्वाचे ठरते. आपण अनेकदा म्हणतो की वैज्ञानिकच समाजाला मार्गदर्शन करणारे अधिकारी व्हायला हवेत. मात्र, या दोन पेशांचा पिंडच वेगळा आहे. प्रश्नांचे उत्तर मिळवणे आणि प्रश्नांच्याच मागे वेडे होऊन नवीन प्रश्न शोधणे असा हा भेद सांगता येईल.

आता हे द्वंद्व माझ्या मनात काहीसे शांत झाले आहे, पण असा एक पेचप्रसंग दोन वर्षांपूर्वी माझ्यावर आला होता. २०१३ साली मी माझ्या Ph.D.ची सुरूवात करणार होतो. तेव्हाच माझी भारतीय वन सेवेत (Indian Forest Service) परीक्षा आणि मुलाखतीद्वारे निवड झाली. मेरिट लिस्ट मध्ये आठवा क्रमांक आला. माझे नातेवाईक, मित्र, शिक्षक आणि इतर लोकांना यामुळे आनंद झाला. काहीजण म्हणाले, की मी आता 'सिस्टिम' चा भाग होईन आणि वाटेल ते करू शकेन, बदलू शकेन. मला जे काही पर्यावरणासाठी करायचे आहे ते करू शकेन. मात्र बहुतेक सगळ्या लोकांचे लक्ष आणि आकर्षण - मिळणारा हुद्दा, घर-गाडी, सुख सोयी, मान-सन्मान, आणि मुख्य म्हणजे सत्ता याकडे होते. इतकी मोठी संधी आहे, याचा पुरेपूर वापर करावा, हा त्यांचा सूर होता.

या सगळ्यामुळे माझी झोप उडाली. मनात खूप खळबळ माजली. एकदा मोह वाटायचा, तर एकदा भीती. कधी वाटायचे - की ही खरंच चांगली संधी आहे. आपल्या समाजात आणि पर्यावरणात बदल घडवायची. मग लक्षात यायचे, की आपण घडवून किती बदल घडवणार? आपण कोण, आपण किती क्षुद्र आहोत या सगळ्या पसाऱ्यात. मी अनेक जाणकार आणि विद्वान व्यक्तींशी यासंबंधी बोललो. आश्चर्य म्हणजे IFS बाहेरच्या लोकांचे मत असायचे की मी ते करावे, आणि IFS मध्ये कार्यरत अधिकारी म्हणायचे, की ही नोकरी नव्हे, तर शिक्षा आहे; संधी नव्हे, तर एक प्रकारची नजरकैद आहे. सरळ माणसांचे इथे काही खरे नाही. शेवटी काय, ही सरकारी, कारकुनी आणि मामलेदाराची नोकरी ही आपल्या प्रवृत्तीला मानवेल काय? असा विचार आला.

आणि शेवटी याच विचारांती मी IFS ला माझा नकार कळवला आणि मग मला, "असं का केलं?" या प्रश्नाचं उत्तर सहज सापडलं. आपण जग बदलू शकू किवा बदलू शकणार नाही, यापेक्षा खात्रीने एक गोष्ट जाणवली ती म्हणजे, आपण स्वतः मात्र निश्चित बदलू. सत्ता-अधिकारपद मिळाल्यावर माणसाला माणूस राहता येत नाही. आपल्या मूळ तत्त्वांशी संवाद साधता येणे त्यामुळे शक्य नाही हे उमगलं. एखादी गोष्ट आपण कुठल्या मार्गाने करावी, यापेक्षा कशी लवकर मिळवावी यावरच विचार येथे होतो. हटवादीपणा आणि अविचार जर हे पद भूषवण्यासाठी गरजेचे असेल, तर ते काही आपल्याला जमणे शक्य नाही. त्यात पुन्हा मर्यादा, मान, प्रोटोकॉल, जागा, ज्येष्ठत्व आणि कारकुनी प्रक्रिया - यांतच अडकून पडायची चूक मला करायची नव्हती. मला बदलून जायचे नव्हते.

आज या निर्णयामुळे मी आनंदात जगतो आहे हे सांगावेसे वाटते. प्राणी, वनस्पती, जंगलं, नद्या, यांचे अध्ययन आणि अभ्यास करण्यात जो गोडवा, प्रेम आणि समाधान लाभते आहे ते दुसऱ्या कशातही नाही. मला माझ्या आयुष्यात कायम एवढेच करत राहण्याची मनापासून इच्छा आहे. अधिकारी किंवा तज्ज्ञ म्हणून ओळखले जाण्यापेक्षा एक विद्यार्थी म्हणून माझी कायम ओळख असावी, इतकेच वाटते.

**- गणेशोत्सव २०१५**



# पत्रास कारण की.....

- स्मिता तळाशीकर

**प्रिय, प्रियतर, प्रियतम,**

पत्र लिहिण्यास कारण की,.... बरं, एक क्षण थांबतेच... कारण तू म्हणशील एवढी कृत्रिमता कशाला? पत्र पाठवायची गरजच काय? जे काही आहे ते स्वच्छ, स्पष्ट बोलून दाखवता येत नाही का? प्रत्यक्ष समोरासमोर न बोलता येण्यासारखं काय आहे एवढं? हो बाबा हो, मला माहीत आहे की प्रत्यक्ष बोलण्याइतकी संवादाची श्रेष्ठ पद्धत दुसरी नाहीच मुळी! पण तू हे जाणतोस का? की तुझ्या सहवासात असताना मी माझी राहातच नाही मुळी.... जसा तू असशील ना तशीच मी होऊन जाते... त्यावेळी मी स्वतः म्हणून कुणी वेगळी आहे, याचं भानच नाहीसं होऊन जातं बघ माझं.... अगदी आतून बाहेरून मी केवळ तूच आणि तूच असते... तू खुश की मी खुश. तू दुःखी की मी दुःखी, तू रागात की मी रागात, तू निराश कि मी निराश......इतकी की ते नैराश्य, ते दुःख, तो राग, माझा नाही आणि माझा असूच शकत नाही ही भावना मला स्पर्शही करत नाही. असं असताना, तुझ्या समोर येऊन तुला काही सांगणे खरंच, शक्य आहे का रे मला ?

तर, म्हणून हा सारा पत्राचा खटाटोप! खरंतर हल्ली पत्र लिहितंय का कोणी? इ-मेल, फोन, मेसेज पाठवतात सगळे, पण आपल्या नात्यात हे सर्व अशक्यच! नाही का? तू आणि मी इतके

एकरूप आहोत की तुझा फोन, तोच माझा फोन.... अंहं नाहीच मुळी, माझा फोन तोच तुझा फोन, माझी इ-मेल तीच तुझी इ-मेल हो ना? इथे मात्र माझं श्रेष्ठत्व तुला मान्यच करावे लागेल. मनाला कधी कुणी वेगळा, फोन वेगळी इ-मेल देतं तरी का?

बरं आता महत्त्वाचे, हे मना! जन्मल्यापासून आजतागायत मी तुझ्याच तालावर नाचत आहे. पण तरीही मी तुझ्यापसून वेगळी आणि स्वतंत्र आहे व उगीचच तुला माझा समजते आहे, हे हळूहळू माझ्या लक्षात यायला लागले आहे. अजून मी म्हणजे नक्की कोण ते मला नीटसं समजलेलं नाही, पण 'मी म्हणजे तू नाही' ही मात्र माझी पक्की खात्री झाली आहे.

माझ्या मना! तुला खरं सांगू? हे तुझ्याबरोबर असं सारखं भावनांचे हेलकावे खात राहणं, सुखी-दुःखी होणं, उत्साही होणं-उदास होणं, खोटे खोटे आनंदी आहोत असं भासवणं, याचा मला अगदी कंटाळा आलाय रे. किती दिवस अशी तुझ्यामागे धावत राहू रे मी? आता हे भावनांचे चढ-उतार चढून, उतरून अगदी दमून गेलीये रे मी! ही सततची अस्थिरता नकोय मला आता.. शांत, एकांत, समतोल स्थितीत रहावे असे वाटतंय रे मला... आणि म्हणूनच तुझ्यापासून थोडे दूर, थोडे वेगळे, व्हायचे मी आता नक्की केले आहे.

आता माझ्या वागण्यातून माझे हे वेगळेपण दिसायला आणि जाणवायला लागेल तुला. मी तुझ्यापेक्षा वेगळी आहे हे ही समजायला लागेल तुला. तुझे राग-लोभ, तुझे प्रेम-द्वेष, असूया, ईर्ष्या, मत्सर हे सगळे यापुढे फक्त तुझे आणि तुझेच असणार आहे. मी त्यांच्या थोडीही संपर्कात येणार नाही याची मी काळजी घेणार आहे. तुला वाटले की

मी उत्साहात, तुझा मूड नसला की मी उदास, असे यापुढे होणार नाही. आता, हे सगळे मला एकदम जमेल असे नाही, परंतु माझा असा प्रयत्न चालू आहे हे तुला नक्की कळेलच!

मला माहीत आहे की सगळं तुला मुळीच पटणार नाही, आणि तू हे माझं वागणं सहनही करणार नाहीस! काहीही करून तू मला पुन्हा तुझ्या ताब्यात ठेवायला पाहशील. वेगवेगळ्या वेळी, वेगवेगळ्या प्रसंगात तू मला ओढून नेऊन गुंतवशील आणि कदाचित मीही गुंतेन.. पण केव्हातरी हे माझ्या लक्षात येईल आणि त्यावेळी मात्र मी पुन्हा तुझ्या तावडीतून निसटून जाईन. तू मला कितीही तुझ्या कह्यात ठेवायचा प्रयत्न केलास, तरी एक दिवस असा येईल की तूच माझ्या ताब्यात येशील.

तर आता तरी हे नक्की समजून घे, की हा बदल होणे अटळ आहे. या परिवर्तनाला किती दिवस लागतील ते सर्वस्वी आपल्या दोघांवर अवलंबून आहे. आपण एकमेकांना, म्हणजे खरे तर तू मला, किती सहकार्य करतोस त्यावर ते अवलंबून आहे. पण हा बदल होणारच हे नक्की! तुझेही माझ्यावर माझ्यासारखेच प्रेम असेल, तर तू मला ह्या प्रवासात नक्की मदत करू शकशील, कशी? तर,

माझ्या मना बन दगड,
सुखे येतील,दुःखे येतील
सुख-दुःखावरची सैल कर पकड,
माझ्या मना बन दगड.......

ही त्या मदतीची पहिली पायरी असेल. ह्या मार्गावरुन आपण दोघे बरेच पुढे जाऊ शकतो. पण ते सर्व तुझी माझ्या हा निर्णयावर

काय  प्रतिक्रिया असेल त्यावरच ठरेल. आशा आहे की, तू मला साथच देशील आणि ह्या शांती आणि समाधानाच्या प्रवासात माझ्या खांद्याला खांदा लावून सहभागी होशील.

तुझ्या सहकार्याची अभिलाषी, तुझी,
मनस्विनी.

ता. क. - ही धमकी नाही, तुझे सहकार्य मला नक्कीच मिळेल, पण अन्यथा मनोबोध, दासबोध, गाथा, ज्ञानेश्वरी, भागवत यातील विचारांशी सामना करायची तयारी ठेवावी लागेल. सुज्ञांस अधिक सांगणे न लगे!!

**- गणेशोत्सव २०१५**



# पु.ल. आणि थ्री इडियट्स

**- स्नेहा केतकर**

परवा पुलंचे ‘बिगरी ते matric’ ऐकत होते. हात कामात होते, पण मन मात्र पुलंच्या शब्दात रंगले होते. मला माझ्या बालपणात घेऊन जात होते. अगदी हसत हसत, विनोदाच्या माध्यमातून पुलंनी मांडलेला विचार, प्रश्न आजच्या काळाशीही किती निगडित आहे, हे जाणवले. इतिहासासारखा मनोरंजक विषय, पण शाळेमध्ये सनावळ्यांमध्ये, तहाच्या कलमात कसा हरवून जायचा ते आठवले. आज उत्साहाने गूगलवर जाऊन वेगवेगळ्या ठिकाणचे नकाशे पहाणारी मी, शाळेत मात्र भूगोलाला घाबरायचे. कारण कोणत्या ठिकाणी कोणते पीक येते, कोणती खनिजे आहेत हे मला जाम लक्षात राहायचे नाही. पुलंच्या लेखातल्या शेवटच्या ओळीही मनावर आघात करून गेल्या. ‘आमचं बालपण करपून गेलं’ हे हसत सांगणारे पुलं स्वतःची व्यथाच सांगून गेले.

या शिकलेल्या विषयांची पुढच्या आयुष्यात कधी जरूरी पडली नाही, हे ऐकताना मला एकदम ‘शिक्षणाच्या आयचा घो’ मधला लाचार बाप आठवला. ‘शिल्पकला शिकणाऱ्या विद्यार्थ्याला गणितात पास होण्याची सक्ती कशाला’ असे तळमळीने मुख्यमंत्र्यांना विचारणारा! मुलाच्या चांगल्यासाठीच, पण शिस्त लावण्याच्या नादात त्याच्या मनावर आणि शरीरावरही आघात करणारा!

मार्क, ॲडमिशन, नोकरी-या चक्रात अडकलेली आपण सारी! मुलांना काय आवडतं, त्यांना कशात गती आहे, हे आपल्या ध्यानातही नसते. आठवी आली की मुले आणि पालक शिकवण्या, प्रवेश परीक्षांच्या बुद्धिबळात गुरफटून जातात. या शिक्षणपद्धतीत आपण सारीच प्यादी बनलेलो आहोत. कारण आज 'यश', 'सुख' या संकल्पनाही शिक्षण, नोकरी, पगार यांच्याशीच जोडल्या गेल्या आहेत. या गदारोळात मग एखादी चांगली गाणारी मुलगी वा मुलगा, एखादा लेखनाची आवड असणारा मुलगा किंवा एखादा चित्रकलेत गती असणारा विद्यार्थी हा आपली कलाही नाकारू शकतो, कारण या कलागुणांना काहीच 'किंमत' नाही हेच त्यांच्या सतत कानी कपाळी सांगितले जाते.

'कॅनव्हास' नावाच्या एका मराठी सिनेमात एक चित्रकार, आपल्या शिक्षक वडिलांच्या आवडत्या विद्यार्थ्यांना ठार मारतो. कारण वडिलांनी सतत त्याचा पाणउतारा केलेला असतो. आंतरराष्ट्रीय दर्जाचा पुरस्कार मिळवूनही वडिलांना त्यांचे डॉक्टर, इंजिनीअर झालेले विद्यार्थीच प्रिय असतात.

आपल्या शिक्षणपद्धतीत आपल्याला निवडीचे स्वातंत्र्य नाही. गणितात हुशार असलेल्या मुलाला, गती नसली, तरी भाषेत वा इतिहासात भरपूर मार्क मिळवण्याची सक्ती आपली ही पद्धती करते. सर्व विषय आलेच पाहिजेत या विचारांमुळे नावडते विषयही मुलांना शिकावेच लागतात. याचाही मुलांवर ताण पडतोच.

तुम्ही भारतातून परदेशात शिकायला गेलेल्या मुलांचे लेख कधी वाचलेत? त्यात पहिल्याच परिच्छेदात लिहिलेले असते की, 'तिथे नं आपण आपले विषय निवडू शकतो' याचाच आनंद मुलांना इतका होतो की मग तो त्यांच्या साऱ्या शिक्षणावरच नव्हे, तर व्यक्तिमत्त्वावरही

परिणाम करतो. स्वतः निवडलेले विषय मग अधिक आवडीने, जबाबदारीने, मन लावून अभ्यासले जातात.

चेतन भगत यांच्या 'Five point someone' मध्ये हीच व्यथा मांडली आहे. 'I.I.T.'सारख्या संस्थेतही फक्त मार्कांना महत्त्व आहे. येथेही नव्या विचारांना, कल्पनांना स्थान नाही.

3 idiots मधला रान्चो म्हणतो, 'काबिल बनने के लिए पढो. फिर कामयाबी तुम्हारे पीछे भागेगी'. पण आजही चित्र बदललेले नाही. आयुष्याला अर्थ देणाऱ्या, समृद्ध करणाऱ्या भाषा, इतिहास, समाजशास्त्र, चित्रकला, नाट्यकला, साहित्य या विषयांना 'option'ला टाकले जाते. हे विषय घेऊनही करिअर करता येते याची अनेकांना जाणीवही नाही किंवा असली तरी यातून पैसा मिळणार नाही हेच मनावर ठसवले जाते.

'पुलं'पासून 'चेतन भगत' पर्यंत सगळ्यांना या एकांगी शिक्षणपद्धतीची सल जाणवते. पण ती दूर कशी करायची हा प्रश्न आहे. तिथपर्यंत आपली मुलं अशीच 'Well trained' राहणार 'Well educated' होणार नाहीत!

- जुलै २०१६



# पंतप्रधानांना खुले पत्र

- नेहा भदे

माणणीय पंतपरधान सायेब साष्टांग नमस्कार इनंति इशेष,

आपलं खास अभिनंदन करावं म्हनून आमी दिल्लीला येऊन तुमास्नी भेटनार हुतो. पन तुमी दिल्लीत फार कमी आसता असं दिसून आलं. तवा आमच्या भावना तुमास्नी पोचवाव्यात म्हनून पत्र लिहिन्याचा परपंच केला हाये.

तुमी पंतपरधान झालात याचा आमाला लई म्हनजी लईच आणंद झाला. तुमी लई कामाचं मानूस, येका ठिकानी टिकाल तर शपथ! आज हितं तर उदया तिथं! मारूतीवानी सत्राणे उड्डाणे करीत कुटं पोचाल आन् कुटं न्हाई याचा काय बी भरूसा न्हाई! त्यो मारूति येक ब्यॅचलर आन् तुमी दुसरं! आता खटलच नाय म्हंटल्यावर मानसाला दाही दिशा मोकळ्याच की राव!

तुमचं फ्रेंडसरकल बी लई तगडं! ओबामा सायबाला उगाच म्हनंल का कोनी 'बराक' म्हनून? मैतरी आसावी तर अश्शी. ह्या खेपेला तर टरंप सायबांच्या मिशेश म्हनजी साक्षात मेलेनिया वयनी जातीनं तुमच्या स्वागताला दारात येऊन हुब्या? त्यांच्याकडं भाकरतुकडा घिऊन ववाळीत न्हाईत म्हनून, पन आमची छाती ५६ का ५७ इंचाची झालीच!

तुमी बोहल्यावर चडलाबी आन लगोलग उतरलाबी! पन तुमास्नी बाईमानसाचं वावडं न्हाई, ह्ये आंधळं बी सांगिल!

तेरेसा माई, मारकल काकू, इव्हांकाताई आनि मेलेनिया वयनींचा हात दाबून रिसपेक्ट दिलेला आमी टीवीवर पायला. त्यांच्या धाकल्या ल्योकाची ॲडमिसन झाली का वो वॉशिंग्टन् डी शी त? पोरास्नी साळत दाखिल करी पावतोर आईबापाच्या जिवाला लई घोर! नाईट मेयर!

आता नाईट मेयर चा आरंभ आमी सांगायचा का राव! तुमी नुसतं 'मित्रों' म्हना, समदया लोकास्नी 'नाईट मेयर' सुरू! काये ना, तुमी डी-मॉनिटायजेशन क्येलं, त्ये बी कुनाला काय बी कळू न देता! लोकास्नी डी-वर्मिंग माहिती हुतं. त्ये बी येका रात्रीतच हुतं. रातची एक गोळी घ्येतली की सकाळी मानूस येकदम हलका! बारं त्ये जाऊ दे. झालं गेलं गंगेला मिळालं. गंगेवरून आठवन झाली तुमी जपानच्या पंतपरधानाला गंगेची आरती कराया घिऊन ग्येलात. त्यालाबी थोडं पुन्य मिळालं आसल.

चांगल्या मानसाला सगळीकडं चांगलीच मानसं भ्येटतात! त्यो नेतान्याहू किती थोर नेता! तुमा दोगांची गळामिठी पाहून आमचं ऊर भरून आलं. त्यालाबी गहिवरून आलेलं दिसलं, पर त्यो तसं दाखवित न्हवता! आपन छान केलेली गंगा, साफ करून द्येतो म्हनाला ना तो? आजून काय पायजे मानसाला? म्हनजी आपलं स्वच्छता अभियान बी सक्ससफूल.

घानीवरून आठिवलं, त्यो चायनाचा राष्ट्रपती 'शी' लईच वंगाळ मानूस! त्याच्या नावातच 'शी' हाये म्हना!

त्येच्या पिचपिच्या डोळयात लई लब्बाडी हाये! तुमी बी आफझल खान-शिवाजी भ्येट आठवा आन् मगच त्याला अपाईंटमिंट दया! आपल्या भारताला सिक्युरिटी कांउसिलमधी जागा मिळू नये म्हनून लईच हातपाय मारून राहिलय ब्येणं! त्याच्या घरचा च्या पितो का आमी, का आमाला घरी जेवायला मिळत न्हाई?

तुमी दुबई आन् आबुधाबीला ग्येलात, थित तर शेख लोकांनी आपल्या द्येवळासाठी जागा दिली! तुमच्या बरुबर क्येळीच्या पानावर बिन तिखटाचं जेवनबी जेवली! आमाला व्याही भोजन आन् रुखवताची पंगतच आठवली! आपल्या इकडल्या चालीरिती त्यांस्नी ठावं हायेत ह्याचं इशेष कवतिक वाटलं! त्यांचा असा भक्तिभाव पाहून, येक शजेशन करावी वाटली म्हनजी बगा तुमाला पटतिय का? 'येकाडाव पंढरपूरला बोलवा कि समदयास्नी, आपल्या 'इठू'च्या दरशनाला!' फकस्त वारींच्या दिवशी नगो. उगाच त्यांच्या सफ्येद झग्यावर कुनाचं पाय पडाया नगो म्हनून म्हंटलं.

तुमी रशियाला बी ग्येलात. त्यो पुटीन क्येवढा खमक्या मानूस, पन तुमचा मोठ्या भावावानी आदर करतो. तुमाला ह्ये दांडगा आहिर क्येलाला पायला तवा माझा अख्खा हातच्या हात तोंडात ग्येला!

कधी मधी तुमी घरीबी येता. घरी आलात की येगयेगळ्या आयडिया तुमाला सुचतात! आता तुमी जी एस टी म्हनून नवच टॅक्स आनलत. भारतातल्या लोकास्नी वाटाया लागलंय की तुमी भाहिरच परवडलं! तुमी आपलं भारताची प्रतिमा भाहिरच्या देशात उंचावित फिरा!

तुमी इंग्लंडच्या राणीला भेटलातं! तिनंबी आपुलकीनं तुमचा हात हातात घेतला! त्येबी हातात सॉक्स न घालता! हिकडं शरीफच्या पोटात लई मोठ्ठी कळ आली! कधीकधी कुनीकुनी रीतभात सोडून स्वागत करतव्य पावन्याच! का तर म्हनं, तुमाला ठ्येपला, खाकरा, खमण ढोकळा रांधून वाढल्या नं रानीनं त्ये ह्याला बघिवल न्हाई! त्याच्या लेकीच्या लगनाला येळातयेळ काढून तुमी जाऊन आलात. पन् त्याचं काई हाये का याला? नुसता नावाचाच शरीफ! बाकी समदा आणंदच हाये म्हना! आजून त्याची शंभरी भरलेली दिसत न्हाई, येकदा का ती भरली मग बसल जेलमंदी पनामा शिगरेटी वढीत! त्याच्यावर कितीबी मोटा सरजिकल स्ट्राईक करा काय बी उपयोग व्हायचा न्हाई! काये ना त्याचा दुखनं मानसिक हाये! येकवेळ शारीरिक दुखनं परवडलं पन मानसिक नगो!

तुमी जिकडं जाता तिगडं बायाबापड्या आरत्यांची तबकं घिऊन हुब्या! जया बच्चनच जनू!

आमाला वाटलं तिकडं युरोपियन युनियन मधी तुमाला कोनी वळखित नसल पन् आमचच चुकलं! नेदरलँडसच्या पंतपरधानानी, मित्राला सायकल चालवाया द्यावी तशी तुमास्नी साईकिल दिली! आन् हिकडं घरी मुलायमरावांनी घरच डोक्यावर घेतलं पोरांवर असलं डोळं वटारलं! आमाला वाटलं हुनं मुलामय स्वबावानी मुलायम असतील, पन येकदा का राग आला की पोरगं बघित नाहीत का त्याचा काका! आपल्यात काय म्हनतात, येकदा का बापाचं पायताण पोराला व्हायला लागलं की त्याच्या आंगाला बोट बी लावू नये आन् त्याला बोलू बी नये. आन् त्याच्यासंगट 'डिंपलबहू', पन हाये ना! डिंपलबहू आन्

प्रियांकाताई फास्ट फ्रेंड! पोरिंचं कसं आसतं, एकीला जर कळालं का परीक्षेत आपन नापास हुनार तर दुसरीबी नापास हुईल असं बघत्यात! आता अखिलेशला आपली चूक समजून आली. उशीरा का हुईना अक्कल आली! तिकडं सोनियाबाईंच्या राहुल्याला मॅच्युरिटी येता येईना! जोवर लेकरू स्वताच्या पायावर हुबं रहात नाही तवर विधवा आईला लोकांची कापडं मशिनवर, शिवावीच लागतात. तुमी मित्रांबरुबर सेल्फी घेता आन् व्टिटरवर टाकता, भाहिरच्या देशात जाऊन टेरोरिझमवर भाषन देता, जागृति करता, पन हिकडं काईकाई लोकास्नी ते बघवत न्हाई. माजी मन की बात आयका. तुमच्या मायला म्हनावं, मीठ मोहऱ्यांनी दृष्ट काढून चुलीत टाक "इडापिडा टळो आन् दृष्ट टाकनाऱ्याचे डोळे फुटोत" आता आमचं पुरान बास करतो. तुमाला लई कामं आसतिल. व्टिटरवर फुटो टाकायचं असत्याल दुसऱ्या देशांचा व्हिसा घ्यायचा आसल. झालाच तर आधारकार्ड कुठंकुठं लिंक करता यिल ह्याची आयडिया काडायची आसल! पासपोर्ट ला आधारकार्ड लिंक केलं तर कस?

बरं दिसल का त्ये? इचार करून ठिवा तुमचा निरोप घितो.

रामराम.

**- गणेशोत्सव २०१७**



# जीवनसंगीत

- हृषिकेश मोघे

'बहुत सुकृतांची जोडी, म्हणुनी विठ्ठले आवडी' असे तुकोबारायांनी म्हणून ठेवले आहे. काहीसं तसंच संगीताचं. संगीताची ज्यांना गोडी आहे, शास्त्र कळत असो अथवा नसो, पण संगीताबद्दल ज्यांचे मन संवेदनशील आहे, ज्यांना स्वरांच्या आणि लयीच्या शब्दापलीकडच्या अनुभूती अनुभवता येतात, तेचि पुरुष भाग्याचे!

सामान्यत: सर्वसामान्य लोक संगीताकडे फक्त एक करमणुकीचे किंवा मनोरंजनाचे साधन म्हणूनच बघतात. सर्वसामान्य लोकच कशाला, नवशिके संगीतार्थीसुद्धा संगीताला प्रामुख्याने मनोरंजनाचे साधनच समजतात. पण ज्या रसिकजनांना किंवा संगीतार्थींना थोडी प्रगल्भता प्राप्त होते, त्यांना हे उमगू लागते की संगीताचा आणि मानवी जीवनाचा सरळ संबंध आहे.

ते कसे काय? तर ते असे. 'संगीत' कशाला म्हणतात? किंवा म्हणू शकतो? याविषयी अनेक विद्वानांनी अनेक व्याख्या केल्या आहेत. त्यातील बऱ्याचशा सादरीकरणाच्या किंवा समीक्षेच्या दृष्टीने आहेत. पण आपण इथे अगदी मूलभूत रीतीने संगीत कशाला म्हणता येईल, याचा विचार करू. तर जे ऐकायला छान वाटेल, सुंदर वाटेल, जे पुन्हा ऐकावेसे वाटेल, ज्याला काही आकार आहे, ज्याच्यात काही

अमूर्त आणि अवर्णनीय का होईना, पण अर्थ आहे असं जाणवेल, त्याला 'संगीत' म्हणता येईल.

आता हे असे चांगले संगीत होण्यासाठीच्या मूलभूत गोष्टी कुठल्या आहेत? तर स्वर आणि लय, हे आपल्याला माहीत आहे. त्यातील दर्जे, हा पुढचा भाग झाला. पण मुळात स्वर आणि लय ह्या दोन प्रमुख गोष्टी आहेत.

स्वर हे सौंदर्याचे, नेमकेपणाचे, योग्यपणाचे द्योतक आहे, तर लय ही 'वेळेचे आणि गतीचे भान' किंवा timing चे द्योतक आहे. स्वराच्या, लयीच्या आधारावर संगीत खुलते. जीवनातही तसेच आहे. जगताना सौंदर्याची, नेमकेपणाची दृष्टी, योग्यपणाची जाण आणि वेळेचे, गतीचे भान असेल तर साध्या गोष्टीही खुलून दिसतात, सुंदर वाटतात.

गाण्याला 'समे'ला फार महत्त्व आहे. समेच्या अनुषंगानेच गायक, वादक गाणे खुलवत असतो. समेच्या अनुषंगानेच कुठली जागा कितपत खुलवायची, किती (तालाच्या) मात्रा जाऊ द्यायच्या, कुठून कुठली जागा उचलायची, कशी उचलायची हे ठरवले जाते, जेणेकरून समेवर सुंदरतेने येता येईल. हीच गोष्ट आयुष्यातही लागू आहे. वागण्यात, बोलण्यात, केव्हा काय बोलायचे, काय बोलायचे नाही किंवा करायचे, करायचे नाही, जेणेकरून आपले ईप्सित योग्य प्रकारे साध्य होईल, याचे भान असेल व त्याप्रमाणे वागले बोलले, तर ईप्सित योग्य प्रकारे साध्य होऊ शकेल, कार्य सुंदर पद्धतीने होऊ शकेल. थोरामोठ्यांच्या चरित्रात, उदा. शिवाजी महाराजांसारख्यांच्या चरित्रात तर ही गोष्ट प्रकर्षाने आढळते. कुठली गोष्ट कशी करायची,

केव्हा करायची किंवा करायची नाही, याचे सतत भान ठेवूनच त्यांनी प्रत्येक कार्य केले आहे. पण त्यामागे विचार हा 'सुराज्य' निर्मितीचाच होता. एकप्रकारची ही प्रत्यक्ष आयुष्यातली संगीतनिर्मितीच आहे. भगवान श्रीकृष्णांच्या चरित्रात तर हे जीवनसंगीत फारच प्रकर्षाने खुललेले आढळते. साधूसंतांच्या, समाज सुधारकांच्या चरित्रातही आपल्याला हेच आढळेल.

आमचेही हे निरीक्षण आहे की ज्या लोकांना संगीताची, विशेषत: लयीची चांगली जाण नसते, त्यांच्या वागण्या-बोलण्यात, उठण्या-बसण्यात काम करण्याच्या पद्धतीत timing चे काहीच भान नसते. त्यामुळे त्यांच्या कुठल्याच गोष्टीत आकर्षकपणा आणि विवेक, विचार दिसत नाही. बहुतेक वेळी असे लोक नको तेव्हा, नको तिथे, नको त्या पद्धतीने वागून बोलून कामे बिघडवून ठेवतात. काही वेळा असे लोक 'कशाला एवढा विचार करायचा, जे वाटेल ते करून मोकळे व्हावे' अशी विधाने करताना आढळतात. हे म्हणजे 'कशाला समेवर यायचे, कसेही गात राहावे' असे म्हणण्यासारखे आहे. अर्थात, हे प्रत्येकाच्या बाबतीत असेच असेल असे नाही, पण बऱ्याच लोकांच्या बाबतीत असे आढळून येते. आम्हाला वाटते की अशा लोकांनी संगीत शिकण्याचा प्रयत्न केला, तर त्यांच्यातील ही उणीव काही अंशीतरी भरून काढता येईल. नाहीच साध्य झाले, तरी निदान त्यांच्यातल्या या उणीवेची त्यांना जाणीव होईल आणि याबाबतीत ते विनम्र होतील. हेही नसे थोडके!

संगीतातील आणखी एक महत्त्वाचा घटक म्हणजे गायकाचा मूळ स्वर किंवा ज्याला आपण सामान्य भाषेत 'पट्टी' म्हणतो, तो.

ही 'पट्टी' किंवा स्वर हे प्रत्येकाच्या स्वाभाविक वृत्ती-प्रवृत्तीचे किंवा स्थायीभावाचे द्योतक आहे, ज्याला आपण इंग्रजीत comfort zone म्हणतो. आपल्या पट्टीत गाताना गायक सुखी समाधानी असतो आणि त्यातच तो त्याचे गाणे सुंदर रीतीने खुलवू शकतो. ऐकणाऱ्यांनाही ते छान वाटते. न झेपणाऱ्या पट्टीत गायक गायला लागला, की त्याचे गाणे त्यालाही समाधानकारक वाटत नाही आणि ऐकणाऱ्यांनाही आनंददायी वाटत नाही, सुंदर वाटत नाही. यालाच भगवद्गीतेत 'स्वधर्मे निधनं श्रेयः' म्हटले आहे. अर्थात, या वचनाची व्याप्ती फार मोठी आहे, पण हाही त्यातला एक अर्थ आहे. उदा. आयुर्वेदात कफ प्रकृती, वात प्रकृती, पित्त प्रकृती इ. शरीराच्या प्रकृती सांगितल्या आहेत. आता एखाद्या घरात दिवसातनं अनेक वेळा चहा घ्यायची सगळ्यांना सवय असू शकते. पण त्याच घरातील एखादा माणूस बिचारा पित्त प्रकृतीचा असेल, तर त्याला या सवयीचा त्रास होईल. तोच एखादा कफ प्रकृतीचा असेल तर त्याला या सवयीचा फारसा त्रास होणार नाही. कारण दोघांची प्रकृती वेगळी आहे. म्हणजेच दोघांची 'पट्टी' वेगळी आहे. पु.लं.च्या 'तुझे आहे तुजपाशी' या नाटकातील शेवटच्या अंकात पु.लं.नी हीच उपमा वापरली आहे. जेव्हा खोटेपणाने आचार्यपणा मिरवणारे 'आचार्य पोफळे गुरूजी' हे प्रांजळपणे कबूल करतात की हे आचार्यपण त्यांच्यावर लादले गेले होते आणि शेवटी त्यांचा दुराग्रहीपणा सोडून, आयुष्यभर मनात साठून राहिलेल्या दुःखाला अश्रुंवाटे वाट मोकळी करून देतात, त्यांच्या मानस कन्येला 'लग्न कर, सुखाने संसार कर' असा मोकळ्या मनाने आशीर्वाद देतात आणि खोटा आचार्यपणा सोडून, सामान्य माणसासारखं जगण्याचा निश्चय करून निघून जायला लागतात, तेव्हा तिथे उपस्थित

असलेले 'काकाजी' आचार्यांच्या मानसकन्येला सांगतात 'थांब.. जाऊ दे त्यांना.. त्यांच्या आयुष्याचे तंबोरे आता मस्त जुळून राहिलेत..' अर्थात, आता त्यांना त्यांचा खरा सूर सापडला.

संगीतातला आणखीन एक महत्त्वाचा पैलू म्हणजे गाण्याचा मजकूर व त्याचा आराखडा यावर विचार करून गाणे, वाजवणे, अशा वेळेस गायक त्या रागातील सगळे संभाव्य रंग अथवा भाव खुलवून दाखवू शकेलच असे नाही. कारण वेळेचं बंधन व वेळेचं भान ठेवूनच गावे लागते. म्हणून असलेल्या वेळेत काय उत्तम रीतीने मांडता येईल, खुलवता येईल, याचे भान ठेवून, अनावश्यक ते टाळून गायक आपले गाणे रंगवत असतो. यालाच रोजच्या व्यवहारात आपण 'prioritization' म्हणतो, जे अत्यंत आवश्यक असते. यातून चुकीच्या अपेक्षा ठेवल्याने येणारे अनावश्यक दुःख आणि 'एक न धड भाराभर चिंध्या' या दोन्ही गोष्टी टाळता येतात. पर्यायाने, माणूस बऱ्याच अंशी सुखी समाधानी राहू शकतो. आणि जो स्वतः सुखी समाधानी असतो, त्याची सोबत इतरांनाही सुखावहच वाटेल. इथे व.पु. काळ्यांचे एक वाक्य नमूद करावेसे वाटते की 'आयुष्याचे संगीताप्रमाणे आहे. जसे एखाद्या विशिष्ट रागात काही सूर वर्ज्य करावे लागतात.' त्याचप्रमाणे आयुष्यात काही विशिष्ट गोष्टी साध्य करताना काही गोष्टी तेवढ्या पुरत्या बाजूला साराव्या लागतात.

संगीत ही केवळ करमणुकीची आणि मेहनत करून सादर करण्याची गोष्टच नव्हे. संगीत ही खरंतर साहित्याप्रमाणेच, संस्कारांची गोष्ट आहे. पुष्कळांना हे कळत नाही. नुसताच घोटून रियाझ करत असतात. पण अनेक वर्ष रियाझ करून आणि गाणी बसवून देखील

त्यांच्या स्वभावात (किंबहुना स्वभाव दोषात) काहीही सुधारणा होत नाही. पुन्हा जैसे थे!

स्वतःला पंडित म्हणवणारे सुद्धा अतिशय सुंदर राग अत्यंत नीरस आणि रटाळ पद्धतीने सादर करताना आपण ऐकतो. मग त्यांच्या त्या संगीत साधनेचा काय उपयोग? अर्थात, यात त्यांचा संपूर्ण दोष आहे असे म्हणता येणार नाही. कारण अनेक शब्द जे सांगू शकत नाहीत, जे सांगून जाण्याची ताकद संगीतात आहे, अशी प्रत्यक्ष अनुभूती देणारे संगीतकार सापडणे कठीण आहे. ज्यांना असे संगीतकार ऐकायला मिळाले नाहीत, तेचि पुरुष दुर्भाग्याचे. पण ज्यांना असे संगीतकार व त्यांचे संगीत ऐकायला मिळाले आहेत, तेच 'संस्कारी' लोक ही अनुभूती इतरांनाही देऊ शकतात. निदान तसा प्रयत्न तरी करू शकतात.

पण हे तेव्हाच शक्य आहे, जेव्हा संगीतार्थी लोक निव्वळ 'विहिरीतील बेडूक' बनून न राहता, चौफेर लक्ष ठेवून मधमाशीप्रमाणे चहूकडून संगीताच्या संस्कारांचा साठा करत राहतात आणि ती अनुभूती इतरांनाही देतात. आणि असा शोध घेता घेता जर शब्दातीत अनुभूती देऊ शकणाऱ्या संगीतकारांची, गायकांची गायकी, त्यांचे संगीत त्यांना अनुभवता आले तर निश्चितच तो संगीतार्थी लीन होईल, विनम्र होईल. आणि विनम्रता ही मनुष्याचे व्यक्तिमत्त्व सुंदर बनवते, माणसाला शहाणे बनवते आणि माणसाला नेहमी विद्यार्थी दशेतच ठेवते. सॉक्रेटिसचे एक सुंदर वाक्य आहे 'All I know is I know nothing'.

आम्हाला वाटते की आमचे सांगणे आपल्यापर्यंत पोहोचले आहे. सुज्ञास अधिक सांगणे न लगे. शेवटी आम्हीच वर लिहिल्याप्रमाणे,

किती विस्तार करावा आणि कुठे थांबावे याचे भान संगीतप्रेमींना असायला पाहिजे. म्हणून आम्हाला एवढा 'विस्तार' पुरे वाटतो आणि आमचे म्हणणे आम्ही येथेच थांबवतो.

**- गणेशोत्सव २०१७**





# समाधानाई-तृप्ताई

- मानसी होळेहोन्नूरु

'अंजू, लक्षात आहे ना यावर्षी गौरी गणपती तुमच्याकडेच बसवायचे आहेत. सवाष्ण सांगावी लागेल बरं का गौरी जेवतात त्या दिवशी. तरी बरं, आपल्या गौरी उभ्या नाहीत.'

'हो आई सगळे लक्षात आहे, आता इतकी वर्ष तुम्हाला करताना पहिलेच आहे की मी, या वर्षी करेन सगळे नीट. तुम्ही पियुची काळजी घ्या. नववा लागला ना तिला आता.'

'अगं, इकडे या बायका डिलिव्हरीच्या अगदी आदल्या दिवसापर्यंत जातात जॉबला आणि त्यानंतर लगेच ३ महिन्यात परत रुजू पण होतात. आता या रविवारी डोहाळजेवणाचा घाट घातलाय, बघू कसे होईल सगळे.'

'आई, अहो, काही काळजी करू नका, आपल्या घरी नेहेमीच २०, २५ जणांचा गोतावळा असतोच, त्यात अजून एक ५, १० माणसे वाढवा, तेवढीच लोकं असतील आणि नरेनपण असेलच मदतीला. अजून एक सांगू का. तिकडे लोकं येऊन फक्त जेवून नाही जात, सगळे मांडायला, आवरायला देखील मदत करतात. दोन चार जणी तर फोन करून आधीच विचारतील काय मदत करू म्हणून.'

'हो गं अंजू, ते आहेच म्हणा. बरं, ते जाऊ दे आमचा बाळ्या आणि त्याचा बाळ्या कसे आहेत? शनिवारी आपण व्हिडिओ

कॉल करूयात, तेव्हा तुला तयारी पण दाखवेन, काही राहिले तर सांग.'

'हो चालेल चालेल. तुम्हाला गुड नाईट, मी पण पळते शाळेत.'

लेकीच्या बाळंतपणासाठी अंजूच्या सासूबाई अमेरिकेला गेल्या होत्या खऱ्या, पण त्यांचे सगळे लक्ष इकडे लागून राहिले होते. कदाचित बाळाच्या आगमनानंतर त्या त्यात गुंतून पडतील आणि इकडच्या गोष्टींचा त्यांना विसर पडेल असे सगळ्यांनाच वाटत होते. त्यांचे दिवसा-रात्री येणारे मेसेजस, फॉर्वर्डस यामुळे लेकाला सुनेला कळले होते, आईला काही तिथे करमत नाहीये. पण अंतर असे होते की सहजासहजी येणेदेखील जमणार नव्हते. त्यामुळे त्या एकच एक गोष्ट दोनदोनदा तीनतीनदा सांगत होत्या आणि अंजू न चिडता ऐकून घेत होती. कित्येकवेळा तर त्यांचा लेक त्यांचे ऐकून घ्यायचा नाही, पण ती शहाण्या मुलीसारखे सगळे ऐकून घ्यायची. सासऱ्यांना जाऊन पण आता सहा सात वर्ष झाली होती. त्यामुळे कोणाशी बोलायचं हा त्यांना पडलेला एक प्रश्न होता.

अंजूच्या लग्नानंतर वर्षाच्या आत सासरे गेले, पण ते गेल्याच्या दुसऱ्याच दिवशी सासूबाईंनी अंजूला सांगितले होते, 'ते गेले हा निसर्ग धर्म आहे, त्यांना हृदयविकाराचा त्रास होता. आपण शक्य तेवढी सगळी काळजी घेतली, तरीही मृत्यूने त्यांना गाठलेच. यात तुझी काहीच चूक नाही. तू उगाच मनाला लावून घेऊ नकोस आणि पायगुण वगैरे गोष्टींचा विचार देखील करू नकोस, लोक काय म्हणतात याच्याशी मला देणे घेणे नाही.' त्या दिवसानंतर अंजूला एकदम

मोकळे वाटले होते. सासर-माहेरमधले अंतरच जणू संपून गेले होते. ती तिच्या सासूची दुसरी मुलगी झाली होती. त्यामुळेच नणंदेच्या लग्नात अंजू आणि अनिरुद्धने नरेनच्या घरच्यांना आधीच सांगितले होते की काहीही झाले तरी सगळे विधी आईच करणार आणि जर ते पटत नसेल, तर सरळ रजिस्टर लग्न करूया. नरेनच्या लोकांनी अगदी हसत हसत याला परवानगी दिली होती.

असे काळाशी सुसंगत विचार करणारे लोक आपल्या अवतीभोवती आहेत म्हणून अंजूला नेहेमी अभिमान वाटायचा. अगदी कर्मठ घरात देव देव करणाऱ्या घरापेक्षा माणसात देव पाहणाऱ्या या लोकांचा तिला अभिमान होता.

लग्न झाल्यापासून त्यांनी बेंगलोरलाच आपलेसे म्हटले होते, इथे एक नवीन जग वसवत होते. इथली भाषा, इथली संस्कृती यांना समजून घेत होते. गणपती दिवाळीला पाच दिवस तरी काढून ते घरी नक्कीच जात होते. अजून अर्णव लहान होता, त्यामुळे शाळा बुडायचा फारसा प्रश्न आला नव्हता, पण हा पुढचा प्रश्न पियूच्या बाळानेच सोडवला. आईला तिकडे जावे लागणार होतेच, म्हणून तिने अनिरुद्ध आणि अंजूला विचारण्यापेक्षा सांगितले, की आता देव तुमच्याकडेच ठेवा. कधी न कधी तरी तुम्हाला ही जबाबदारी घ्यायचीच होती. मग आता घ्याच.

आता गणपती आपल्याकडेच बसणार म्हणून अर्णव खुश होता. सवाष्ण कोणाला बोलवावं हा एक मोठ्ठा प्रश्न तिच्यासमोर होता. तशा मैत्रिणी बऱ्याच होत्या, पण बहुतेक नोकरी करणाऱ्या नाहीतर लांब राहणाऱ्या. एका जेवणासाठी कोणाला एवढ्या लांब बोलावणं

तसं तिला जीवावरच आले होते. सकाळी सासूबाईंच्या फोनच्या नंतर ती त्याच विचारात होती, तेव्हाच रत्नम्मा त्यांच्या घरी कामाला येत होती. गेली सहा सात वर्ष रत्नमाच्या मदतीनेच ते घर चालवत होते. पहिले अर्णवला सांभाळायला म्हणून यायची आणि उरलेल्या वेळेत घर काम पण करायची, आता फक्त घरकाम म्हणजे भांडी, फरशीचे काम आहे, पण ही तिचे घर असल्यासारखे मधूनच फर्निचर पुसून ठेवते, खिडक्यांच्या काचा पुसते. कित्येकवेळा स्वतः बघूनच कामं ठरवते आणि काम करून मोकळी होते. त्यामुळे ती कधीही बाहेरची वाटलीच नाही. घरातलीच एक सदस्य वाटायची.

तसे गणपतीला अजून एक आठवडा होता, पण आतापासून हळूहळू एकेक तयारी केली, तर शेवटची धावपळ टाळता येईल, आता आज रात्री शांत बसून आपण यादी करूया असे ठरवून ती शाळेसाठी पळाली पण. तसे अनिरुद्ध आणि अर्णव पण मदतीला असणार होतेच, पण तरीही आपल्या पद्धतीने सण साजरा करायचा म्हणजे थोडं व्यवस्थित नियोजन करूनच करावे लागणार. पहिलेच वर्ष आहे, पुढच्या वर्षी जरा अंदाज येईल. पण यावर्षी मात्र नियोजन अगदी पक्के पाहिजे. सासूबाईंनी सुद्धा शाबासकीची थाप दिली पाहिजे असे ती स्वतःलाच बजावत होती.

एक दोन जणींना तिने विचारून पाहिले, सवाष्ण म्हणून याल का? पण प्रत्येकीची काहीतरी कारणे होती. इथल्या लोकल मैत्रिणींना बोलवावे, तर त्यांना आपले जेवण आवडेल की नाही इथपासून शंका. शेवटी मनाचा हिय्या करून तिने सासूबाईंशी बोलायचे ठरवले. ती त्यांना फोन लावणार तेवढ्यात त्यांचाच फोन आला. घरात लक्ष्मी

आल्याचा आनंद त्यांच्या आवाजातून अंजुपर्यंत पोहोचत होता. आता त्यांना काही विचारणे योग्य वाटणार नाही म्हणत तिने मनातला विचार मनातच ठेवला. मामी झाल्याचा आनंद आता ती पण अनुभवत होती.

गणपती बसले, त्यादिवशी व्हिडिओ कॉल वरून सासूबाईंनी सारी व्यवस्था पाहिली. लेकाला सुनेला शाबासकी पण दिली. मग गौरीची पूजा, त्यांना कसे आणायचे हे सगळे सविस्तर सांगितले, आणि सवाष्ण म्हणून कोणाला बोलावले विचारले, ती काही बोलणार तेवढ्यात छोटीचा रडायचा आवाज आला, आणि आणि आपण नंतर बोलू म्हणत फोन संपला पण.

गौरी बसतात त्या दिवशी शनिवारच होता, त्यामुळे सुट्टी घ्यायचा काही प्रश्नच आला नाही. पण त्या दिवशी तिने रत्नम्माला जरा वेळ थांबवून घेतले. तिच्याच मदतीने गौरींना घरी घेतले आणि सजवले. इकडे मुबलक असणाऱ्या फुलांनी सजवून जणू गौराईंना त्यांनी फुलराणीच करून टाकले होते. रत्नम्माचा देखील पाय निघत नव्हता, शेवटी अंधार व्हायला लागल्यावर ती निघते म्हणाली, तेव्हा अंजू म्हणाली, रत्नम्मा उद्या भरजरी साडी नेसून ये, आणि जेवण इकडेच करून जायचे आहे. तसे याआधी पण सणावाराला ती रत्नम्मालाच नाही, तर तिच्या पोरींना पण जेवण पाठवायची.

'अंजू उद्या कोणाला बोलावले आहेस जेवायला?' अनिरुद्धने विचारले.

'तूच बघ उद्या, तुझ्या चांगल्याच ओळखीची आहे सवाष्ण.' अंजूने उगाच सस्पेन्स वाढवला.

रत्नम्मा तिच्याच वेळेला आली, तर अंजूने तिला बाहेरच बसवले, आत कामाला जाउच दिले नाही. आणि सांगितले बाई आज तू माझी लक्ष्मी आहेस. माझे घर आवरतेस, स्वच्छ ठेवतेस, माझ्या लेकरावर स्वतःच्या लेकरासारखी माया करतेस, देव काय याहून वेगळा असतो? अनिरुद्ध गोंधळात पडला होता, पण तरीही बायकोच्या या विचारांचा त्याला आनंदही वाटला आणि भीतीही वाटली-आई काय म्हणेल याची. त्याने अंजूला आतल्या खोलीत बोलावून त्याची शंका विचारली.

'अनि, मला आईंना विचारायचे होते-पण चान्सच मिळाला नाही, ईरा २ आठवडे आधीच आली आणि आई एकदम बिझी होऊन गेल्या. हे बघ, त्या नेहेमीच म्हणतात चांगल्या मनाने केलेली कोणतीही गोष्ट वाईट नसते. भले ती आपल्या समाजाच्या चौकटीत बसत नसेल. तुला आठवतंय अर्णवचे उष्टावणपण आपण रत्नम्माच्याच मांडीवर केले होते, कारण तो तेव्हा तिला अगदी चिटकून असायचा. मला खात्री आहे, या वेळी पण त्या काहीच बोलणार नाहीत.'

रत्नम्माला आनंदही होत होता, पण अवघडल्यासारखे पण होत होते, गेल्या ७, ८ वर्षात तिला मराठी बोलता येत नसली, तरी कळायची आणि ती कन्नडमध्ये जे बोलायची ते अंजूला समजायचे. ती डोळ्यातले पाणी पुसत अक्का, मला केवढा मोठा मान दिला म्हणत होती आणि तिच्या हातावर हात ठेवत अंजू सांगत होती, आमचे जेवण गोड मानून जेवून घ्या, तेव्हाच मला समाधान वाटेल.

तिला पाटावर बसवून रांगोळी काढून, जेव्हा केळीच्या पानावर चार कोशिंबिरी, पाच सहा भाज्या, पुरणपोळी, पंचामृत, वरण भात

खीर, करंज्या, वाढले तेव्हा रत्नम्मा-फक्त अय्यो केवढे काय आहे एवढेच म्हणत होती, मनाने अगदी तृप्त झाली होती ती. तसा एक फोटो अंजूने काढला, आणि त्यांच्या फॅमिली ग्रुपवर टाकला, आता जे काय होईल ते नंतर बघूया. जाताना तिने तिची हळद-कुंकू लावून ओटी भरली आणि एका साडीबरोबरच दक्षिणा म्हणून पैसे दिले. जेव्हा ती नमस्कार करायला वाकली, तेव्हा तिला पाठीवर अगदी आईच्या हाताची ऊब जाणवली. हो तर, तिच्या आईच्याच वयाची असावी ती, दारुडा नवरा आणि तीन पोरींचा संसार मात्र अगदी आनंदाने ओढत होती ती. दोन पोरी लग्न होऊन सासरी गेल्या होत्या, धाकटी अजून शिकत होती. आपण आज काहीच काम न करता फक्त जेवण करून जातोय याचे रत्नम्माला खूप वाईट वाटत होते, पण त्याच वेळी आनंद, समाधान देखील वाटत होते.

तो फोटो आईंनी बघितला आहे, पण अजून काहीच कशा बोलल्या नाहीत, या भीतीत अंजूला जेवणच गेले नाही, तसेही नातीच्यामुळे त्या रात्री अपरात्रीसुद्धा जाग्याच असायच्या. आपण फोन करावा की त्यांच्या फोनची वाट पाहावी. अंजूला काहीच कळत नव्हते, अनिरुद्ध मात्र भरपेट पुरणपोळी ओरपून झोपला होता. शेवटी न राहवून मेसेज करावा आणि आपल्या मनात जे आहे ते सांगावे असा विचार करून अंजूने फोन घेतला तेवढ्यात सासूबाईंचाच फोन आला. 'अंजली,' त्या तिचे पूर्ण नाव चिडल्या किंवा खुशीत असल्यावरच घेतात त्यामुळे तिला कधी नव्हे ती त्यांच्याशी बोलायची भीती वाटायला लागली.

'अंजली, आजवर मला जे जमले नाही, ते तू करून दाखवलेस, मला खूप आनंद झाला!'

'आई, तुम्ही खरेच बोलताय ना की माझे मन राखण्यासाठी बोलताय?'

'अंजू तुला माहिती आहे, आवडले नाही, तर मी आधीच सांगते. आवडले तर मात्र सांगायला काचकूच करते. आता निम्म्या झोपेत आहे, उद्या सकाळी उठल्यावर निवांत बोलते. पण एक नक्की तू माणसात देव पाहायला लागलीस म्हणजे तुला देव कळला. अशीच खूष, समाधानी, विचार करती राहा.'

**- गणेशोत्सव २०१८**



# आरसे नसते तर

- अदिती राव

२००८, सकाळची वेळ - पार्श्वभूमीला आईचा आवाज - 'कॉलेजला उशीर होईल'. पण मी आरशात माझं प्रतिबिंब तपासण्यात तल्लीन - 'लिपस्टिकचा लाल दुपटट्याच्या लालशी तंतोतंत जुळतो ना?'

२०१८, सकाळची वेळ - मुलाला शाळेत सोडण्यास, हाताला आलेले कपडे घालून, क्षणभर आरशाच्या दिशेने भिंतीकडे पाहिले, निघाले.

लेखाचे शीर्षक वाचताच, गेल्या १० वर्षांतला फरक स्पष्ट जाणवला. आरसे नसते तर? दैनिक स्तरावर काहीही बदलले नसते. जीवनाने मला आरशांसारख्या उथळ गोष्टीं पलीकडे नेले होते. ह्या ज्ञानोदयासाठी स्वतःचे अभिनंदन करणारच होते, की जयजयकारात अचानक एक लहानसा प्रामाणिकतेचा सूर उमटला - 'इतकेच का आरशाचे महत्त्व? शृंगाराचे साधन?'

प्रतीक म्हणून आरशांचा उपयोग नवीन नाही, नाटककार, लेखक, चित्रकार, पत्रकार - अनेकांनी विविध संदर्भांमध्ये सांकेतिक किंवा शब्दशः रूपात आरशांचा उल्लेख केलेला आहे. पण मी कलाकार नाही, साधी सरळ अभियंता. वास्तवात लष्करात, ऑटोमोबाईल उद्योगांत, सिग्नलिंग आणि उपकरणांत आरशांचा मोठ्या प्रमाणावर

वापर केला जातो. पण आरसा-रहित तांत्रिक जगाचे अन्वेषण ह्या निबंधाच्या पलीकडे. मग लिहिण्यास राहील काय? चला, ह्या दोन टोकांमध्ये वैयक्तिकरीत्या ओळखू येणारा मध्यबिंदू शोधू.

प्रथम, लेखपरंपरेनुसार 'आरसा' ह्याची लेखसंदर्भी व्याप्ती परिभाषित करू - एक स्पर्शनीय वस्तू, ज्यामध्ये स्वतःचे प्रतिबिंब दिसते. ह्या सर्वसाधारण व्याख्येत जटिल सत्य लपलेले आहे. त्याच्या परिपूर्ण आकलनासाठी उदाहरण घेऊ - एक सर्वसामान्य व्यक्ती व तिचा आरसा.

जन्माला आले, तेव्हा मी होते केवळ एक प्रतिबिंब. 'आईचे डोळे', 'बाबांची जिद्द', त्यांच्या महत्त्वाकांक्षा आणि स्वप्नांची छाया. एक वर्षाला आरशातल्या 'व्यक्ती'शी संवाद साधायला प्रयत्न केला. पण प्रथम दीड वर्षाला जाणवले की आरशातली व्यक्ती मीच. म्हणजे माझ्या बाह्य अस्तित्वाची पहिली जाणीव झाली. प्रतिबिंबाला माझ्या नावाने हाक मारणे, डोळ्यात माझ्या अस्तित्वाचे पुष्टीकरण.

चार वर्षाला आरशात आईचा दुपट्टा नेसून तिच्यासारखं बोलणे ही केवळ नक्कल नव्हे, तर माझ्या आदर्शांसारखे त्यांच्या जगात स्वतःला बसवण्याचा प्रयत्न. आठ वर्षाला आरसा माझा उत्साहवर्धक सवंगडी. अगदी नाक्यावरच्या दुकानात जायला देखील. कागदाचे पंख फ्रॉकला जोडले, तर थेट परी असल्याचा पुरावा मिळायचा. दहा वर्षाला आरसा कानात कुजबुजला की आता तू तुझे व्यक्तिमत्त्व व्यक्त करणे आवश्यक आहे. मी निवडलेले कपडे आरशाच्या साक्षीने ग्वाही द्यायचे की तुझ्या लहानशा जगात तुझे निर्णय महत्त्वाचे आहेत.

यापूर्वी स्वतःची प्रतिमा आत्मनिर्भर होती. पहिल्यांदा चौदा वर्षांची होताना आरशाला विचारले की मी माझ्या समवयस्कांमधे बसते का नाही. माझं प्रतिबिंब माझी मनःस्थिती दर्शविणारा लंबक - कधी नावीन्याच्या शोधात बंडखोर, कधी विनम्र गतानुगतिक. अठरा वर्षं पुरी करताना 'तरुणां'च्या प्रजातीची दखल घेतली. त्या अनुसार नटायच्या प्रयत्नांचा आरसा चाहता साक्षीदार.

बावीस वर्षाला परत प्राधान्यक्रम बदलले. आरशाने आश्वासन दिले की व्यावसायिक जगाच्या उंबरठ्यावर, अज्ञात जगात वावरणारी व्यक्ती तीच परिचित 'मी' होते. आधीची आव्हाने पेललेली स्त्री, ह्या जगातही अपले स्थान कमवू शकते. कामानिमित्त प्रत्येक वर्षी नवीन देश, अपरिचित संस्कृती, बदलती परिस्थिती - दिलासा द्यायला फक्त तोच सलगीचा आरसा.

पंचवीस वर्षांला एखाद्याशी अचानक नजर भेटली. मनात विचार आला - आता आरशाची गरज नाही, जोडीदाराच्या डोळ्यातली माझी प्रतिमा पुरेशी आहे. विसरले होते की यशस्वी नातेसंबंधांसाठी दोन सशक्त व्यक्तींचे असणे अतिआवश्यक - एका सुराने संगीत बनत नाही. तर आरशाची गरज सरली नव्हती. आरशाने आम्हाला दोघांना सामावून, संयुक्त प्रतिबिंब दर्शविले. 'मी'चे 'आम्ही' करायचे सामर्थ्य दिले.

आई झाले, तर मुलात माझे प्रतिबिंब शोधू लागले. परत आरशाने हळुवारपणे माझ्या चुकीच्या कल्पना दुरुस्त केल्या. छाया विश्वासार्ह दिसली, तरीही तो तात्पुरता भास. त्यातदेखील डाव्याचं

उजवं-उजव्याचं डावं असं उलटलेलं चित्र. मुलगा माझी प्रतिमा नव्हे, तर एक स्वतंत्र व्यक्ती आहे हे आरशाने समजावलं. मुलाचं वैयक्तिक स्वातंत्र्य मानल्यामुळे मातृत्वाचा अनुभव अधिक सुरस झाला.

हो, आरशाकडून शिकलेले सर्वच धडे रुचकर नाहीत. स्नो व्हाईटच्या परीकथेतल्या दुष्ट सावत्रआईच्या आरशासारखे, काही सत्य, अगदीच कटु. देखाव्याशी आत्मसन्मान जोडलेल्या समाजात, आरसे नसते तर उगवलेल्या पांढऱ्या केसाने मनातल्या चिरतारुण्याला धक्का बसला नसता. कॉलेजमधली 'अवरग्लास फिगर' भिंतीवरच्या घड्याळाच्या आकारात बदलल्याचा खेदही झाला नसता. गाडीच्या आरशांसारखं, प्रतिबिंब केवळ आपल्या मागचं दाखवतं. भूतकाळात मग्न, माझ्याच छायेने अनेकदा भविष्याचे दृश्य अडविले नसते. कधीकधी प्रतिबिंबात माझ्या पणजीची छबी दिसते आणि उमगते - मी केवळ गेलेल्या आणि येणाऱ्या पिढ्यांमधील परंपरा हस्तांतर करणारा पूल, प्रतिबिंबाइतकेच हे अस्तित्व. अशा वेळी, व्हिक्टोरियाकालीन इंग्लंडची अंधश्रद्धा - आरसा माणसाच्या आत्म्याचा एक तुकडा चोरतो - ही समर्थनीय वाटू लागते.

पण समग्र दृश्य पाहताना कमाल वाटते की इतक्या नाजूक वस्तूने माझ्या आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर इतका खोल प्रभाव टाकला. सकारात्मक किंवा नकारात्मक, माझा माझ्याशी परिचय करून दिला.

आजचा काळ सेल्फीच्या माध्यमातून स्वतःला सार्वजनिक नजरेत ढकलायचा आहे. तरीही आरशात बघून स्वतःला नीट तपासून

- विचारपूर्वक स्वत:ला बदलल्याशिवाय आपण जगू शकत नाही, हा तत्त्वज्ञानी सॉक्रेटिसचा मापदंड लागू होतो.

जर आरसे नसते तर, मानवी जीवनाच्या मूलभूत प्रश्नाचे उत्तर देण्यास, मनुष्य असमर्थ ठरेल - मी कोण?

**- गणेशोत्सव २०१८**



# चूल, मूल आणि So Cool

- स्वाती काळे

सर्वसाधारणपणे चूल, मूल हे दोन शब्द आले की सो... कूल... असे कधी कुठल्या स्त्रीच्या वाट्याला येत नाही असा माझ्या वयाच्या स्त्रियांचा अनुभव. चिल्... मॉम्झी म्हणणारी पिढी जन्माला घालणाऱ्या आम्ही आया. माझ्या पिढीतील बऱ्याचजणी एक पाऊल घराबाहेर पडताना मन मात्र सदैव घरात गुंतलेले अशा तारेवरच्या कसरतीत तरबेज होत्या. कमीतकमी पैसे खर्च करून, जास्तीतजास्त वाचवत, म्हातारपणाची बेगमी करत, अनेक हौशींना मुरड घालत आनंदाने जगल्या. फार तक्रारी केल्या नाही, अर्थात ऐकण्यासाठी कोणी नसायचेही. शिक्षणाचा एक टप्पा कुठे पार पडत नाही की हातात माळ द्यायला सगळे तयार असायचे. फार काही विचार न करता एक-दोन (दोनच जास्त करून) मुलांना जन्म देऊन एक चौकोन पूर्ण केला जायचा आणि ह्या चौकोनात कालपरत्वे षट्कोन-अष्टकोन जोडले की आयुष्याचे सार्थक झाले. इथपर्यंत घरोघरी गॅसच्या शेगड्या सारख्याच, फारतर फार बर्नरची संख्या कमीजास्त असेल. शिक्षण व त्याची नवनवी क्षितिजे जसजशी दृष्टीच्या टप्प्यात येऊ लागली. समाजमनाचा आरसा वेगळी प्रतिबिंबं दाखवू लागला आणि हे निश्चितच लोभसवाणे होते. ह्या सगळ्यात मोठे बदल झाले, ते चौकटीच्या लक्ष्मणरेषेमध्ये. जशा ह्या रेषा पुसट होत चालल्या आहेत, तशा चौकटीच्या संकल्पना बदलत चालल्या आहेत. लिंग,

वय, लग्नसंस्था, जोडीदार ह्यांचे जुने ठोकताळे मोडीत निघत चालले आहेत. आधी आपला जोडीदार कुठला, त्यावर मग लग्न करायचेच का? समजा केले, तर मग आपले मूल हवेच आहे का? वेळ आहे का त्याला मोठं करायला? मीच का सगळ्यावर पाणी सोडून आटापिटा करू? मला तुझ्यासारखी घर-संसार-मुलेबाळे ह्याची नाही आवड, माझ्याकडून भलत्या अपेक्षा नकोत हा संवाद नवराबायकोतला नसून आई-मुलांच्यात होत आहे. वाचताना जरा अति वाटेल, पण हळूहळू हे संवाद कमी-अधिक प्रमाणात ऐकायला मिळणार आहेत. जोडीदाराची निवड खूप पारखून, अनेक कसोट्यांवर कसरत करत झाली की आपल्या आवडीने सोयीने कधी लग्न करून किंवा कधी न करताही राहता येते. (ही उदाहरणे उच्चशिक्षित, आर्थिक दृष्टीने स्वतंत्र असणाऱ्या मुला-मुलींची आहेत) जर लग्न केले की मग समाज वेगळ्या अपेक्षा ठेवायला लागतो. संसारात स्वयंपाक, इतर कामे हे प्रश्न आपल्या सोयीनुसार, ऐपतीनुसार सोडवले जातात. दोघेही आपल्या करिअरसाठी शिड्या चढत असतात, अशा वेळी आपले मूल जन्माला घालणे हे निश्चित एक वाढीव जबाबदारीच असते. जर घरून सहकार्य असेल, तर हा प्रश्न बऱ्याच प्रमाणात सुटतो ही. मात्र अनेक जोडप्यांना आपले मूल असावे ही भावना तेवढी तीव्र नाही असे काही अंशी दिसून येते आहे. अँटि नेटलिझम - anti netlism (मानव-जन्म विरोधी) हा शब्द मला इतका बोचला की अस्वस्थ झाले. मग लेकीशी बोलले. सकाळी साडे सात/आठ ते रात्री आठपर्यंत काम करून घरी येणारी आणि आल्यावरही अजून थोडे काम आहे म्हणणाऱ्या पिढीची प्रतिनिधी. तिच्या लेखी- अगं, एवढी अस्वस्थ का होतो आहेस त्या शब्दाने? तुझा जरा भावनिक हलकल्लोळ जास्तीच असतो. आपल्या देशाची

लोकसंख्या किती आहे?? त्यात असे विचार करणारे काही असतील, तर एवढे काही बिघडत नाही. जगात असा विचार करून कृती करणाऱ्या लोकांची संख्या वाढत आहे. मी आपलं तरीही माझे घोडे पुढे दामटवत, थोडे धास्तावून म्हणून घेतले, 'मी तर आपले नातवंड हा विषय bucket list मध्येच लिहून ठेवला आहे.'

'हां हां मॉम्झी किती ते emotional blackmail? अगं, तू स्वतः लग्नाला चार वर्षे झाल्यावरही, मी जन्माला येताना आपण आर्थिक दृष्टीने सक्षम आहोत का असा प्रश्न मनात ठेवूनच मला जन्म दिला होतास. मग त्यासाठी मी कधी टोकले का तुला? आम्हाला स्वतःसाठीच वेळ नसतो, तिथे मुलांच्यासाठी कुठून काढू? पाहते आहेस ना भिंगरी पायाला लावून आम्ही कसे पळतो मॅरेथॉनमध्ये पळाल्यासारखे! अशावेळी त्या मुलांवर अन्याय करत ह्या जगात का आणायचे? आपला देश केवढासा आणि लोकसंख्या किती अफाट! काय फरक पडतो, काही मुलं नाही जन्माला येणार, एखादी पिढी संख्येने कमी असेल!'

मी आपली, 'हो गं, पण आपली पुढची पिढी जन्माला येणारच नाही आणि तेही जाणूनबुजून हे पचवायला जड जाते आहे गं' पुटपुटत फोन ठेवला. मनात आले की भावनाशून्य होत चालली आहे का पुढची पिढी? साधे आपण लावलेल्या रोपांना फुले आली तरीही हरखून जाते मन, मग निसर्गाने दिलेल्या नवनिर्मितीच्या एवढ्या अनोख्या क्षमतेचे मूल्य राहिले नाही. माझ्या डोक्यातील विषय आणि रुखरुख एका मैत्रिणीला सांगत होते, तर ती एकदम म्हणाली - अगं आले माझ्या लक्षात, ह्यालाच 'डिंक' (double income no kids) म्हणतात. शब्द ऐकला आणि हसू आले. कसे विरुद्ध शब्द बनतात!

आमचा डिंक जोडतो आणि हा तर तुटण्यासाठीच बनला. इच्छा असूनही अपत्याप्राप्ती न झालेली जोडपी पाहिली होती. त्यातील काहीजणांनी काही मार्ग शोधून आपल्या भावनांना मूर्त स्वरूप दिले, तर काही तसेच परिस्थिती स्वीकारत मजेत जगतात हेही पाहिले आहेच. मन विचारात पडले, नक्की आपण खूप विचारपूर्वक मुलांना जन्म देतो का? माझ्या पिढीतील अनेक पालक असेच होते- ज्यांनी फार काही खोलवर विचार न करता आपली मुले जन्माला घातली; त्या काळाशी ते सुसंगतच होते. पण मग तरीही आज जर पुढची पिढी खूप विचारपूर्वक निर्णय घेण्याचा प्रयत्न करते आहे, तर आपण त्यांना समजून घ्यायला कमी पडतो आहोत का? आपण एकच मूल आणि तेही मुलगी असूनही त्यावेळी ठामपणे निर्णय घेतला. नवऱ्याला आपला मुद्दा पटवून घ्यायला भाग पाडले होतेच की. अर्थात पुढे तो निर्णय योग्यच होता हे अनेकदा सिद्ध झाले.

पुढची पिढी-म्हातारपणी आधार वगैरे दृढ समजुती बऱ्याच अंशी मागे पडल्या आहेत. एका गावात राहणारी आपली मुले असोत किंवा परगावी-परदेशात राहणारी, त्यांच्या एकट्या-दुकट्या राहणाऱ्या पालकांच्या गरजेच्या वेळी किती वेळात पोचतील? ह्यात अंतराशिवाय फार काही बदल नसतो.

मी पुन्हा-पुन्हा त्या मानव-जन्म विरोधी ह्या शब्दाच्या आणि त्या अनुषंगाने आपल्या किंवा कोणा जवळच्यांच्या-ओळखीच्यांच्या वाट्याला येणाऱ्या नव्या अनुभवाभोवती फिरत आहे. साधा ऋतू बदलतो, तरी आपण कधी हरखून जातो, कधी वैतागतो, चर्चा करतो. मग एवढा सामाजिक बदल होणार आहे, तर त्याविषयी इतके उदासीन-अनभिज्ञ का आहोत? खरंच, तरुण पिढीला असे वाटणे

आणि त्यातील १०-२०%नी असा निर्णय घेतला, तर काय काय बदल होतील ह्याचा अभ्यास होणे गरजेचे आहे. आपण खुल्या मनाने हे स्वीकारू का? हो म्हणण्यासाठी मन, जीभ तयार नव्हती.

परवा गाथा वाचताना एका अभंगापाशी सगळ्याच अडलो. 'गर्भाचे धारण। तीने वागविला सीण।। व्याली कुऱ्हाडीचा दांडा। वार न घालीच तोंडा।। उपजला काळ। कुळा लाविला विटाळ।। तुका म्हणे जाय। नरका अभक्ताची माय।। (अभंग क्र. २०६) जेव्हा तुकोबा नालायक असणाऱ्या अपत्याला जन्मच का दिला म्हणून मातेला दोष देत होते आणि तेव्हा आमची उत्स्फूर्त प्रतिक्रिया - शतकानुशतके स्त्रियांना किती आणि काय दूषणं देतो समाज - अशीच आली. नेहमी आपलीच कशी सत्त्वपरीक्षा? मूल जन्माला घातले, नाही घालू शकले किंवा नकोच म्हणून नाकारले, तरी आजही समाज पटकन नेहमीप्रमाणे स्त्रीलाच पिंजऱ्यात उभे करून जाब विचारत राहील की आपल्या कल्पनेचे कंगोरे बोथट करत हा बदल स्वीकारेल?

मुक्ततेच्या नव्या वळणावर उभे असताना एक स्त्री म्हणूनच्या माझ्या आत्मद्वंद्वाच्या मंथनातून मला काय भावले, काय खुपले ह्याचा हा लेखाजोखा. गुंतागुंतीच्या होत जाणाऱ्या नात्यांचा घेतलेला धांडोळा!!

**- इ-सनविवि, मार्च २०१९**

**महाराष्ट्र मंडळ बेंगळूरु**

ಮಹಾರಾಷ್ಟ್ರ ಮಂಡಳ್ ಬೆಂಗಳೂರು

आधुनिक इलेक्ट्रॉनिक माध्यमांमुळे आज अवघं विश्व खूप जवळ आलं असलं, तरी आपण खूप दिवसांत चांगलं मराठी नाटक पाहिलं नाही, मराठी सिनेमा बघितला नाही, मराठीतील सध्याची नवी गाणी माहीत नाहीत, बाजारात पुस्तक येऊन गाजलं, तरी आपल्याला अजून पाहायलाही मिळालं नाही अशासारख्या असंख्य गोष्टी खुपत राहतात. आमच्या बेंगळूरात तरी अशा वेळी आमचा 'सनविवि' आमचा सुहृद बनतो. इतकंच नव्हे, तर आम्हाला समानधर्मी-समानशील सन्मित्र मिळवून देतो. 'सनविवि'तल्या गप्पा-गोष्टी-कथा-कविता-लेख आमच्या माय मराठीची उणीव काही प्रमाणात भरून काढतात.